भारताने विविध क्षेत्रांतील स्वत:चे निर्देशांक तयार केले पाहिजेत ४

शुभ-अशुभ म्हणून नव्हे तर या कारणांमुळे फडफडते पापणी ८

सलीम खान यांनी केला सलमानच्या लग्न न करण्याचा खुलासा ९



नव्या युगाची हाक

# मुंबई चौफेर

वर्ष ३१ • अंक ६० • मुंबई • शनिवार, २९ जून २०२४ • पाने 10 किंमत ₹ 5 • www.mumbaichoufer.com



वारकऱ्यांच्या आगमनाने अलंकापुरी गजबजली ३




आज माऊलींच्या पालखीचे प्रस्थान

# राज्याच्या अर्थसंकल्पातून महिला, शेतकरी, युवकांना दिलासा



## अर्थसंकल्प २०२४

### अतिरिक्त अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

■ २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता, आता २०२४-२५चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात आला.

■ केंद्र शासनाच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत वाढवण बंदर प्रकल्पाला मंजुरी-एकूण किंमत ७६ हजार २०० कोटी रुपये -१० लाखांहून अधिक रोजगार निर्मिती

■ अतिरिक्त अर्थसंकल्पात महिला, शेतकरी, युवा, मागास वर्ग आणि सर्व समाजातील गरिबांना भरीव आर्थिक मदतीवर भर

■ महिला लघुउद्योजकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना- अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन

■ आई योजनेअंतर्गत पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा - १० हजार रोजगार निर्मिती

■ मुलींना मोफत उच्च शिक्षण - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषीविषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ८ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती. या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ-सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा

मुंबई - विधानसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवारांनी मांडला. त्यामध्ये शेतकरी, महिला, युवक आणि सर्व घटकांसाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. त्यामध्ये महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेची घोषणा करण्यात आली, तर शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना कायम ठेवण्यात आली आहे. तसेच प्रती दिंडी २० हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित कर आहे, तो पेट्रोल, डिझेलवरील कर २४ टक्क्यांवरून २१ टक्क्यांपर्यंत घटवला आहे.



## अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या घोषणा

### महिलांसाठी

● मध्य प्रदेशातील मुख्यमंत्री लाडली बेहना या योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा.

● महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी २१-६० वयोगटातील महिलांना दर महिना दीड हजार रुपये दिले जातील. जुलै २०२४ पासून ही योजना सुरू करणार असून, यासाठी ४६ कोटी रुपये मंजूर करण्यात येत आहेत.

● मुलींमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. यासाठी ८ लाख वार्षिक उत्पन्नाची मर्यादा तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना पदवी शिक्षणासाठी १०० टक्के शुल्क माफ करण्यात येणार.

● गॅस सिलिंडर परवडेल यासाठी पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलिंडर मोफत दिले जातील.

● राज्यात १० हजार पिंक रिक्षा महिलांसाठी देण्यात येतील.

● बस प्रवासात सवलत.

● मुद्रांक शुल्कात सवलत.

● वर्षाला एका कुटुंबाला ३ सिलिंडर मोफत दिले जातील.

● बचत गटाच्या निधीत १५ हजारांहून ३० हजार निधी देण्यात येईल.

● यावर्षी २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचा शासनाचा विचार आहे.

● आठ लाख रुपयांचे उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना व्यावसायिक शिक्षणामध्ये शंभर टक्के सवलत दिली जाणार.

### शेतकऱ्यांसाठी

● शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजना कायम करणार.

● कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टर पाच हजार रुपयांचे अनुदान.

● गाई दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रति लिटर ५ रुपयाचे अनुदान १ जुलैपासून देण्यात येणार.

● येत्या दोन वर्षात १६३ सिंचन प्रकल्प पूर्ण होतील.

● सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्ड करून १५,००० कोटींचे दीर्घकालीन कर्ज मंजूर झालेले आहे.

● ३२०० कोटी रुपयांचा दुष्काळी भागात पाणी पोहोचवण्याचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

● शेतकरी यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी १५,००० कोटी रुपयांची व्यवस्था करण्यात येत आहे.

● मागेल त्याला सौरपंप दिला जाणार आहे.

● अभ्यासक्रम पूर्ण करणारे तरुण जास्त आहेत. १० हजार रुपये विद्यावेतन दिले जाईल.

● संजय गांधी निराधार योजनेला १ हजारावरून दीड हजार रुपयांचे अनुदान मिळाले.

● शेती कृषी पंपाचे सर्व थकित बिल माफ करण्यात आलेय.

● नवीन रुग्ण वाहिका खरेदी केल्या जातील.

● मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना राबवली जाईल.

● रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा केला जाईल, त्याचा खर्च राज्य सरकार करणार आहे.

- माळशेज घाटात व्ह्युविंग गॅलरी उभारण्यात येणार.

## महाराष्ट्राला नवी दिशा देणारा निर्धाराचा अर्थसंकल्प -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबई - राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. १ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्ज्वल करणारा आहे. महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. हा महाराष्ट्राच्या विकासाचा गजर करणारा अर्थसंकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत २०२४-२५चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. फेब्रुवारीत वित्तमंत्र्यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता.

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील महिला, बेरोजगार युवक-युवती यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी या अर्थसंकल्पात महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत, पात्र कुटुंबाला वर्षाला ३ सिलिंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी १५ हजार कोटींचा प्रकल्प, शेतीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण वीज माफी देणारी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम, (पान २ वर)

### वारकऱ्यांसाठी

● सर्व वारकरी यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

● मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

● पालखी मार्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री व्यवस्थापन, निर्मल वारीसाठी ३६ कोटी रुपये वितरित.

● प्रति दिंडी २० हजार रुपये दिले जाणार, मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन केले जाणार.

### महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा वाढणार

● २०२३-२४ मध्ये कर्जाचा डोंगर ७,११,२७८ लाख कोटींवर.

● सरकार वर्षाला देत आहे कर्जावर ४८,५७८ कोटींचे व्याज.

● २०२३-२४ साठी अपेक्षित खर्च २,३१,६५१ लाख कोटी.

● जिल्हा वार्षिक योजनांवरचा खर्च २९ हजार १८८ कोटी.

● २०२३-२४ मध्ये १ लाख ११२ कोटींची परकीय गुंतवणूक शक्य.

● २०२३-२४ मध्ये औद्योगिक विकास ७.६ टक्क्याने अपेक्षित.

● बांधकाम क्षेत्राचा विकासदर १४.५ टक्केवरून ६.२ टक्केपर्यंत घसरणार.

● शहरी भागात गृहनिर्माण ३० टक्के घटले,१९.४ लाख घरांचे होते उद्दिष्ट.

● मुंबईत वर्षभरात २.६ लाख नव्या गाड्या रस्त्यावर.

● मुंबईतल्या गाड्यांची संख्या ४७ लाखांवर.

● अवकाळी,अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना ६,४२० कोटींची मदत केली. (पान ६ वर)

## मुंबईत मुसळधार; रेल्वे, रस्ते वाहतुकीचा वेग मंदावला

मुंबई - मुंबईत मागील काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने दुसऱ्या दिवशी शुक्रवारीही दमदार बरसला. मुंबई शहर व उपनगरांत सकाळपासूनच पावसाने संततधार सुरू ठेवली. त्यामुळे उशिरा का होईना, मुंबईत पाऊस सक्रिय झाल्याने मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, दिवसभरात पडलेल्या पावसामुळे पडझडीच्या घटना घडल्या. ट्रॉम्बे येथील एक्सर स्टुडिओच्या मागे एकमजली बांधकाम असलेल्या इमारतीच्या छताचा भाग कोसळून एक जण जखमी झाल्याची घटना घडली. रेल्वे व रस्ते वाहतुकीचा वेग मंदावला होता. येत्या २४ तासांत मुंबई शहर व उपनगरांत आकाश ढगाळ राहून अधूनमधून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

मुंबईत मागील काही दिवसांपासून मुंबईकरांना चांगल्या पावसाची प्रतीक्षा होती. मात्र मान्सून दाखल झाल्यानंतर पहिल्याच दिवशी वाऱ्यासह जोरदार हजेरी लावली. त्यानंतर मात्र पावसाने अधूनमधून रिपरिप ठेवली होती. पावसाच्या या हुलकावणीमुळे मुंबईकर घामाच्या धारांनी हैराण होते. हवामान विभागाने दिलेले पावसाचे अंदाजही फोल ठरले. (पान २ वर)

## दिल्लीच्या विमानतळावर पावसामुळे भीषण अपघात



नवी दिल्ली - दिल्लीत गुरुवारपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. यामुळे उष्णतेपासून दिल्लीकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. पण, मोठे नुकसानही झाले आहे. शुक्रवारी पहाटे सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे रस्ते जलमय झाले. याशिवाय दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१चे छतही कोसळले. या घटनेत अनेक वाहनांचे नुकसानही झाले आहे. या अपघातात कारमध्ये बसलेले (पान २ वर)

## नीट पेपर लिक प्रकरण १० विद्यार्थ्यांवर कारवाई

जयपूर - नॅशनल टेस्टिंग एजन्सीने घेतलेल्या नीट यूजी परीक्षेत फसवणूक केल्याप्रकरणी देशभरात अनेक ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या संपूर्ण प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला आहे. देशातील या सर्वात मोठ्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या घोटाळ्याचे धागेदोरे राजस्थानमधील झालावाड मेडिकल कॉलेजमध्येही पसरल्याचे दिसून येत आहे. या महाविद्यालयातील एमबीबीएसच्या १० विद्यार्थ्यांना दिल्ली आणि मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. या विद्यार्थ्यांनी डमी उमेदवार बसवून (पान २ वर)







## पंढरीच्या वाटेकडे निघाला वैष्णवांचा मेळा!

### तुकोबांच्या पालखी सोहळ्याने ठेवले प्रस्थान

देहू (पुणे) - हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास।

पंढरीचा वारकरी । वारी चुको न दे हरि ।। असा वारीसाठी आसुसलेला वारकरी ध्यानात, मनात आणि कणाकणात सामावलेल्या पंढरीच्या विठू सावळ्याच्या भेटीची आस घेऊन... टाळ-मृदंगाचा गजर, डोक्यावर तुळशीवृंदावन आणि भागवत धर्माचा भगवा झेंडा खांद्यावर मिरवत... लाखो वैष्णवांच्या भक्तिकल्लोळात जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याने शुक्रवारी (२८ जून) दुपारी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. हा सोहळा याचि देही याचि डोळा अनुभवण्यासाठी लाखोंच्या संख्येने वारकरी देहूनगरीत दाखल झाले होते. परंपरेनुसार देहू येथील इनामदार वाड्यात तुकोबांची पालखी प्रस्थानानंतर विसावली. शनिवारी तुकोबांचा पालखी सोहळा आकुर्डीच्या दिशेने वाटचाल सुरू करणार आहे.

पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी गुरुवारी रात्रीपासूनच देहूनगरीत उत्साही वातावरण होते. पालखी सोहळ्याच्या कार्यक्रमांना चौघड्याच्या निनादात पहाटेपासून सुरुवात झाली. पहाटे साडेचार वाजता काकड आरती झाली. पहाटे पाच वाजता श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरात संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात भानुदास महाराज मोरे, अजित महाराज मोरे, संजय महाराज मोरे यांच्या हस्ते महाअभिषेक झाला. विठ्ठल-रुक्मिणी मातेची महापूजा करण्यात आली. पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात पालखी सोहळा प्रमुख माणिक महाराज मोरे, संतोष महाराज मोरे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. इनामदार वाड्यात सकाळी नऊ वाजता तुकोबांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. सकाळी १० ते १२ या वेळेत देहूकर महाराजांचे काल्याचे कीर्तन झाले. विविध धार्मिक विधी संपल्यानंतर सकाळी दर्शनबारी सुरू करण्यात आली. दर्शनाला जाण्यापूर्वी स्नान करण्यासाठी भल्या पहाटेच इंद्रायणीचा काठ वैष्णवांनी फुलून गेला होता.

## एक्स्प्रेस-वेवर कार, कंटेनरचा अपघात

### दोघांचा जागीच मृत्यू, तीन जखमी

पुणे - मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवर खालापूर हद्दीत भीषण अपघात झाला आहे. पुण्यावरून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या भरधाव कारने कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दोन प्रवाशांचा मृत्यू झाला, तर ३ जण जखमी झाले आहेत. जखमींना नजीकच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे.



अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. अपघातामध्ये जखमी झालेल्या तिघांना तत्काळ खोपोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले, तर मृत्यू झालेल्या दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयामध्ये पाठविण्यात आले. हा अपघात इतका भीषण होता की, यात कारचा अशरशः चक्काचूर झाला आहे. सदर अपघातानंतर एक्स्प्रेस-वेवर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त दोन्ही वाहने रस्त्यातून बाजूला काढल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

## वारकऱ्यांच्या आगमनाने अलंकापुरी गजबजली; आज माऊलींच्या पालखीचे प्रस्थान

आळंदी - संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आषाढी वारीसाठी शनिवारी (२९ जून) आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर अलंकापुरीत दिंड्या आणि वारकरी भाविकांची गर्दी होत आहे. प्रशासनानेही माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यासाठी यंत्रणा सज्ज केली आहे. वाढती गर्दी लक्षात घेऊन महाद्वारातून वारकरी तसेच भाविकांना प्रवेश बंद केला आहे.

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा देहू, आळंदीतून दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात साजरा होत आहे. शुक्रवारी देहूतून संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले. आज माऊलींची पालखी निघणार आहे. त्यामुळे या पायीवारीत सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची मांदियाळी आळंदीत दाखल झाली आहे.

देहूचा सोहळा आटोपून शुक्रवारी (२८ जून) अनेक भाविक सायंकाळी आळंदीत दाखल झाले आहेत. परिणामी आळंदी भाविकांनी गजबजून निघाली आहे. आळंदीत दाखल होताच प्रथमदर्शी भाविक माऊलींच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहत आहेत. सद्यःस्थितीत दर्शनरांग इंद्रायणी पलीकडे जाऊन पोहोचली आहे. मात्र अनेक जण थेट मंदिरातून मुखदर्शनाचा लाभ घेत आहेत.

वाढती गर्दी लक्षात घेऊन शुक्रवारपासून (दि.२८) महाद्वारातून वारकरी तसेच भाविकांना प्रवेश बंद केला आहे. दरम्यान, टेम्पो, ट्रकमधून वारकरी भाविकांचे आगमन होत आहे. तर काही वारकरी पायी चालत आळंदीत दाखल होत आहेत. भाविकांच्या आगमनाने इंद्रायणी नदीतीर गजबजून गेला आहे.

**हार, फुलांची दुकाने सजली...**

पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त आळंदी शहरात अनेक हार, प्रसाद, फुलांची व वारकरी साहित्य वस्तूंची दुकाने सजलेली दिसून येत आहेत. मंदिरामधील दर्शनबारीत वारकरी भाविक 'ज्ञानोबा माऊली'चा जयघोष करत आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेऊन भाविक मंदिरामध्ये क्षणभर विसावून हरिनामाचा जप करताना दिसत आहेत.

## वाशीत प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडक मोहीम

नवी मुंबई - नवी मुंबई शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका सातत्याने विविध माध्यमांतून प्रयत्न करत आहे. नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या तसेच एकल वापर प्लास्टिकचा वापर न करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमाही राबविण्यात येत असून, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक फ्री मार्केट ही संकल्पना राबविली जात आहे. या मार्केटमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी कापडी पिशव्या वेंडिंग मशीन लावण्यात येत आहेत.

प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम राबवताना वाशी विभाग कार्यालयांतर्गत सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे आणि परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करत प्रत्येकी १० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम जमा केली. या कारवाईमध्ये स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक आणि सहकारी सहभागी होते.

## अंबरनाथमध्ये होणार पाण्यासाठी आंदोलन

अंबरनाथ - अंबरनाथ शहरात पाणी व विजेची समस्या गंभीर होत चालली आहे. पाणी व विजेचे बिल वेळेवर भरूनही या दोन्ही समस्येला सामोरे जावे लागत असल्याने येथील नागरिक संतप्त झाले आहेत. या गंभीर समस्येचा विचार करून अंबरनाथ शिवसेना शहर प्रमुख अरविंद वाळेकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता देशपांडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आहे. दरम्यान या पाणीटंचाईचा प्रश्न चार दिवसांत सुटला नाही, तर शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलन करण्याचा इशारा वाळेकर यांनी निवेदनात दिला आहे. अंबरनाथ शहरात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर महिलांना पाण्यासाठी इकडे तिकडे भटकावे लागत आहे. सोबतच विजेची सुद्धा समस्या गंभीर झाली असून, दिवसाला चार ते पाच वेळा वीजपुरवठा बंद होतो.

## बोईसरमध्ये ट्रेलरने दोन विद्यार्थ्यांना चिरडले

**एकाचा जागीच मृत्यू एक गंभीर जखमी**

बोईसर - चिल्हार-बोईसर रस्त्यावरील ओम साई पेट्रोल पंपाजवळ भरधाव वेगातील ट्रेलरने शाळेच्या दिशेने पायी चालत जात असलेल्या दोन विद्यार्थ्यांना चिरडले. या अपघातात एका विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला, तर एक विद्यार्थिनी गंभीर जखमी झाली आहे. शुक्रवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली.

निखिल काळुराम गिऱ्हाणे (१४) आणि सोनाली दांडेकर (१६) हे नागझरी ग्रामपंचायत हद्दीतील चरी गावचे रहिवासी आहेत. निखिल आणि सोनाली नेहमीप्रमाणे चरी गावातून नागझरी नाक्यावरील स्व. सौ. विद्या विनोद अधिकारी विद्यालयात जाण्यासाठी बोईसर-चिल्हार रस्त्याच्या कडेने पायी चालत जात होते. पावणेदहा वाजण्याच्या सुमारास ओम साई पेट्रोल पंपाच्या पुढे पोहोचले असताना बोईसरच्या दिशेने जात असलेल्या भरधाव वेगातील ट्रेलरने दोन्ही विद्यार्थ्यांना पाठीमागून धडक दिली. ट्रेलरखाली चिरडल्याने निखिलचा जागीच मृत्यू झाला, तर सोनाली गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर नागझरी येथील अधिकारी लाइफलाइन या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी ट्रकचालकाला अटक करण्यात आली आहे.

**एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूमुळे गिऱ्हाणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर**

आदिवासी आणि गरीब कुटुंबातील एकुलता एक मुलगा असलेला निखिल गिऱ्हाणे हा अधिकारी विद्यालयात इयत्ता आठवीत शिकत होता. वीस वर्षे उपासतापास आणि नवसानंतर त्याचा जन्म झाला होता. निखिलचे आईवडील त्याचे कोडकौतुक करत त्याला जपत होते. शुक्रवारी सकाळी घराशेजारीच झालेल्या अपघातात नियतीने निखिलला हिरावून नेल्याने आईवडील आणि नातेवाइकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## कल्याणमध्ये घराचे छत कोसळले

कल्याण - कल्याण-डोंबिवली परिसरात सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. या पावसामुळे कल्याण पूर्व लोकग्राम परिसरातील एका चाळीत घराचे छत कोसळले. दुपारच्या सुमारास ही घटना घडली. यावेळी घरात झोपलेले कुटुंबातील सहा जण जखमी झाले आहेत. यात चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

कल्याण पूर्वच्या लोकग्राम, न्यू जिम्मी बाग जयप्रकाशनगरमधील ही घटना आहे. कल्याण-डोंबिवलीत सकाळपासूनच ढगाळ वातावरण निर्माण होऊन रिमझिम पाऊस सुरू होता. पावसाला जोर नसला तरी अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीसह परिसराच्या सकल भागांत पावसाचे पाणी साचले होते. कल्याण शीळफाटा रस्त्यावरील वाहतूक संथ गतीने सुरू होती. दरम्यान, या संततधार पावसात लोकग्राम परिसरातील एका घराचे छत कोसळले. छतावर सिमेंटचे पत्रे टाकण्यात आले होते. सदरची घटना घडली यावेळी घरात असलेले परिवारातील सर्व सदस्य दुपारच्या वेळी झोपलेले होते. अचानक छत कोसळल्याने कुटुंबातील सहा जण जखमी झाले आहेत. यात शिवपूजन प्रजापती (२५), प्रिन्स प्रजापती (१३), ललिता प्रजापती (३२), उर्मिला प्रजापती (४२), ज्योती प्रजापती (१६), प्राची प्रजापती (१८) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना लागलीच उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## लायन्स क्लब ऑफ शहापूरचा सोहळा उत्साहात संपन्न

शहापूर - लायन्स इंटरनॅशनल क्लब ठाणे डिस्ट्रिक्ट ३२३१ च्या लायन्स क्लब ऑफ शहापूरचा चार्टर नाइट प्रोग्राम तसेच इन्स्टॉलमेंट सेरेमनी (सोहळा) नुकताच खातीवली येथील प्रसिद्ध सवाई मल्हार हॉटेलच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन राजेश बल्लमवार तसेच विशेष आमंत्रित जीइटी को-ऑर्डिनेटर लायन भरत दत्त आणि इव्हेंट को-ऑर्डिनेटर लायन राजेश अटल उपस्थित होते.

२०२३-२०२४ या काळात क्लबने केलेल्या कामांची आणि राबविलेल्या कार्यक्रमाची माहिती क्लब प्रेसिडेंट लायन संध्या गुजराती यांनी दिली. या कार्यक्रमात लायन्स क्लबच्या सेक्रेटरी लायन सिद्धी गुजरे, प्रेसिडेंट संध्या गुजराती, लायन रुपेश गुजरे, लायन शरयू आठवले, लायन सतीश गुजराती आदी मंडळींना 'साईट फर्स्ट' हा मानाचा सन्मान चषक मिळाल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.



लायन रुपेश गुजरे यांची अध्यक्षपदी निवड

प्रमुख पाहुणे लायन राजेश बल्लमवार यांनी विविध पदांची आणि त्याची जबाबदारी याची विस्तृत माहिती दिली. या कार्यक्रमात २०२४-२०२५ या वर्षाकरिता पदाधिकारी आणि कार्यकारिणी जाहीर केली. नवनियुक्त प्रेसिडेंट लायन रुपेश गुजरे, सेक्रेटरी लायन मुकेश दामोदरे, ट्रेजरर लायन सोमनाथ काबाडी आणि व्हॉईस प्रेसिडेंट अजित पोतदार यांना सन्मानाने मंचावर स्थानापन्न करण्यात आले. यावेळी प्रेसिडेंट रुपेश गुजरे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि तुमच्या सर्वांच्या सहकार्याने क्लबची वाटचाल अधिक प्रगत करण्यासाठी सदैव तत्पर राहीन, असे सांगितले तर सेक्रेटरी लायन मुकेश दामोदरे यांनी वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देत आभार मानले. या कार्यक्रमाकरिता क्लबचे सर्व डायरेक्टर लायन सुधीरशेट तेलवणे, लायन कमलेश कुंदर, लायन राजेश खम्बायत, हरनीश पटेल, राजेंद्र गांधी, अशोक अग्रवाल, आर. डी. कुलकर्णी, चंदू सावंत, संजय गुजरे, हिराशेट थेरानी, अनिता तेलवणे, मृदुला गांधी, अमेय आठवले, शरयू आठवले असे अनेक लायन्स मेंबर उपस्थित होते.

## शिळफाटा रस्त्यावरील टपऱ्या, गॅरेज, झोपड्यांवर कारवाई

कल्याण - कल्याण शिळफाटा रस्त्यावर दोन महिन्यांपासून कल्याण-तळोजा मेट्रोचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामांमुळे या रस्त्यावर वाहन कोंडी होत आहे. ही कोंडी टाळण्यासाठी शिळफाटा रस्त्यालगतच्या झोपड्या, गॅरेज, टपऱ्या, निवारे पालिकेच्या ई-प्रभागाच्या तोडकाम पथकाने जमीनदोस्त केले.

ही कारवाई करताना सोनरापाडा नेकणीपाडा बस थांब्याजवळ मुख्य वर्दळीच्या रस्त्याला खेटून तीन महिन्यांपूर्वी एका स्वयंघोषित शिवसेनेच्या कार्यकर्त्याने बांधलेल्या शिवसेना शाखेवर मात्र राजकीय दबावातून कोणतीही कारवाई न केल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ही शाखा जमीनदोस्त करावी म्हणून मागील तीन महिन्यांपासून नागरिक पालिकेकडे पाठपुरावा करत आहेत. परंतु डोंबिवली पश्चिमेतील एक राजकीय नेता या बांधकामाला अभय देत असल्याची चर्चा आहे.

शिळफाटा रस्त्यावर बहुतांशी टपऱ्या, निवारे हे राजकीय आशीर्वादाने बांधण्यात आले आहेत. या माध्यमातून राजकीय मंडळींची दर महिना व्यावसायिकांकडून सोय करण्यात येते, असे व्यावसायिक सांगतात. ही बांधकामे आता वाहतुकीला अडथळा ठरू लागल्याने ५० हून अधिक कच्ची बांधकामे तोडकाम पथकाने जमीनदोस्त केली. या रस्त्याच्या कडेला भंगार अवस्थेत उभी असलेली १० हून अधिक दुचाकी, मोटार वाहने जप्त करण्यात आली.

## अनधिकृत ढाबे आणि बारवर कारवाई सुरू

### महापालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांची माहिती

कल्याण - कल्याण-डोंबिवलीमध्ये अनधिकृत टपऱ्या, बार आणि ढाब्यांचे प्रमाण वाढले आहे. सर्रास अनधिकृत बार आणि टपऱ्या रस्त्यांवर सुरू आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार राज्यामध्ये कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे.



कल्याण-डोंबिवलीत देखील कारवाईला सुरुवात होत आहे. या संदर्भात केडीएमसी आयुक्त इंदुराणी जाखड, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ आणि उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थित बैठक पार पडली. या बैठकीत शहरात किती बेकायदा ढाबे, बार आहेत याची माहिती घेण्यात आली. यानंतर या बेकायदा बार, ढाब्यांवर कारवाईला सुरुवात झाली आहे, अशी माहिती आयुक्त जाखड यांनी दिली आहे.

यासंदर्भात आयुक्त इंदुराणी जाखड यांनी बैठक घेतली. या बैठकीमध्ये आयुक्तांनी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. कल्याणमध्ये एका हुक्का पार्लरचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्या संदर्भातील वृत्त प्रसारमाध्यमांमधून प्रसारित करण्यात आले होते. आता आयुक्त जाखड यांनी सांगितले की, संबंधित हुक्का पार्लर कल्याण पश्चिमेतील ब प्रभाग कार्यक्षेत्रातील आहे. याप्रकरणी संबंधित पोलीस अधिकारी, महापालिका अधिकारी, उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी यांच्याकडे त्वरित माहिती घेऊन कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

## भाजपतर्फे नेरुळमध्ये गुणवंतांचा घरोघरी जाऊन सत्कार

नवी मुंबई - भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक-९६/९७ द्वारे सालाबादप्रमाणे यंदाही इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन सत्कार करण्याचे अभियान गुरुवारपासून (२७ जून) सुरू झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचा घरोघरी सत्कार करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा देताना त्यांच्या पालकांचेही भाजपद्वारे अभिनंदन करण्यात येत आहे. गुरुवारी नेरुळ सेक्टर-१६ मधील सर्व विद्यार्थ्यांचा घरोघरी जाऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नवी मुंबई भाजप चिटणीस गणेशदादा भगत, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष राजू तिकोणे, समाजसेविका उल्का राजू तिकोणे, समाजसेवक प्रदीप कल्शेट्टी, अशोक गांडाळ, विकास तिकोणे, सागर मोहिते, रवींद्र भगत, शशिकांत जगताप, मनोहर कातुर्ड, मयूर पवार, शुभम मोरे, सचिन दिघे, अरविंद इंगवले, अक्षय शिरगावकर, निशांत चिखले, विद्याधर मोरे आदी उपस्थित होते.

## पालिकेची अनधिकृत फेरीवाल्यांवर धडक कारवाई

मुंबई - बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाईचा धडाका सुरू केला आहे. 'फेरीवालामुक्त परिसर' मोहीमअंतर्गत १८ ते २४ जून या एका आठवड्यात विविध विभागांत अतिक्रमण निर्मूलन पथकाची कार्यवाही हाती घेतली आहे. या कार्यवाहीत फेरीवाल्यांकडून सुमारे ३ हजार साधनसामुग्री जप्त करण्यात आली आहे. त्यात ७१३ चारचाकी हातगाड्या, १ हजार ३७ घरगुती गॅस सिलिंडर आणि १ हजार २४६ स्टॉल व इतर विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे.

मुंबईकर नागरिकांना पदपथ आणि रस्त्यांचा वापर करताना अडथळा ठरणाऱ्या तसेच आरोग्यासाठी अपायकारक अशा पद्धतीने उघड्यावर अन्न-पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सातत्याने कारवाई केली जाते. मुंबई महानगरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईविषयी समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासन आणि मुंबई पोलीस यांची संयुक्त बैठक पालिका मुख्यालयातील सभागृहात गुरुवारी सायंकाळी पार पडली. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी हे अध्यक्षस्थानी होते.

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यांवर कठोर करावी, अनधिकृत फेरीवालेमुक्त मुंबई करावी, जेणेकरून मुंबईकर नागरिकांना मोकळा श्वास घेता येईल, पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे करावेत, असे स्पष्ट निर्देश बृहन्मुंबई पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. त्यानुसार, अतिक्रमण निर्मूलन कारवाईला अधिक वेग देण्यात आला आहे. मुंबईतील पदपथ नागरिकांना वापरासाठी नियमितपणे उपलब्ध राहावेत तसेच आरोग्याच्या दृष्टीने दर्जेदार अन्न मुंबईकरांना मिळावे, उघड्यावर व अस्वच्छ रितीने अन्नपदार्थ विकणाऱ्यांवर वचक राहावा, यासाठी सातत्याने ही मोहीम राबविण्यात येईल, अशी माहिती उपायुक्त (विशेष) किरण दिघावकर यांनी दिली.

## कर्करोगग्रस्त रुग्णाला शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांची तातडीची मदत

कल्याण - कल्याण पूर्वेतील सिद्धार्थनगरमधील आर्थिकदृष्ट्या गरीब केदारे कुटुंबातील दिनेश केदारे (५५) हे कर्करोगाने त्रस्त आहेत. त्यांना तातडीच्या औषधोपचारासाठी शिवसेनेच्या शिंदे गटाचे शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. या मदतीमुळे केदारे कुटुंबाला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. दिनेश केदारे यांच्यावर लोअर परेल, मुंबई येथील टाटा कॅन्सर रिसर्च आणि औषधोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्यावर योग्य ते औषधोपचार करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने सुमारे १० लाखांचा खर्च सांगितला आहे. हा खर्च मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता निधीतून मिळवून देण्याचे आश्वासन महेश गायकवाड यांनी त्यांच्या कुटुंबाला दिले आहे. त्यांनी तातडीची मदत म्हणून ५० हजार रुपयांचा धनादेश केदारे यांच्या कुटुंबाकडे सुपूर्द केला. महेश गायकवाड यांच्या या औदार्याप्रती केदारे कुटुंबाने त्यांचे आभार मानले.






## फेरीवाल्यांकडून उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली

### शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक, पालिका आयुक्तांना दिले निवेदन

नालासोपारा - वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीत नालासोपारा, वसई, विरारमध्ये फेरीवाल्यांकडून उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होत आहे. महानगरपालिका मात्र याकडे जाणीवपूर्व दुर्लक्ष करत आहे, असा आरोप शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून करण्यात आला आहे. यावरून शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेऊन निवेदन दिले. या भेटीत शहरातील अनधिकृत फेरीवाले, प्रलंबित जलजोडणी आणि विविध विकासकामांबाबत जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांसोबत चर्चा केली.

वसई-विरार शहर महापालिका हद्दीत फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक भागांत अतिक्रमण करून फेरीवाले



आपले बस्तान मांडत आहेत. पदपथ, रस्ते अडवून फेरीवाले बसत असल्याने पादचाऱ्यांना पदपथ व रस्त्यावरून चालणे अवघड होते. तसेच व्यापारी दुकानांनाही या सगळ्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे वाहतूक कोंडीही होते. ना फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांनी व्यवसाय करू नये, असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. रेल्वे स्थानक, उड्डाणपूल व पादचारी पुलाच्या १५० मीटर, तर धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था व रुग्णालयांच्या १०० मीटर परिसरात फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास उच्च न्यायालयाने मनाई केलेली आहे. विशेष म्हणजे फेरीवाल्यांना ते व्यवसाय करत असलेल्या ठिकाणी रात्री त्यांचे सामान, साहित्य ठेवता येणार नाही. त्याचबरोबर फेरीवाल्यांनी कुठे व्यवसाय करायचा या संदर्भातील नियम फेरीवाला धोरणानुसार ठरतील, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे. हे सर्व आदेश धाब्यावर बसविले जात आहेत.

## महिला तोल जाऊन समुद्रात पडली

मुंबई - मरीन ड्राइव्हवर एक धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. एक महिला तोल गेल्याने समुद्राच्या पाण्यात पडली. सदर महिला समुद्रात बुडत असल्याची माहिती मिळताच सीपीआर पोलिसांच्या पथकातील दोन जवानांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता भरतीच्या उंच लाटांमधून महिलेला वाचवत जीवदान दिले. मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीलेश बागुल यांनी याबाबत माहिती दिली.

गुरुवारी दुपारी पावणेतीन वाजताच्या सुमारास स्वाती कनानी (५९) ही महिला पाय घसरून समुद्रात पडली. सदर महिला सुंदर महल जंक्शनजवळीत समुद्रात बुडत असल्याचे तेथे असलेल्या दोन सीपीआर प्लाटूनमधील पोलिसांना कळले. हायटाईड असतानाही हे पोलीस स्वतःच्या जीवाची पर्वा न करता महिलेला वाचविण्यासाठी सरसावले. हे बचावकार्य २० मिनिटे चालले. रिंग, टायर आणि सेफ्टी रस्सीचा वापर करून या पोलिसांनी स्वाती कनानी यांना पाण्यातून बाहेर काढले. किरण अशोक ठाकरे आणि अमोल ज्ञानदेव दहिफळे अशी महिला वाचविणाऱ्या पोलिसांची नावे आहेत. खबरदारी म्हणून त्यांनी महिलेला जीटी रुग्णालयात दाखल केले.




**आनंद यात्री १४६**

**सायकल ४**

या सायकलमध्ये चेन (साखळी) असते. ही चेन मागच्या चाकाला ओढते आणि मग पुढील चाक पळू लागते. अर्थात सायकल सुरू होते. सायकलची चेन जोपर्यंत व्यवस्थित आहे, तोपर्यंत सायकल चालू राहू शकते... मानवी आयुष्यात ही चेन म्हणजे भगवंताची दोरी समजूया... जोपर्यंत त्याच्याशी त्यासाखळीच्या माध्यमातून असलेला संपर्क तुटत नाही, तोपर्यंत मनुष्य जिवंत आहे असे समजले जाते... त्यामुळे ही चेन, साखळी खूप मोलाची... पटतंय ना?

*आपला दिवस आनंदात जावो.*
*मस्त बिनधास्त चोवीस तास*
*आनंदाने जगण्याचा नित ध्यास.*

**- दास चैतन्य**

मुंबई चौफेर
मुंबई
शनिवार, २९ जून २०२४

# संपादकीय

## भारताने विविध क्षेत्रांतील स्वतःचे निर्देशांक तयार केले पाहिजेत

जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांतील विविध देशांचे रेटिंग निश्चित करण्याच्या उद्देशाने विविध आणि विशेष संस्थांद्वारे निर्देशांक तयार केले जातात. अलीकडच्या काळात, या परदेशी संस्थांद्वारे जारी करण्यात आलेल्या अनेक निर्देशांकांमध्ये भारताची स्थिती जाणीवपूर्वक चुकीची मांडण्यात आली आहे. या निर्देशांकांमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि आफ्रिकेतील गरीब देशांची स्थिती भारतापेक्षा चांगली असल्याचे वर्णन करण्यात आले आहे. उदाहरणार्थ, पश्चात्य देशांनी अलीकडेच जारी केलेल्या तीन निर्देशांकांची स्थिती पाहा. सर्वप्रथम, लिबरल डेमोक्रसी इंडेक्समध्ये भारताचे रँकिंग १०४ असे नमूद केले आहे आणि नायजेरियाला भारतापेक्षा वरचे स्थान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, हॅपीनेस इंडेक्समध्ये, भारत १२६व्या स्थानावर आहे, तर पाकिस्तान १०८व्या स्थानावर आहे, जेथे अति चलनवाढीमुळे तेथील नागरिकांना खूप त्रास होत आहे. प्रेस फ्रीडम नावाच्या आणखी एका निर्देशांकात भारताला १६१वे स्थान देण्यात आले आहे, तर एकूण १८० देशांचा या निर्देशांकात समावेश करण्यात आला आहे आणि अफगाणिस्तान १५२व्या क्रमांकावर आहे, म्हणजेच या सर्वेक्षणानुसार अफगाणिस्तानमध्ये प्रेस स्वातंत्र्याची स्थिती भारतापेक्षा वाईट आहे. तुलनेत चांगले आढळले. पाश्चिमात्य देशांतील परिस्थिती : या संस्था असे निर्देशांक तयार करून संपूर्ण जगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत.

तसेच भारतातील नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीवर पाश्चात्त्य देशांनी अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला होता. जसे की, या कडाक्याच्या उन्हाळ्यात निवडणुका का झाल्या, त्यामुळे सर्वसामान्य जनता मतदानासाठी घराबाहेर पडली नाही, ईव्हीएम मशीनमध्ये काही बिघाड आहे का, इत्यादी. पण, भारतीय मतदारांनी या लोकसभा निवडणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन पाश्चिमात्य देशांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. ना ईव्हीएम मशीनमध्ये कोणताही बिघाड आढळून आला, ना उष्णतेचा निवडणुकीवर परिणाम झाला. मागील निवडणुकीच्या तुलनेत सत्ताधारी पक्षाला काही कमी जागा मिळाल्या असल्या तरी देशात कोणत्याही प्रकारची घटना घडलेली नाही. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील निवडणुका शांततेत पार पडल्या. तसेच, विरोधी पक्षांना मागील निवडणुकीपेक्षा किंचित जास्त जागा मिळाल्या आहेत आणि त्यांनी निवडणूक निकालही स्वीकारला आहे. निवडणूक प्रक्रियेवर कोणतेही प्रश्न उपस्थित केलेले नाहीत. हे सर्व असूनही, २०२४ मध्ये पाश्चात्य देशांनी वेस्टर्न डेमोक्रसी इंडेक्समध्ये भारताला २७वे स्थान दिले होते आणि २०२३ मध्ये भारताचे रँकिंग ४१व्या क्रमांकावर घसरल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात या काळात देशात लोकशाही बळकट झाली असली तरी भारतीय लोकशाहीच पाश्चात्त्य देशांकडून धोक्यात आल्याचे बोलले जात आहे आणि एक प्रकारे भारतीय लोकशाहीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. खरे तर पाश्चात्त्य देशांतील काही शक्ती भारताच्या हिताच्या विरोधात काम करत आहेत आणि या शक्ती विविध निर्देशांक तयार करणाऱ्या संस्थांवर प्रभाव टाकण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत.

काही काळापूर्वी एका आंतरराष्ट्रीय संस्थेने ग्लोबल हंगर इंडेक्स जाहीर केला होता. या निर्देशांकात भारताच्या तुलनेत श्रीलंका, म्यानमार, पाकिस्तान, इथिओपिया, नेपाळ, भूतान इत्यादी देशांमध्ये उपासमारीची स्थिती चांगली असल्याचे सांगण्यात आले. म्हणजेच सर्वेक्षणात समाविष्ट १२१ देशांच्या यादीत श्रीलंका ६४व्या, म्यानमार ७१व्या, बांगलादेश ८४व्या, पाकिस्तान ९९व्या, इथिओपिया १०४ व्या आणि भारत १०७ व्या क्रमांकावर आहे. श्रीलंका, पाकिस्तान आणि म्यानमारसारख्या देशांमध्ये अन्नधान्यांचा प्रचंड तुटवडा आहे हे संपूर्ण जगाला माहीत आहे, त्यामुळे या देशांतील नागरिकांना दोन दिवस अन्न मिळणेही कठीण होत आहे. तर आज भारत अनेक देशांना खाद्यपदार्थ पुरवत आहे. मग हे निर्देशांक जागतिक स्तरावर कसे तयार केले जातात आणि जाहीर केले जातात? जगातील अनेक देशांना भारताची आर्थिक प्रगती आता सहन होत नसल्याची भावना व्यक्त होत असून, भारताबाबत असे निर्देशांक जाहीर करून जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

युद्धाच्या भीषणतेचा सामना करणाऱ्या इथिओपियामध्ये नागरिकांना भूक भागवण्यासाठी गवतासारखे जड पदार्थ खाऊन जीवन जगावे लागत आहे. या प्रतिकूल परिस्थितीत राहणाऱ्या नागरिकांची उपासमारीच्या बाबतीत भारतातील नागरिकांपेक्षा चांगली स्थिती असल्याचे म्हटले जाते. दुसरीकडे, भारतात, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत, ८० कोटी नागरिकांना केंद्र सरकारकडून दरमहा ५ किलो मोफत अन्नधान्य दिले जात आहे, जेणेकरून या लोकांना अन्नासंबंधी कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये. तरीही इथिओपियाच्या नागरिकांच्या तुलनेत भारतीय नागरिक भूक निर्देशांकात खूप कमी आहेत. आता अशा निर्देशांकांवर कोण विश्वास ठेवणार? या निर्देशांकाचे मूल्यांकन करण्यासाठी भारतातील १४० कोटी नागरिकांपैकी केवळ ३००० नागरिकांचा या सर्वेक्षणात समावेश करण्यात आला असल्याचेही सांगण्यात येत आहे. अशा प्रकारे सर्वेक्षणाचा नमुना तयार करताना भारतासारख्या प्रचंड देशासाठी अपुऱ्या संख्यांचा वापर करण्यात आला आहे. जागतिक स्तरावर विविध देशांचे सावरे डर्ड अँड पुअर या क्रेडिट रेटिंगवर काम करणाऱ्या संस्थेने अलीकडेच भारतीय अर्थव्यवस्थेचे मूल्यांकन करताना भारताबाबत आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवला आहे आणि असे म्हटले आहे की, ते भारताचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग अपग्रेड करण्याच्या उद्देशाने ते सातत्याने करत आहे. विकासाशी संबंधित विविध मापदंडांशी संबंधित डेटा आणि प्रयत्नांचा गांभीर्याने अभ्यास आणि विश्लेषण करणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि भारताची वित्तीय तूट कमी करणे. पुढील दोन वर्षांत वरील तीन क्षेत्रांत सातत्यपूर्ण सुधारणा दिसून आल्यास, भारताचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग सुधारले जाऊ शकते. सध्या, भारताचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग BBB- आहे, जी गुंतवणुकीसाठी सर्वात कमी रेटिंग श्रेणी मानली जाते. जर कोणत्याही देशाचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग अपग्रेड केले गेले तर त्या देशातील परकीय गुंतवणूक वाढू लागते, कारण या देशांतील गुंतवणूकदारांची भांडवली गुंतवणूक तुलनेने सुरक्षित मानली जाते. तसेच, चांगले सार्वभौम क्रेडिट रेटिंग असलेल्या देशांतील कंपन्यांना इतर देशांत भांडवल उभारणे केवळ सोपे नाही, तर घेतलेल्या कर्जावर कमी व्याज द्यावे लागते. कोणत्याही देशाचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग जितके चांगले असेल तितके त्या देशातील कंपन्यांना सर्वात कमी व्याजदरात कर्जे उभारणे सोपे जाते. पण स्टँडर्ड अँड पुअर्सला भारताचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग अपग्रेड करण्यासाठी दोन वर्षे का लागतात? जेव्हा या सर्व क्षेत्रात सतत सुधारणा स्पष्टपणे दिसून येते.

तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक विदेशी संस्था (जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, इ.) भारताच्या आगामी वर्षातील आर्थिक प्रगतीबद्दल खूप उत्साही आहेत आणि आर्थिक प्रगतीसह वित्तीय तूट कमी करण्यासाठी भारत सरकार सातत्याने प्रयत्न करत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत आहेत. तरीही, भारताचे सार्वभौम क्रेडिट रेटिंग अपग्रेड करण्यासाठी स्टँडर्ड अँड पुअरला अतिरिक्त दोन वर्षांची आवश्यकता आहे. जागतिक स्तरावर पाश्चिमात्य देशांच्या विविध संस्थांच्या भारताप्रति असलेल्या ईर्ष्येमुळे, आता वेळ आली आहे की, भारताने विविध मापदंडांवर आपले रेटिंग निश्चित करण्यासाठी स्वतःचे निर्देशांक विकसित करण्याचा विचार केला पाहिजे. कारण जागतिक स्तरावर पश्चात्त्य देशांइतकेच तयार होत असलेले निर्देशांक देखील भारताच्या संदर्भात परिस्थितीचे अचूक वर्णन करत नाहीत.

## पाच वर्षे संधी, पण आव्हानांनी भरलेला मार्ग

आपल्या २० वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत राहुल गांधी पहिल्यांदाच घटनात्मक पद भूषवणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींना त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळात पूर्ण बहुमत न मिळाल्याने आणि आघाडी सरकार चालवत असल्याने, राहुल गांधींना स्वतःला स्थापित करण्याची आणि सिद्ध करण्याची मोठी संधी आहे. त्यासाठी ते सज्ज झालेले आहेत. अर्थात अनेक वेळा रि-लाँच झालेले राहुल गांधी नवी जबाबदारी चांगल्या पद्धतीने सांभाळतील का? ज्या अपेक्षेने जनतेने त्यांच्या पक्षाला ९९ जागा दिल्या आहेत, त्या अपेक्षा ते पूर्ण करू शकतील का? या प्रश्नांची उत्तरे येत्या काही महिन्यांत मिळतील.

२०१३ मध्ये जयपूरमध्ये काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात राहुल गांधी यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. मग त्यांनी एक मार्मिक भाषण दिले आणि सत्तेला विष असे वर्णन केले. काँग्रेस त्यांना भावी नेता म्हणून प्रोजेक्ट करते. तथापि, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसची सर्वात कमी कामगिरी होती आणि ती ४४ जागांवर कमी झाली. तेव्हा मनमोहन सिंग सरकारच्या विरोधात सत्ताविरोधी लाट असल्याचे सांगत काँग्रेसने त्याचा बचाव केला होता. २०१९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राहुल गांधी यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी देशभरात काँग्रेसच्या प्रचाराचे नेतृत्व केले, पण पक्षाचा पुन्हा एकदा पराभव झाला. त्यांना ५२ जागा मिळाल्या. एकूणच राहुल गांधींचे नेतृत्व जनतेने नाकारले आणि राहुल गांधींनी अध्यक्षपदही सोडले. २०१९ नंतर राहुल गांधी काही काळ वनवासात गेले. पक्षाने त्यांना नेतृत्वासाठी विनंती केली, परंतु खूप आग्रह करूनही ते मान्य झाले नाहीत.

केंद्रात सलग १० वर्षे पूर्ण करत असलेल्या नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधातील सत्ताविरोधी लाटेचा फायदा घेण्यासाठी काँग्रेसने पुन्हा एकदा राहुल गांधींकडे पाहिले. जवळपास सर्व विरोधी पक्षांना सोबत घेऊन मोठी आघाडी स्थापन केली. या वेळी विरोधी आघाडीचे नेतृत्व कोणत्याही एका चेहऱ्यावर नव्हते, कारण राहुल गांधींसमोर निवडणूक लढवायची कोणाचीच इच्छा नव्हती, ही आणखी एक बाब आहे. मग काही प्रादेशिक पक्षांची स्वतःची बांधिलकी असते. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि पंजाबमध्ये अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. मात्र, काँग्रेस पक्षाने आपले नेते राहुल गांधी असल्याचे संपूर्ण निवडणुकीत स्पष्ट केले होते. राहुल गांधी यांनीही देशभरात जोरदार प्रचार केला.

काँग्रेस पक्ष गेल्या काही वर्षांपासून राहुल गांधींची जोरदार ब्रँडिंग करत आहे. भारत जोडो यात्रा असो किंवा भारत जोडो न्याय यात्रा असो, राहुल गांधींनी दक्षिणेकडून उत्तरेकडे आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे रस्त्याने देशाचे निरीक्षण केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून ते सरकारच्या विरोधात चांगलेच चिडलेले दिसले. त्यांची ती अस्ताव्यस्त वाढलेली दाढी, पांढरा टी-शर्ट आणि काळी पँट हीच त्यांची ओळख बनली. पांढरा टी-शर्ट आणि काळ्या पँटबाबत ते म्हणाले होते की, मला नेहमीच साधे कपडे घालायला आवडतात. म्हणूनच मी पांढरा टी-शर्ट घालतो. या पांढऱ्या टी-शर्टच्या किमतीबाबत सत्ताधारी भाजपच्या नेत्यांनी राहुल गांधींची टिंगल केली होती ही दुसरी बाब आहे, पण यावेळी राहुल गांधींनी मागे वळून पाहिले नाही हे महत्त्वाचे आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने तिसरी सर्वात वाईट कामगिरी केली हे खरे असले तरी राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस ९९ जागा जिंकून पुनरागमन करत आहे हे दाखवले. गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला विरोधी पक्षनेते होण्यासाठी पुरेशा जागा मिळवता आल्या नव्हत्या, त्यामुळे या यशाने त्यात नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

**लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीदरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी नव्या शैलीत दिसले. त्यानी पुन्हा एकदा पांढरा कुर्ता-पायजमा घातला. व्यवस्थित दाढी केली आणि सभ्यपणे ते सभागृहात आले. ही समाधानाची बाब आहे. त्यांची लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदी निवड होण्याच्या आदल्या रात्रीची वेशभूषा आणि दुसऱ्या दिवशीची वेशभूषा पाहता चांगला बदल त्यांच्यात झालेला दिसला, हा अनेक वर्षांपासून अपेक्षित होता.**



काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडल्सवर नजर टाकली, तर राहुल गांधींना पंतप्रधान म्हणून प्रोजेक्ट करण्याच्या इराद्याने काँग्रेस पुढे जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. लोकनेते म्हणून त्यांची ओळख निर्माण केली जात आहे. त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर उभे करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

राहुल गांधी यांच्याकडे विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी देण्यामागे काँग्रेसचा हा गेम प्लॅन आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण काँग्रेस एकवटलेली दिसते. मात्र, या निवडणुकांमध्ये काँग्रेसने जिंकलेल्या ९९ जागा केवळ राहुल गांधींच्या प्रचारामुळे किंवा चेहऱ्यामुळे जिंकलेल्या नाहीत. हे काँग्रेस पक्षाला चांगलेच ठाऊक आहे. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यांमध्ये काँग्रेस आघाडीसोबत निवडणूक लढवली. राजस्थानमध्येही काँग्रेसला हनुमान बेनिवाल, भारतीय आदिवासी पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी तडजोड करावी लागली, जिथे त्यांचे भाजपशी मतभेद आहेत. इंडिया आघाडीतील बहुतांश पक्ष काँग्रेसची जागा हिसकावून आपापल्या राज्यात उभे राहिले आहेत, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

राहुल गांधींसमोरील खरी आव्हाने आता सुरू झाली आहेत. आतापर्यंत ते घटनात्मक जबाबदारीशिवाय राजकारण करत होते. मात्र, २००४ ते २०१४ या काळात त्यांना मंत्री बनण्याची आणि पंतप्रधानपदाचीही संधी मिळाली, ती त्यांनी कधीही स्वीकारली नाही, म्हणजेच कोणतेही घटनात्मक पद घेण्याचे त्यांनी टाळले. येत्या ५ वर्षांत नरेंद्र मोदी सरकारला कोंडीत पकडण्याची चांगली संधी राहुल गांधींकडे आहे. यावेळी राहुल गांधी पूर्वीपेक्षा थोडे अधिक परिपक्व दिसत आहेत.

लोकसभेच्या आत आणि बाहेर ते थोडेफार फॉर्ममध्ये असल्याचे दिसून आले, परंतु काँग्रेसच्या रणनीतीकारांना सावधगिरीने पुढे जावे लागेल, कारण राहुल गांधी लोकसभा अध्यक्षपदाच्या पहिल्या चाचणीत फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत. लोकसभा अध्यक्षांची एकमताने निवड करण्याऐवजी त्यांनी त्यांच्या पक्षाचा उमेदवार उभा केला, ज्याची विरोधी उमेदवार म्हणून वर्णी लागली, ज्यावर ममता बॅनर्जी यांनी नाराजी व्यक्त केली. इंडी अलायन्सच्या एकात्मतेला प्रथम दरारा स्पष्टपणे दिसत होता. लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतविभागणीची संधी चालून आली, तेव्हा राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली विरोधकांची पिछेहाट झाली. कदाचित काँग्रेसला भीती वाटली असेल की २३३ जागांची संख्या कमी होईल. राहुल गांधी यांनी अध्यक्षपद एकमताने मान्य केले असते, तर त्यांनी सरकारकडून उपसभापतीपद घेतले असते, अशी शक्यता होती, पण आता ते फार कठीण दिसते आहे. आता केवळ आरोप-प्रत्यारोप करून राहुल गांधी राजकीय खेळ खेळू शकत नाहीत. त्यांना संपूर्ण तथ्ये आणि नियमांसह सरकारला घेरावे लागेल. नरेंद्र मोदी सरकारला पर्याय जनतेसमोर मांडावा लागेल. पुढील ६० महिन्यांत राहुल गांधींना मोठी संधी मिळणार आहे. जर एनडीए आघाडी सरकारने ५ वर्षांचा पूर्ण कार्यकाळ पूर्ण केला तर राहुल गांधी २०२९ मधील स्पर्धा अतिशय कठोर बनवू शकतात. तोपर्यंत राहुल गांधी इंडिया आघाडीला एकसंध ठेवू शकतील का, हा मोठा प्रश्न आहे, कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधकांच्या ऐक्यात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. राहुल गांधी पुढे सरकताना पाहून काँग्रेसच्या मैदानावर उभ्या असलेल्या प्रादेशिक पक्षांचा दृष्टिकोन काय असेल? हे पाहावे लागेल. यावेळी मिळालेल्या संधीचा फायदा राहुल गांधी कितपत करू शकतील? यावर जनता नक्कीच लक्ष ठेवेल.

**बिटवीन द लाइन्स**
प्रफुल्ल फडके - ९१५२४४८०५५
phadke.prafulla@gmail.com

## शोध नव्हे विसर

ईश्वर तिथेच आहे, जिथे तुम्ही आहात. तुम्ही आहात, तिथेच ईश्वर आहे. परमात्म्याने सर्वांना सर्व बाजूंनी घेरलेले आहे. आपण सर्व त्या ईश्वराच्या सागरातल्या मासोळ्या आहोत. आता मासोळी जर सागराला शोधायला बाहेर पडेल, तर खूप मोठ्या अडचणीत येईल ना? तीच गत आपली झालेली आहे. मुळात ईश्वराला शोधायचे कशा करता? तो अजिबात हरवलेला नाही. ईश्वर कधीच हरवला नव्हता आणि पुढेही कधी हरवणार नाही. ईश्वराचा जरासा आपल्याला विसर पडलेला आहे इतकेच. तुमच्या-आमच्या चारही बाजूला विचारांचे तरंग सतत उठत आहेत आणि त्या तरंगांमुळे आपली सर्व ज्ञानेंद्रिये अफेक्ट झालेली आहेत. त्यामुळे आपल्या डोळ्यांसमोरच्या सर्व गोष्टी आहेत तशा आपल्याला दिसत नाहीत. आपल्या कानावर पडणाऱ्या गोष्टी, त्या ज्या अर्थाने बोलल्या जातात, त्या अर्थाने ऐकू येत नाहीत. इतर ज्ञानेंद्रियांच्या बाबतीत सुद्धा हीच अवस्था आहे. त्यामुळे व्यक्ती आपल्या सोयीनुसार पाहतो, आपल्याला जे ऐकायचे आहे, तेच ऐकतो आणि सो ऑन. परिणामतः अर्थाचे अनर्थ होतात आणि सत्यातले तथ्य निघून जाते. विचारांचा चक्रव्यूह मन निर्माण करते, कारण विचार हे मनाचे भोजन आहे. मनाला भोजन मिळणे थांबले की, मनाचा अंत होतो. पण मनाला मरायचे नसते तर जगायचे असते. म्हणून मन विचारांची फसल काटत राहते.

हजारो वर्षांपासून तुमचे-आमचे कंडिशनिंग अतिशय चमत्कारिक आणि विक्षिप्तपरीतीने होत आले आहे. शाळेपासून विद्यार्थ्यांना आधी 'स्पर्धेच्या रस्त्यावर' मारून मुटकून ढकलले जाते आणि नंतर त्यांनाच एकमेकांशी प्रेमाने वागा, असे पाठ पढवले जातात. आपण नक्की काय शिकवत आहोत, हे त्या शिकवणाऱ्याला कळत नाही आणि आपण नक्की काय शिकत आहोत, हे त्या विद्यार्थ्याला समजत नाही. पण, शिकणे-शिकवण्याचा 'तमाशा' जोरात सुरू असतो. 'व्यक्तीने अष्टावधानी असावे' अशी शिकवण समाजातल्या घटकांवर लादणाऱ्या मूर्ख व्यक्तीचा ब्रेन तीन, चारदा तरी तपासून पहिला पाहिजे. व्यक्ती जे काही काम, जे काही कृत्य करत आहे, त्यात त्या व्यक्तीची पूर्ण उपस्थिती असणे आवश्यक आहे, असे भगवान बुद्ध, महावीर, संत कबीर सांगत आले आहेत, या बॅक ग्राऊंडवर सो कॉल्ड अष्टावधानी होण्याचा सल्ला देणाऱ्या विद्वान विदुषीला कोपरापासून नमस्कार केलेलाच योग्य असेल. पण, विशेष म्हणजे अशा मुढ जनानाच समाज डोक्यावर घेतो, हे मोठेच दुर्दैव आहे. असे विचित्र कोणाचेही फालतू विचार आणि सल्ले ऐकल्यामुळे व्यक्ती दुखवादी होऊन निगेटिव्ह विचारसरणीची होते. कारण, अष्टावधानी वगैरे सगळ्या मात्र अफवा आहेत आणि तसे न होता आल्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास डळमळीत होतो. स्वतः काही न करता दुसऱ्याला पराभूत करण्याची ही एक युक्ती आहे. असा विचार आणि आचार केवळ दुष्ट प्रवृत्तीचे लोक करू शकतात. या उलट 'चाहें जिधर से भी गुजरे, मीठी सी हलचल मचा दीजिए उम्र का हर एक दौर मजेदार हैं अपनी उम्र का मजा लिजिए। असा विचार समाजाला देण्याची नितांत आवश्यकता आहे.

**- चंद्रशेखर खेर, ९१३७४६४२९३**

## शिवसेना अपयशाच्या चक्रव्युहात (१९७५ ते १९८५)

**दखल**
**- विजय सामंत** 9819960303
Samantvijay369@gmil.com

*१९ जून १९६६ रोजी महाराष्ट्रातील समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांचे सुपुत्र आणि 'मार्मिक' साप्ताहिकाचे संपादक बाळ केशव ठाकरे यांनी मुंबईतील मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी 'शिवसेना' नावाची आक्रमक संघटना स्थापन केली. तेव्हापासून गेल्या ५८ वर्षांत मराठी माणूस आणि ठाकरे यांचे राजकारणापलीकडचे एक नाते तयार झाले. त्याच नात्याला तोडण्यासाठी २१ जून २०२२ रोजी शिवसेनेत सर्वात मोठे बंड झाले आणि शिवसेनेच्या संस्थापकाच्या वारसाकडून शिवसेनेची अधिकृत सूत्रे बंडखोरांच्या 'मुखिया'च्या हातात गेली. या ऐतिहासिक फुटीनंतर शिवसेनेत 'असली व नकली'चा कलगीतुरा असा काही रंगलाय की, शिवसेना संपविण्याची स्वप्ने बघणाऱ्यांना आनंदाच्या उकळ्या फुटताहेत, तर मराठी अस्मिता जपणाऱ्या व एकसंघ शिवसेनेला आपल्या राजकीय आयुष्याचा भाग मानणाऱ्या मराठी भाषिक जनतेला प्रचंड वेदना होताहेत. वर्तमान पिढीला अशा शिवसेनेच्या ५८ वर्षांच्या प्रवासाचा खरा इतिहास कळावा म्हणून त्याचा धावता आढावा घेणारी ही लेखमाला.*

१९७५च्या आणीबाणीच्या काळातील २१ महिन्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी इंदिरा काँग्रेसची प्रामाणिकपणे राजकीय सोबत केली. त्याबदल्यात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी तसेच संजय गांधी यांनीही शिवसेनेला सांभाळून घेतले. पण १९७७ सालच्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्ष २९५ जागा जिंकून बहुमताने केंद्रीय सत्तेत आल्याने शिवसेना पुन्हा राजकीय संकटात सापडली. एकीकडे केंद्रीय सत्तेत आलेले जनता पक्षाचे सरकार शिवसेनेवर डूख ठेवून होते. त्याला विशेष करून तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाईंना मुंबईतील मराठी अस्मितेचे प्रतीक असलेल्या शिवसेनेचा दरारा पसंत नव्हता. म्हणूनच तर जनता पक्षाचा विजयी मेळावा शिवाजी पार्कला घेतला होता, तेव्हा सभा सुटल्यावर जनता पक्षातील काही उतावीळ कार्यकर्त्यांनी शिवसेना भवनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.

दुसरीकडे केंद्रात सत्तेत आलेल्या या जनता पक्षाच्या लाटेच्या पूर्ण प्रभावाखाली शिवसेनेची पाठराखण करणारा मुंबई-ठाणे पट्ट्यातील मराठी समाजही येऊ लागल्याने शिवसेनेचा हक्काचा मतदार दुरावला जात होता. कारण शिवसेनेने आपला राजकीय पाठिंबा काँग्रेस पक्षाला दिला असल्याने काँग्रेस पक्षाबद्दल जनतेच्या मनात असलेल्या रागाचे परिणाम शिवसेनेलाही भोगावे लागत होते. पण म्हणून काही शिवसेनाप्रमुख व शिवसेनेने मराठी जागराचे आपले कार्य थांबविले नव्हते. जिथे मराठी भाषिकांवर अन्याय होई तिथे शिवसैनिक धावून जात असत. असे असूनही जनता पक्षाच्या राजकीय लाटेमुळे शिवसेनेचा दरारा चालेनासा झाला होता.

अशा राजकीय वातावरणात १९७८ साली राज्याची विधानसभा निवडणूक लागली. यावेळी शिवसेनाप्रमुखांनी 'एकला चलोरे'चा नारा देत मुंबई-ठाण्यात ३५ जागांवर उमेदवार दिले. या निवडणुकीत शिवसेनेने काँग्रेस व जनता पक्षावर कडाडून टीका केली. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. मुंबईत शिवसेनेच्या हाती भोपळा आला. तसाच प्रकार १९७८च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत झाला. ११७ जागांपैकी फक्त २१ नगरसेवक निवडून आले. मुंबईतील जनतेच्या मनात जनता पक्ष असा घट्ट रुतून बसला होता की, लोकसभा, विधानसभा आणि मुंबई महानगरपालिका या तिन्ही निवडणुकीत जनता पक्षाला मुंबईकरांनी भरभरून मते दिली.

शिवसेनेसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. काँग्रेस पक्षासोबतची मैत्री तोडली तरी जनता पक्षाच्या वादळामुळे शिवसेनेचा हक्काचा मतदार शिवसेनाप्रमुखांच्या आवाहनाला मानायला तयार नव्हता. शिवसेना राजकीय संकटात सापडली होती. तेव्हा अचानक १९७९च्या जुलै महिन्यात जनता पक्षातील एकी संपली आणि मोरारजी देसाई यांचे जनता सरकार अल्पमतात येऊन कोसळले. १९८०च्या जानेवारी महिन्यात लोकसभेच्या मध्यावर्ती निवडणुका लागल्या. यावेळी शिवसेनाप्रमुखांनी मुंबईत (वामनराव महाडिक) आणि ठाण्यात (सतीश प्रधान) हे दोन उमेदवार उभे करत बाकीच्या ठिकाणी पुन्हा काँग्रेस पक्षासोबत जात, 'इंदिराजींच्या हाताला साथ नि बाकीच्या पक्षांना हाणा सणसणीत लाथ' असे आवाहन केले.



१९८०च्या लोकसभा निवडणुकीत देशातील व महाराष्ट्रातील जनतेने इंदिरा गांधींना प्रचंड बहुमताने निवडून दिले. पण शिवसेनेचे दोन्ही उमेदवार पराभूत झाले. केंद्रात काँग्रेस पक्षाचे सरकार आल्याने शिवसेनेला थोडा दिलासा मिळाला. दिल्लीत काँग्रेस पक्षाची सत्ता येताच महाराष्ट्रातले मुख्यमंत्री शरद पवारांचे 'पुलोद' सरकार बरखास्त करण्यात आले. त्यामुळे १९८०च्या मे महिन्यात राज्यात विधानसभा निवडणुका लागल्या. तथापि, यावेळीही शिवसेनाप्रमुखांच्या समोर धर्मसंकट उभे राहिले होते. १९७७ साली जनता पक्षाची लाट होती, तर १९८० साली इंदिरा गांधींची लाट आली. या लाटेच्या राजकारणात शिवसेनेची 'झाकलेली मूठ सव्वा लाखाची' राहावी म्हणून शिवसेनाप्रमुखांनी शिवसेनेला विधानसभा निवडणुकीत न उतरवता इंदिरा काँग्रेसला पूर्ण सहकार्य करून त्याबदल्यात विधान परिषदेवर शिवसेनेचे दोन सदस्य पाठवायचे अशी राजकीय तडजोड केली.

महाराष्ट्रातही काँग्रेस बहुमताने सत्तेत आली. शिवसेनेला संकटकाळी सत्तेतच सहकार्य मिळण्याची राजकीय सोय झाली. मात्र शिवसेनाप्रमुख आतून चिंतेत होते. कारण शिवसेनेचा जनाधार घसरत चालला होता. शिवसेनेला पुन्हा स्वबळावर उभे करण्यासाठी पुन्हा एकदा मराठी अस्मितेचा जागर करण्याचे कार्यक्रम आखून शिवसैनिकांत चैतन्य आणण्याचे प्रयत्न शिवसेनाप्रमुखांनी सुरू केले. त्यासाठी बेळगावचा विषय हातात घेण्यात आला. त्याबरोबर गिरणी कामगारांच्या बाजूने शिवसेना उभी राहिली. त्यासाठी शिवसेनाप्रमुखांनी १९७५ पासून सुरू झालेली काँग्रेस पक्षाची मैत्री १९८२ साली तोडून टाकली. पण एवढे करूनही शिवसेनेचा सूर जमेना. मराठी अस्मितेच्या सोबत अजून एखादा राजकीय वैचारिक प्रवाह जोडण्याचा प्रयत्न करायला हवा. या विचारांनी शिवसेनाप्रमुखांना झपाटले. त्यासाठी त्यांनी १९८३ साली 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम (व्यवहारी समाजवाद)' चाचपून राहिला. शिवसेनेचे असे विचारमंथन चालू असताना ३१ ऑक्टोबर १९८४ साली पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या झाली आणि देशाचे राजकारणच बदलून गेले. अवघा देश काँग्रेसमय झाला.

डिसेंबर १९८४ लोकसभा निवडणुका लागल्या. यावेळी भाजपने शिवसेनेसोबत युती केली. पण त्यांचा धुव्वा उडाला तेव्हा मात्र भाजपने शिवसेनेला प्रांतवादी-जातीयवादी ठरवून ती युती तातडीने तोडली. १९८५ विधानसभा निवडणुकीत शिवसेना स्वबळावर ४५ जागा लढली. पण शिवसेनेचा पुन्हा धुव्वा उडाला. मुंबई-माझगावमधून शिवसेनेचे छगन भुजबळ हे एकमेव आमदार निवडून आले. १९७५च्या आणीबाणीपासून शिवसेना अपयशाच्या चक्रव्युहात अशी काही फसली की, त्यातून बाहेर पडण्याचा मार्गच सापडेना. १९८५च्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अपयशामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यथित झाले होते. १९७५ ते १९८५ या दहा वर्षांच्या काळात शिवसेना अपयशाच्या फेऱ्यात सापडली होती. तरीही यातून बाहेर पडत राजकारणाच्या प्रमुख आखाड्यात उतरण्याची तयारी शिवसेनाप्रमुखांनी १९८४ च्या जानेवारी महिन्यात शिवसेनेचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन भरवून शिवसेना नेत्यांत व शिवसैनिकांत सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न चालू होता. म्हणूनच १९८५च्या विधानसभा निवडणुकीत अपयश मिळाल्यावर एका क्षणासाठी व्यथित झालेले बाळासाहेब ठाकरे अपयशाच्या या चक्रव्युहात शिवसेना भेदरणारच या दुर्दम्य आशावादावर पुन्हा आपली राजकीय चढाई लढण्यास सज्ज होते.

**(भाग सहावा)**

हे दैनिक श्री अंबिका प्रिंटर्स अॅण्ड पब्लिकेशन्सकरिता मुद्रक-प्रकाशक श्री. प्रविण मुरलीधर शिंगोटे यांनी श्री अंबिका प्रिंटर्स अॅण्ड पब्लिकेशन्स, प्लॉट नं. ७, इंडस्ट्रियल इस्टेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई- ४०० ०१२ व श्री अंबिका प्रिंटर्स अॅण्ड पब्लिकेशन्स, प्लॉट नं. डी-२२२/१/बी, टी टी सी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, शिरवणे, डी. वाय. पाटील स्टेडियमसमोर, मुंबई-पुणे हायवे, नेरूळ (पू.), नवी मुंबई, ठाणे-४००७०६. येथे छापून २१५, नारायण उद्योग भवन, इंडस्ट्रियल इस्टेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई- ४०० ०१२ येथे प्रकाशित केले. ■ संस्थापक : स्व. मुरलीधर अनंता शिंगोटे ■*संपादक : प्रफुल्ल रघुवीर फडके ( *पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. *R.N.I. No. 59810/94.
■*दूरध्वनी : (०२२) २४७१५२०८/२१, फॅक्स नं.: २४७१५२३५. E-mail:choufer.mumbai@gmail.com.




जर आपण दोन मोरपिसे आपल्या देवघरात ठेवली, तर पती–पत्नींचे आपसातील मतभेद दूर होतील. तसेच जर पंचतत्त्वांचा घरात योग्य वापर होत नसेल व घरात नकारात्मक ऊर्जा जाणवत असेल, तर देवघरात पाच मोरपिसे ठेवल्यास त्याचे सुखद परिणामही लवकरच दिसून येतील. घराचे मुख्य दार जर उत्तर वा ईशान्य दिशेला नसेल वा मुख्य दारावर इतर कोणत्याही प्रकारचा वास्तुदोष येत असेल तर आपण आपल्या दाराच्या चौकटीवर एक बैठ्या श्रीगणेशाची प्रतिमा लावून त्यावर तीन मोरपिसे लावावीत. यामुळे वस्तुदोष कमी होईल. मोरपिसे एकमेकांना जोडून ७ वा ९ पिसांचा गोल पंखा बाजारातून आणून देवघरात शुक्ल पक्षात ठेवावा. एका आठवड्यानंतर तो उचलून बेडरूममध्ये आपल्या बेडच्या भिंतीवर सजावटीच्या रूपात लावावा. लवकरच पत्नी व मुलांमध्ये उत्तम कौटुंबिक ताळमेळ होऊन जीवन आनंदी होईल. जर आजार पिच्छा सोडत नसेल, घरात कोणते ना कोणते औषध येत असेल, तर गुरुवारी एक मोरपीस आपल्या मेडिकल पर्समध्ये ठेवावे. याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळतील.



# सर्वांचा विचार करून अर्थसंकल्प सादर केला – अजित पवार

मुंबई - मी दहाव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. आम्ही नवखे नाही. उद्या निर्णय घेतल्यानंतर अंमलबजावणीसाठी तेवढा फंड आपल्याकडे आहे का? सगळ्या गोष्टी त्यामध्ये बसत आहे का? हा सगळा विचार करत अर्थसंकल्प सादर केला. वीजमाफी द्यायची आमची इच्छा होती, विजेची माफी दिली आहे. लाभार्थींच्या खात्यात पैसे जाणार आहेत. गायीच्या दुधाला ५ रुपये मदत दिली. कापूस, सोयाबीन संदर्भात देखील आम्ही सांगितले. युवकांसाठी मदत केली आहे. ॲप्रेंटशिपमध्ये १० हजार रुपये मिळणार आहेत, असे अर्थसंकल्पावर बोलताना अर्थमंत्री अजित पवार म्हणाले.



अजित पवार म्हणाले की, मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना शिक्षणासाठी आता १०० टक्के उच्च शिक्षण मिळणार आहे. केंद्राच्या वाढीत देशाचा विचार केला तर राज्याचा हिस्सा १५ टक्क्यांच्या जवळपास आहे. आपले उद्दिष्ट ५० ते ६० हजार कोटींनी वाढत आहे. जीएसटी आणि महसूल संकलनात देखील वाढ होत आहे. अर्थसंकल्पात काही रक्कम कमी वाटत असली तरी पुरवणीत आम्ही ती रक्कम वाढवू. ठाणे, मुंबई आणि बृहन्मुंबईतील पेट्रोल-डिझेलचा दर कमी केला आहे. १६व्या वित्त आयोगात भरीव मदत आपल्याला मिळणार असल्याचे ते म्हणाले.

# अजित पवारांच्या अडचणी वाढणार?

## शिखर बँक घोटाळा प्रकरणात क्लीन चिटला ईडीचा विरोध

मुंबई - उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अडचणीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. अजित पवारांना आर्थिक गुन्हे शाखेने दिलेल्या क्लीन चिटला ईडीने विरोध केला आहे. क्लोजर रिपोर्टमुळे आमच्या तपासावर परिणाम होईल, असे म्हणत ईडीने कोर्टात हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. लवकरच या याचिकेवर सुनावणी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणात काही महिन्यांपूर्वी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने २५ हजार कोटींच्या शिखर बँक घोटाळा प्रकरणात न्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. यामध्ये कर्जवाटप आणि साखर कारखाने विक्रीमुळे बँकेला कोणतेही नुकसान झाले नाही. तसे पुरावे देखील नसल्याचे आर्थिक गुन्हे शाखेने म्हटले होते. तसेच लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यासह बँकेतील इतर ८० जणांना क्लीन चिट देण्यात आली होती. मात्र, आता ईडीने क्लीन चिटला विरोध केला आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या क्लोजर रिपोर्टवर आक्षेप घेत ईडीने पुन्हा न्यायालयात धाव घेतली आहे. क्लोजर रिपोर्टमुळे आमच्या तपासावर परिणाम होईल, असे ईडीने आपल्या अर्जात म्हटले आहे.


ईडीच्या या हस्तक्षेप याचिकेमुळे अजित पवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. राज्य सहकारी बँक म्हणजेच शिखर बँकेत हजारो कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप त्यावेळच्या विरोधी पक्षांकडून करण्यात आला होता. राज्यात भाजप सरकार पहिल्यांदा सत्तेत आल्यानंतर अजित पवार यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# पुणे पोर्शे अपघात प्रकरणात पोलिसांनी चुका केल्या - फडणवीस

पुणे - पुण्यातील कल्याणीनगर परिसरात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात पोलिसांपासून ते ससूनमधील डॉक्टरांनी आरोपी असलेल्या अल्पवयीन मुलाला वाचवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे हे प्रकरण चांगलेच गाजले होते, तसेच यावरून पोलीस खाते आणि गृहमंत्रालयावर जोरदार टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सभागृहात पोर्शे अपघात प्रकरणावर निवेदन दिले. पुणे पोर्शे अपघात प्रकरणात पोलिसांची पहिली चूक कुठे झाली, तर अपघातानंतर मुलाला पहाटे ३ वाजता पोलीस ठाण्यात आणण्यात आले, तेव्हा लगेच मेडिकलला पाठवायला पाहिजे होते. पण पोलिसांनी त्याला सकाळी साडेआठला मेडिकलला पाठवले. नॉर्मली पोलीस अपघातानंतर ३०४ कलम लावतात, पण तेव्हा पोलिसांनी ३०४ अ कलम लावले. त्याचा रेकॉर्ड केस डायरीत आहे. यावेळी आपले कर्तव्य न बजावणाऱ्या पोलिसांना निलंबित करण्यात आले, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानसभेत शुक्रवारी पुणे हिट अँड रन प्रकरणावर उत्तर देताना फडणवीस यांनी पोलिसांनी विशाल अगरवाल यांच्या अल्पवयीन मुलावर काही अपवाद वगळता योग्यप्रकारे कारवाई केल्याचा दावा केला. बालहक्क न्यायालयाने संबंधित अल्पवयीन मुलाबाबत निर्णय दिल्यानंतर पोलिसांनी न्यायालयाकडे एक अर्ज केला होता. अल्पवयीन मुलाने निर्घृणपणे हे कृत्य केले. त्याचे वय १७ वर्षे ८ महिने आहे. त्यामुळे बालहक्क न्यायालयाच्या कलम २० नुसार त्याला सज्ञान समजून हे प्रकरण कोर्टाकडे वर्ग करण्यात यावे, अशी विनंती पोलिसांनी सुरुवातीलाच केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निर्भया प्रकरणानंतर १७ वर्षांवरील व्यक्तीने थंड डोक्याने गुन्हेगारी कृत्य केल्यास त्याला सज्ञान म्हणून वागणूक देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे पोलिसांनी पावले उचलत सत्र न्यायालयाकडे याचिका दाखल केल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# हा थापांचा नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प –फडणवीस

मुंबई - अजित पवारांनी मांडलेला अर्थसंकल्प हा थापांचा नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प आहे. हा सर्वसमावेशक असून शेतकरी, महिला, युवा, मागासवर्गीय अशा सर्व घटकांच्या इच्छा पूर्ण करणारा आहे, अशी स्तुतीसुमने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उधळली. सरकारने दिलेली सर्व आश्वासने ही निर्धारित वेळेत पूर्ण केली जातील, असे आश्वासनही देवेंद्र फडणवीसांनी दिले.




निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेला हा थापांचा अर्थसंकल्प असल्याची टीका उद्धव ठाकरेंनी केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा अर्थसंकल्प हा सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणारा आहे. हा थापांचा नाही, तर मायबापांचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देणारा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत करणारा आणि युवांना रोजगार देणारा हा अर्थसंकल्प आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विरोधकांनी खोटे नरेटिव्ह पसरवून लोकसभेच्या काही जागा जिंकल्या, त्यावर आजचा अर्थसंकल्प पाहून विरोधकांचे चेहरे पडले. विरोधकांच्या बोलण्यात जोर नव्हता, त्यांचे चेहरे उतरले होते. ते केवळ टीका करत होते. हा अर्थसंकल्प इतिहास निर्माण करणारा असेल. यामध्ये आम्ही जे जे आश्वासन दिलेले आहे ते सर्व वेळेत पूर्ण करून दाखवू. हा निवडणुकीचा अर्थसंकल्प नव्हे तर निर्धाराचा अर्थसंकल्प आहे.

# भाजपने विधान परिषदेसाठी १० नावांचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला

मुंबई - लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी संपल्यानंतर लगेच सर्व राजकीय पक्ष विधान परिषद निवडणुकांच्या तयारीला लागले. जुलै महिन्यात ११ जागांसाठी विधान परिषदेची निवडणूक पार पडणार आहे. लोकसभेत काहीसा फटका बसल्यामुळे विधान परिषदेत महायुती नेमकी कोणाला संधी देणार आणि कसा डाव साधणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. त्यातच आता भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून विधान परिषदेसाठी काही नावांचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवल्याची माहिती समोर आली आहे. या यादीत पंकजा मुंडे, अमित गोरखे, परिणय फुके, सुधाकर कोहळे, योगेश टिळेकर, निलय नाईक, हर्षवर्धन पाटील, रावसाहेब दानवे, चित्रा वाघ आणि माधवी नाईक या नावांचा समावेश आहे.



जुलैमध्ये राज्यात ११ जागांसाठी विधान परिषदेची निवडणूक पार पडणार आहे. त्यासाठी सर्वच पक्षांनी जुळवाजुळव सुरू केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये विधान परिषद निवडणुकीवरून जोरदार खलबते सुरू झाली आहेत. ११ जागांपैकी तीन जागा महाविकास आघाडीला मिळतील, असा ठाम विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. याबाबत आपले गणित पक्के असल्याचे सांगून त्यांनी महायुतीचे आमदार फुटणार असल्याचे सूचक वक्तव्यही केले आहे.

**महायुती** – भाजप (१०३), शिवसेना (शिंदे गट) (३७), राष्ट्रवादी (अजित पवार गट) (३९), छोटे पक्ष (९) आणि अपक्ष (१३) असे एकूण २०१.

**महाविकास आघाडी** – काँग्रेस (३७), शिवसेना (ठाकरे गट) (१७), राष्ट्रवादी (शरद पवार गट) (१३), शेकाप (१) आणि अपक्ष (१) असे एकूण ६७.

एमआयएम (२), सप (२), माकप (१), शे.प. (१) असे तटस्थ ६ आमदार असे विधानसभेचे एकूण संख्याबळ २७४ आहे.

# महापुरुषांच्या अवमानाचे ठिकठिकाणी पडसाद

पुणे/कोल्हापूर - पुणे शहरात घडलेल्या महापुरुषांच्या अवमानाचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले. हिंदू संघटनांनी रस्त्यावर उतरून ठिकठिकाणी आंदोलन करण्यास सुरुवात केली. आंदोलनाची धग मुंबई, पुणे, नाशिकसह कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरात पसरली. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्येही हिंदू संघटनांनी आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांना आवरताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. यावेळी काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. मागील काही दिवसांपासून राज्यात महापुरुषांच्या अवमानाच्या घटना सातत्याने घडत आहेत. समाजकंटकांकडून महापुरुषांचे फोटो तसेच प्रतिमेची विटंबना केली जात आहे. पुण्यातील हडपसरमध्येही गुरुवारी अशीच घटना घडली. महापुरुषांचा अवमान केल्याचे समोर येताच हिंदू संघटना प्रचंड आक्रमक झाल्या. शुक्रवारी राज्यात ठिकठिकाणी हिंदू संघटनांनी आक्रमक आंदोलन केले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली.

# उरण स्थानकाच्या भुयारी मार्गात पाणीच पाणी

उरण - जानेवारी महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उरण-खारकोपर रेल्वे मार्गाचे उद्घाटन पार पडले, मात्र पहिल्याच पावसात नव्याने उभारण्यात आलेल्या उरण रेल्वे स्थानकात ४ ते ५ फूट पाणी साचल्याने भुयारी मार्गातून वाट काढताना प्रवाशांची तारांबळ उडाली.

खारकोपर ते उरण ही बहुप्रतीक्षित लोकल सुरू होऊन अवघे सहा महिने झाले आहेत. मात्र, शुक्रवारी झालेल्या जोरदार पावसामुळे उरणच्या स्थानकाच्या भुयारी मार्गात पाणीच पाणी झाले होते. गतवर्षी अशाच प्रकारे पाणी साचले असताना पाणी उपसण्यासाठी रेल्वेने वॉटर पंप लावूनही पूरस्थिती निर्माण झाली आहे. मागील वर्षी उरण व द्रोणागिरी (बोकडवीरा) या दोन्ही स्थानकांत पाणी साचल्याने लोकल सुरू होण्यापूर्वीच या मार्गावरील स्थानकांच्या कामांची पोलखोल झाली होती. उरण व द्रोणागिरी दोन्ही स्थानकांत पावसाळ्यात पाणी साचत असल्याने स्थानकातील विद्युत प्रवाहावर ही परिणाम होत आहे.

# आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या करिअर मार्गदर्शनाचा आयुष्यात चांगले निर्णय घेण्यात उपयोग – डॉ. इंदुराणी जाखड

कल्याण - ठाणे आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या प्रशिक्षकांनी दिलेल्या प्रशिक्षणाचा आयुष्यातील चांगले निर्णय घेण्यात उपयोग होईल, असे महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी म्हटले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजिलेल्या ‘करिअर मार्गदर्शन’ या कार्यक्रमात बोलताना डॉ. इंदुराणी जाखड यांनी हे प्रतिपादन केले.


शाळेत मुले शिकतात व महाविद्यालय विद्यार्थ्यांना घडविते, त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणानंतर पुढील प्रोफेशन निवडताना काळजीपूर्वक निवडावे, अशा सूचना त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिल्या. आपले कौशल्य व ज्ञान अद्यावत केले तर यश प्राप्ती फार दूर नाही. यशस्वी करिअरसाठी प्रथम स्वप्न बघायला शिकावे, सवयी चांगल्या असतील, तर यश लवकर मिळेल, आपले पॅशन ओळखायला शिका आणि योग्य करिअर निवडा? करिअरसाठी विचारपूर्वक आखणी करून आपले उद्दिष्ट्य निश्चित करा, असे त्या म्हणाल्या.

# ठाण्यात पावसाची संततधार

ठाणे - ठाणे शहरात गुरुवारप्रमाणे शुक्रवारी देखील पावसाची संततधार सुरूच होती. गेले काही दिवस हुलकावणी देणाऱ्या पावसाने पुन्हा दमदार आगमन केले. त्यामुळे शुक्रवारी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या सहा तासात १४.७१ मिमी पावसाची नोंद झाली, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या वतीने देण्यात आली. सकाळपासून रिमझिम सुरु असलेल्या पावसाचा जोर दुपारी २ नंतर वाढला. त्यामुळे दुपारी २.३० वाजता ४.३२ मिमी तर दुपारी ३.३० वाजता ६.३४ मिमी पावसाची नोंद झाली.

# पोकळ घोषणांचा जुमलेबाज अर्थसंकल्प - नाना पटोले

मुंबई - राज्यातील १२ ते १३ जिल्ह्यात अजून पाऊस पडलेला नाही, शेतकरी पावसाची वाट पाहात बसला आहे. पण मुंबईतील विधिमंडळात मात्र घोषणांचा पाऊस पडला आहे. अर्थसंकल्पात कोणत्या विभागाला किती निधी देणार याचा यात उल्लेख नाही. कृषी, पाटबंधारे, सामाजिक न्याय, गृहनिर्माण अशी विभागवार निधीची तरतूद नसणारा राज्याच्या इतिहासातील हा पहिला अर्थसंकल्प आहे. ज्या घोषणा केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी कितपत होईल याबाबत शंका असून, राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा बोगस, पोकळ घोषणांचा जुमलेबाज अर्थसंकल्प आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



# ‘जब चादर लगी फटने, तब खैरात लगी बटने’ - जयंत पाटील


मुंबई - देशातील लोकसभा निवडणुकीचा फटका इतका मोठा आहे की, एक म्हण आहे ‘जब चादर लगी फटने तब खैरात लगी बटने.’ आता चादर फाटली असल्याने सत्ताधाऱ्यांनी अर्थसंकल्पातून खैरात वाटायला सुरुवात केली आहे. यांना आता खात्री झाली आहे की, आपला पराभव निश्चित आहे. त्यामुळे हा शेवटचा प्रयत्न सरकारने केला आहे,’ अशा शब्दात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर टीका केली.



ते पुढे म्हणाले, ‘सरकारने केलेला हा प्रयत्न फक्त तीन महिन्यांसाठी आहे. कारण तीन महिन्यांनी आचारसंहिता लागेल. त्यामुळे त्यांना माहिती आहे की, पुढचे तीन महिने पैसे वाटप करायचे आहेत, बाकीचे नंतरचे आल्यावर बघतील. त्यामुळे हे एक बेजबाबदारपणे मांडलेले बजेट आहे. हा एक आकडेवारीचा खेळ आहे. यामध्ये पेट्रोल-डिझेलचा दर कमी करण्याचा फक्त आव आणला आहे आणि लोकसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने देखील हेच केले होते,’ अशा शब्दांत जयंत पाटील यांनी टीका केली.

# राज्याच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प - छगन भुजबळ

मुंबई - राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प आहे, अशी स्तुतीसुमने राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी उधळली आहेत.



अर्थसंकल्पावर आपली प्रतिक्रिया देताना भुजबळ म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरविण्याचा तसेच ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या माध्यमातून राज्यातील २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात राज्यातील शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला या सर्व घटकांना न्याय देणारा अर्थसंकल्प असून, यातून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे.

# डोंबिवली विभागीय कार्यालयातील जनता दरबारात प्राप्त तक्रारींचे त्वरित निराकरण करा – रमेश मिसाळ

डोंबिवली - डोंबिवली परिसरातील नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण जलद गतीने होण्यासाठी आता प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी दुपारी ४ ते ५ या वेळेत ६/फ प्रभाग कार्यालयातील समिती सभागृहात परिमंडळ-२ चे उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या अधिपत्याखाली जनता दरबाराचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने सोमवार (२४ जून) रोजी डोंबिवलीतील ६/फ प्रभाग कार्यालयातील समिती सभागृहात परिमंडळ-२ चे उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या अधिपत्याखाली जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. सदर जनता दरबारात विविध विषयांबाबत ११ नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, संबंधित तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याबाबत आदेश परिमंडळ-२ चे उपायुक्त रमेश मिसाळ यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

यासमयी कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, परिमंडळ २ च्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर, ६/फ प्रभागाचे सहा. आयुक्त भरत पवार, ८/ग प्रभागाचे सहा. आयुक्त संजयकुमार कुमावत, ७/ह प्रभागाचे सहा. आयुक्त राजेश सावंत, १०/ ई प्रभागाचे सहा. आयुक्त चंद्रकांत जगताप, ९/आय प्रभागाचे सहा. आयुक्त किशोर ठाकूर तसेच संबंधित प्रभागातील उपअभियंता व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता. डोंबिवलीतील नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा आता विभागीय स्तरावरच होणार असल्यामुळे तेथील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# मांडा-टिटवाळ्यात वीज वाहिनीवर झाड पडल्याने वीजपुरवठा खंडित

टिटवाळा - मांडा-टिटवाळा पश्चिम येथे २२ केव्ही प्रवाहित वीज वाहिनीवर भलेमोठे झाड कोसळल्याची घटना गुरुवारी संध्याकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली. यामुळे मांडा पश्चिम येथील वीजपुरवठा खंडित झाला.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, गुरुवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अचानक वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. यावेळी पश्चिमेकडे असणाऱ्या कल्याण तालुका टिटवाळा पोलीस ठाण्याजवळ रस्त्यावर असणारे भलेमोठे झाड उन्मळून पडले. सदरचे झाड हे याच ठिकाणाहून गेलेल्या महावितरणच्या २२ केव्हा प्रवाहित विजेच्या वाहिन्यांवर पडले. यामुळे मांडा पश्चिम येथील वीजपुरवठा खंडित झाला. तसेच या झाडाखाली काही दुचाकी व इतर वाहने अडकली. दुचाकींचे व इतर वाहनांचे यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच झाड रस्त्यावरच कोसळल्याने सदरचा रस्ता रहदारीसाठी पूर्णतः बंद झाला होता. या घटनेची माहिती मिळताच महावितरणचे मांडा ग्रामीण शाखेचे सहायक अभियंता घोडविंदे हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्काळ वीजपुरवठा खंडित करून वीज वाहिन्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर सुरू केले. याचवेळी टिटवाळा येथील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन दलाचे पथक देखील दाखल झाले. त्यांनी तत्काळ सदर उन्मळून पडलेले झाड काढण्यात सुरुवात केली. सुदैवाने यात कोणतीही जीवंत हानी झालेली नाही.

# रेमंड प्रकरणातील पीडित आदिवासी शेतकऱ्यांना अद्यापही न्याय नाही

## न्यायासाठी जिजाऊ संघटना उतरणार रस्त्यावर

ठाणे : ठाणे येथील पांचपाखाडी येथील सर्व्हे नं. १२७, १२८ अ / ब, १२९/१ या मूळनिवासी आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकी हक्काच्या शेतजमिनी सातबारा उतारा वारस हक्काने आदिवासी कुळाच्या नावावर असताना, या जमिनी बेकायदा बळकावण्यात आल्या असल्याप्रकरणी रेमंड कंपनीविरोधात अनेक वेळा आदिवासी बांधव आणि जिजाऊ संघटना यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे न्याय मागत कारवाईची मागणी केली होती. मात्र याबाबत या कार्यालयातून त्या कार्यालयात तर या अधिकाऱ्याकडून त्या अधिकाऱ्याकडे केवळ कागदी घोडे नाचवले जात आहेत. ४८ वर्षे उलटूनही अद्याप या प्रकरणातील पीडित आदिवासी हे न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. आदिवासींच्या बेकायदा जमीन हस्तांतरण प्रकरणी रेमंड समूहाला कोण पाठीशी घालतंय याची देखील सरकारने सखोल चौकशी करावी, अशी मागणी देखील पीडित आदिवासींसह जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष नीलेश सांबरे यांनी केली आहे.

वारस हक्काने आदिवासी कुळाच्या नावावर असलेल्या जमिनी बेकायदा बळकावून गैरमार्गाने गगनचुंबी इमारतींचे इमले उभारणऱ्या रेमंड समूहाविरोधात आदिवासी बांधवांना सोबत घेऊन अन्यायाविरोधात आवाज उठवत जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष नीलेश सांबरे यांनी महसूल प्रशासनाचे वाभाडे काढत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे न्यायाची मागणी केली होती. या जागेवर आदिवासी बांधवांचे वारस शेतजमीन कसत होते, तसेच ही जागा गुरे चरण्यासाठी राखून ठेवली होती. १९६० मध्ये या जमिनीची विक्री होऊन १९६१ मध्ये रेमंड मिल अस्तित्वात आली. हा संपूर्ण व्यवहार बेकायदा असून कुळ वहिवाटीनुसार मूळ आदिवासींच्या जमिनी त्यांच्या वारसांना मिळाव्यात यासाठी आदिवासी बांधवांच्या वतीने नीलेश सांबरे यांनी जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालत ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी निवेदन देत पीडित आदिवासी शेतकऱ्यांसह उपोषणाचा इशारा दिला होता. यावेळी अपर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये यांनी, संबंधित प्रकरणात ठाणे तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडून एका महिन्यात वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त करून शासनास सादर करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले.

मात्र त्यानंतर याबाबत कुठलाच अहवाल सादर न केल्याने याबाबत नीलेश सांबरे यांनी १९ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग यांच्याकडे याबाबत न्याय मिळावा यासाठी एक जनहित याचिका दाखल केली होती. याची दखल घेत राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग यांनी एका पत्राद्वारे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना १५ दिवसात या प्रकरणाची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले होते. तसे न केल्यास राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगासमोर स्वतः जिल्हाधिकारी यांना उपस्थित राहून याबाबतचा खुलास द्यावा लागणार असल्याचे या पत्रात म्हटले होते. तर या प्रकरणाची दखल घेत राष्ट्रपती यांनी देखील तातडीने संबंधित विभागांना चौकशीचे आदेश दिले होते.

याबाबत न्यायालयात याचिका दाखल केलेली असताना, तसेच यासंदर्भात राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, आदिवासी आयोग, आदिवासी विकास विभाग, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग यांना याबाबत पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांनी चौकशीचे आदेश देत कारवाई करण्यासाठी लेखी पत्र येऊन देखील जिल्हाधिकारी ठाणे, संबंधित विभाग यांच्याकडून आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या संपूर्ण प्रकरणाबाबत जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष नीलेश सांबरे यांनी पुन्हा एकदा भारताचे मुख्य न्यायाधीश, राष्ट्रपती तसेच पंतप्रधान यांना एक स्मरणपत्र पाठवून पीडित आदिवासींच्या वतीने पाठवण्यात आलेल्या निवेदन पत्रांचा गांभीर्याने विचार करून या संवेदनशील विषयात आपण व्यक्तिशः लक्ष घालावे, तसेच संबंधित विभागांना त्वरित चौकशीचे आदेश देऊन दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देऊन पीडित आदिवासी बांधवांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.


**उत्तर मध्य रेल्वे**

**ई-टेंडरिंग निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्याकरिता विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), उ.म. रेल्वे, झाशी यांच्याद्वारे खालील कामाकरिता केवळ ऑनलाइन (ई–निविदा) द्वारे ''खुली निविदा'' आमंत्रित करीत आहेत.

| | |
|---|---|
| **ई–निविदा क्र. : जेएचएस–अभि.–एचक्यू–२०२४–८४** | **अंदाजे रक्कम : ७५०००००.००** |

**कामाचे वर्णन :** वर्ष २०२४–२५ करिता एडीईएन/एचक्यू–१/झाशीअंतर्गत दुरुस्ती आणि परिरक्षण कार्य आणि सामग्रीच्या पुरवठ्यासाठी वार्षिक विभागीय कंत्राट. झोन क्र. २सी जेएचएस (ईएक्ससीएल) ते पीआरएन (ईएक्ससीएल)

**इसारा रक्कम : १५००००.००, निविदा बंद होण्याची तारीख : १९.०७.२०२४ रोजी १५.०० वा. स्वीकृतीपत्र जारी झाल्यापासून पूर्तता/कालावधीची तारीख : १२ महिने.**

● दि. १९.०७.२४ रोजी १५.०० वा. पर्यंत ऑनलाइन निविदा सादर करता येऊ शकेल. ● संपूर्ण तपशील आणि बोली सादरीकरणासाठी कृपया संकेतस्थळ www.ireps.gov.in वर पाहू शकता.

1115/24 (D)

North central railways www.ncr.indianrailways.gov.in @northcentralrailway @ CPRONCR

मुंबई चौफेर
मुंबई
शनिवार, २९ जून २०२४

सूर्योदय 06.04 | सूर्यास्त 07.20

## नवी मुंबई परिवहनच्या बसेसना गळती

नवी मुंबई – नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यातील पर्यावरणपूरक बसेससह साध्या बसेसना पावसामुळे गळती लागली आहे. त्यामुळे एनएमएमटीच्या बसेसमधून प्रवास करताना गळतीपासून बचाव करण्यासाठी प्रवाशांवर अंग चोरून बसण्याची अथवा छत्री उघडून बसण्याची वेळ आली आहे. १९९६ मध्ये नवी मुंबई महापालिकेची परिवहन सेवा सुरु झाली. २५ बसेसपासून सुरुवात केलेल्या परिवहन उपक्रमात ५०० पेक्षा जास्त बसेस ताफ्यात आहेत. त्यामध्ये डिझेलवर चालणाऱ्या साधारण ६७ व्हॉल्हो वातानुकूलित बसेसचा देखील समावेश होता. कालांतराने प्रदूषणाचा मुद्दा समोर आल्याने पालिकेकडून विजेवर चालणाऱ्या पर्यावरणपूरक १९५ बसेसचा समावेश मागील ४ ते ५ वर्षांपासून टप्प्याटप्प्याने करण्यात आला. या बसेस दिसायला आकर्षक असल्याने नवी मुंबई शहराच्या सौंदर्यातही चांगलीच भर पडली. परंतु या बसेसना पावसाळ्यात पाणी गळतीचे ग्रहण लागले आहे.

| Weather | कमाल | किमान |
|---|---|---|
| सांताक्रुझ | 31.6 | 24.9 |
| कुलाबा | 31.4 | 24.4 |

पान १ वरून

# राज्याच्या अर्थसंकल्पातून महिला, शेतकरी, युवकांना दिलासा

### शेतकऱ्यांसाठी विविध योजना

● नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रुपयांची मदत.

● नोव्हेंबर - डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत.

● नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करून राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत.

● खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ, तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू.

● नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू.

● नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान.

● एक रुपयात पीक विमा योजनेअंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा.

● गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप

● महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या१४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरित.

● नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबविण्यात येणार.

● मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजुरी- सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ.

● विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थींना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा.

● राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षांत २ लाख १४ हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान

● गाव तेथे गोदाम या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती.

● कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना- सन २०२४-२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी.

● आधारभूत किमतीनुसार खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी

● खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य

● कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२३-२४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान.

● कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी.

● खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान.

● नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरित, राहिलेले अनुदानही त्वरित वितरित करणार.

● दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै,२०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार.

● पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नवउद्योजक निर्माण करण्याकरिता नवीन दुग्ध व्यवसाय उद्योजकता प्रकल्प.

● शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प.

● मत्स्यबाजार स्थापना तसेच मासळी विक्री सुविधांसाठी ५० कोटी रुपये निधी.

● अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खासगी क्षेत्रावर बांबूची लागवड - प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान.

● राज्यातील पडिक जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड - नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड.

● वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जीवितहानी- नुकसानभरपाईच्या रकमेत २० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपयांवरून ७ लाख ५० हजार रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजारांवरून ५ लाख रुपये, किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ, शेतीपिकाच्या नुकसानभरपाईकरिता देय रकमेच्या कमाल मर्यादेतही २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ.

● सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम- १०८ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता - दोन वर्षांत ६१ प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित- सुमारे ३ लाख ६५ हजार हेक्टर सिंचन क्षमता.

● महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम- १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा -येत्या तीन वर्षांत. त्यामुळे सुमारे ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ.

● विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसाहाय्य.

● म्हैसाळ जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौरऊर्जा प्रकल्प - अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये- सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ

● स्वच्छ व हरित उर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-शिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौरऊर्जीकरण -४ हजार २०० कोटी रुपये खर्च

● वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प- नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ

● कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पुरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने तीन हजार २०० कोटी रुपये किमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम

● जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण - ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद

● 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत एकूण ३३८ जलाशयांतून ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला. ६ हजार शेतकऱ्यांना लाभ.

● मागेल त्याला सौरऊर्जा पंप- शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी सौरऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प -एकूण ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना सौरऊर्जा पंप उपलब्ध करून देण्यात येणार.

### युवा वर्गासाठी विविध योजना

● मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना- दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना' - प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन -दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रुपये खर्च.

● शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण

● जागतिक बँक साहाय्यित २ हजार ३०७ कोटी रुपये किमतीचा 'मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्य विकास' - ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ, मॉडेल आय.टी.आय., जागतिक कौशल्य केंद्र, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डेटा सेंटर अशा विविध संस्थांचे बळकटीकरण.

● मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे, येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यास मान्यता

● पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मेळाव्यातून सन २०२३-२४ मध्ये ९५ हजार ४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड

**'स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी' मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित – ग्रामीण भागात ५११ 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र' स्थापन – १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण**

● आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) इत्यादी संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण- ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त.

● संशोधन व नवउपक्रम केंद्रांसाठी विद्यापीठ व शासनाकडून प्रत्येकी ५० कोटी असा एकूण १०० कोटी रुपयांचा निधी.

● शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार अर्थसाहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद.

● अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठीदेखील सन २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू.

● इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता.

● गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी ८२ शासकीय वसतिगृहे स्थापन करण्यास मंजुरी.

● राज्यात सध्या असलेले १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टरचे प्रमाण सन २०३५ पर्यंत हे प्रमाण १००हून अधिक करण्यासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता.

● मौजे सावर, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता, बुलढाणा जिल्ह्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय.

● शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ निवासी डॉक्टर यांच्या विद्यावेतनात तसेच मानसेवी अध्यापकांच्या मानधनात भरीव वाढ

● थ्रस्ट सेक्टरमध्ये अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक- ५० हजार रोजगार निर्मिती

● हरित हायड्रोजन- २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक- ५५ हजार ९०० रोजगार निर्मिती.

● महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी पार्क' नियोजित- २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश- ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक - एक लाख रोजगार निर्मिती

● एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८- पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक- ५ लाख रोजगार निर्मिती

● खासगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु-वस्त्रोद्योग संकुले तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार.

● सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग केंद्र- २० कोटी रुपये खर्च अपेक्षित - ८०० स्थानिकांना रोजगार

### दुर्बल घटकांसाठी विविध योजना

● सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसे करणे हे शाश्वत विकास ध्येय साध्य करण्याचा निश्चय

● संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून निराधार, विधवा, दिव्यांग तसेच वृध्द नागरिकांच्या दरमहा अर्थसहाय्यात वाढ- एक हजारावरून दीड हजार रुपये अशी वाढ - सन २०२३-२४ मध्ये ४५ लाख ६० हजार लाभार्थींना ७ हजार १४५ कोटी रुपये अनुदानाचे वाटप

● पान, पानपिंपरी आणि मुसळीचे उत्पादन करणाऱ्या बारी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी संत श्री रूपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना

● नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तसेच कार्यरत महामंडळांसाठी निधीची पुरेशी तरतूद

● दिव्यांग व्यक्तींसाठी 'धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना' - पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरकुल बांधणार- दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रिक वाहनाचे वाटप करणार

● तृतीयपंथी धोरण-२०२४ जाहीर-भरती प्रक्रियेमध्ये तसेच सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री-पुरुषांसोबतच 'तृतीयपंथी' हा लिंग पर्याय उपलब्ध- तृतीयपंथींना राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ

● धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी खारघर, नवी मुंबई येथे चार हजार चौरस मीटरचा भूखंड.

● महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण महामंडळामार्फत नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना

● मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये

● महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांना लागू.

● आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम प्रतिकुटुंब १ लाख ५० हजार रुपयांवरून ५ लाख रुपये - एक हजार ९०० रुग्णालयांमार्फत एक हजार ३५६ प्रकारचे उपचार उपलब्ध.

● हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ३४७ ठिकाणी कार्यान्वित

● पतसंस्थांच्या स्थिरीकरण व तरलतेसाठी १०० कोटी रुपये निधी

● प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी, पारधी व आदिम आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनांच्या माध्यमातून पुढील ५ वर्षात ३५ लाख ४० हजार ४९१ घरकुल बांधण्यात येणार.

● सन २०२४-२५ मध्ये विविध घरकुल योजनांकरिता ७ हजार ४२५ कोटी रुपयांची तरतूद

● बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गिरणी कामगारांना १२ हजार ९५४ सदनिका वितरित-उर्वरित सदनिका उपलब्ध करून देण्याचे नियोजन.

● सन २०२४-२५ साठी स्वच्छ भारत अभियान ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १ हजार ८८६ कोटी ८४ लाख निधीची तरतूद

● पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजना

● मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता -१२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या - या वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार

● शिवडी-वरळी जोडरस्त्याचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्यात येणार.

● ठाणे किनारी मार्ग- लांबी १३.४५ किलोमीटर - ३ हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित

● प्रधानमंत्री ग्रामसडक योजना- तिसऱ्या टप्पात-सुमारे ६ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांचे उद्दिष्ट -२ हजार ३०३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण

● मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार

● भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद.

● संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना तसेच यशवंतराव होळकर जोडरस्ते योजनेची लवकरच अंमलबजावणी.

● १९ महानगरपालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबविण्यात येणार.

● ड वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी ६१५ कोटी रुपयांची योजना राबविण्यात येणार

● धमार्दाय आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या मुंबई, नंदुरबार, नांदेड, वर्धा, अमरावती आणि कोल्हापूर येथील इमारतींच्या बांधकामासाठी तसेच अस्तित्वातील इमारतींच्या नूतनीकरणासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी

● मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत 2 हजार ५६७ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली आहे.

● जागतिक वारसा नामांकनासाठी शिवकालीन १२ किल्ल्यांचा युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविला, कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठविण्यात येणार.

● शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करणार.

● वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे ६६ कोटी रुपये अंदाजित किमतीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पाणबुडी प्रकल्प

● सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर.

● कल्याण-नगर मार्गावर माळशेज घाटात सर्व सोयींनी युक्त अत्याधुनिक व्ह्युईंग गॅलरी उभारण्यात येणार.

● नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार

● आध्यात्मिक गुरू तथा समाजसुधारक महान त्यागी बाबा जुमदेवजी यांचे स्मारकासाठी पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथे विकास ७७ कोटींचा आराखडा तयार करणार.

● संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीची जिथे रचना केली त्या नेवासा येथील मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करणार.

● कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाकाठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार.

● बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बहुउद्देशीय सभागृह उभारण्याकरिता तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव-काळे तालुका जिल्हा लातूर या शैक्षणिक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आवश्यक निधी उपलब्ध करून देणार.

● छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिराळा, जिल्हा सांगली येथे त्यांचे स्मारक उभारणार

● संत श्री रुपलाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येणार

● आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृध्दी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येईल.

● मुंबई येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या ३०५ कोटी रुपये किमतीच्या आराखड्यास मान्यता

● जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढवून विकासाला चालना देण्यासाठी महास्ट्राईड हा २ हजार २३२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प जागतिक बँकेच्या साहाय्याने राबविण्यात येणार.

● मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना- राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरवली जाणार- १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार.

● राज्यातील सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थींपर्यत थेट पोहोचावे यासाठी योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार

### एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी

● सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय

● वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये

● अनुसूचित जाती उपयोजनेकरिता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरिता १५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्यय

● सन २०२४-२५मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद

● महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये, महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये.

● महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये.


बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन

ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) ''१) विविध महानगरपालिका रुग्णालयांच्या वापरासाठी भाड्याने आधारावर–२० आसनी–२ नग कर्मचारी बसेसचा पुरवठा, (गट–अ) आणि २) विविध महानगरपालिका रुग्णालयांच्या वापरासाठी भाडे आधारावर–(४० आसनी–२ नग आणि ५० आसनी–१ नग) कर्मचारी बसेसचा पुरवठा करण्यासाठी ऑनलाइन निविदा मागवीत आहेत. (गट – ब).''

बोली एमसीजीएमच्या पोर्टलवरून (http://portal.mcgm.gov.in) ''ई-प्रापण'' विभागांतर्गत डाऊनलोड केल्या जाऊ शकतात.

बोली सुरू होण्याची तारीख आणि वेळ २८.०६.२०२४ रोजी ११.०० वा. नंतर आणि बोली समाप्ती तारीख ०४.०७.२०२४ रोजी दुपारी ०४.०० पर्यंत.

इच्छुक बोलीदारांनी निविदेच्या अधिक तपशिलांसाठी महापालिकेचे संकेतस्थळ http://portal.mcgm.gov.in पोर्टलला भेट द्यावी. बोली दस्तऐवज पोस्टाने जारी किंवा प्राप्त होणार नाही.

हस्ता./-
का. अभि. वाहतूक (शहर)

पीआरओ/३२८/जाहि./२०२४-२५

कोणताही ताप असू शकतो हिवताप



उत्तर मध्य रेल्वे

ई-प्रापण निविदा सूचना क्र. : २४/४४ दिनांक : २५.०६.२०२४

ई-प्रापण निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापक, उत्तर मध्य रेल्वे, प्रयागराज (आयएसओ ९००१-२०१५ प्रमाणित विभाग) हे खालील बाबींकरिता ई-प्रापण निविदा आमंत्रित करीत आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | संक्षिप्त विवरण | परिमाण | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०२४४०३३डी | एलिमेंट फिल्टर टर्बो सोक बॅक | ४० नग | २४.०७.२०२४ |
| २ | ६३२४५१००ए | ड्रॉ. क्र. आरडीएसओ टी-५९१९ नुसार इलास्टिक रेल क्लिप एमके-व्ही | ८३६७०२१ नग | १५.०७.२०२४ |
| ३ | ६३२३५१२५डी | आरडीएसओ ड्रॉ. क्र. टी-४२१८/टी-४७३२ नुसार बीजी फॅन शेप्ड टर्न आऊट १ इन १२ करिता प्रीस्ट्रेस्ड मोनोब्लॉक काँक्रिट स्लीपर्स सेटचे (प्रीटेन्शन्ड टाइप) उत्पादन व पुरवठा | ८३५ संच | १८.०७.२०२४ |
| ४ | ६४२४५१०६ए | हायड्रॉलिक प्रेशर व्हॉल्व्ह | ५४ नग | २४.०७.२०२४ |
| ५ | ६४२४५१६२ | हायड्रॉलिक डमी | ३५७ नग | २५.०७.२०२४ |
| ६ | ६४२४५१३६ | हायड्रॉलिक मोटर | ०१ नग | ०५.०८.२०२४ |
| ७ | ६४२४५०८४ए | फिल्टर एलिमेंट | ३२ नग | २४.०७.२०२४ |
| ८ | ३०२३२४९३बी | डब्ल्यूएसपी एफटीआरटीआयएलकरिता एन २ बोर्ड | २१ नग | १५.०७.२०२४ |
| ९ | ३०२४२४५९ए | एफआरपी विन्डो असेम्ब्ली (२ फूट रुंद) | ६१९ नग | १५.०७.२०२४ |
| १० | ३०२४१७४० | फीड पाइपकरिता एअर ब्रेक होज कपलिंग | ३०३०४ नग | २९.०७.२०२४ |
| ११ | ३८२४२४४९ | टॉप हाऊसिंग | ४५०७ नग | २९.०७.२०२४ |
| १२ | २०२४३६३४ | न्यूट्रल रबर गॅसकेटचा संच | ६१ संच | २२.०७.२०२४ |
| १३ | २०२४३६६० | रोटर स्टॅम्पिंगचा संच | ८३ संच | २४.०७.२०२४ |
| १४ | २०२४१७८१ | एचव्ही ओव्हरलोड रिले (क्यूएलएम) | २५ नग | २२.०७.२०२४ |
| १५ | २०२३५०१७ए | ट्रॅक्शन मोटर आर्मेचर कम्प्लिट | ०६ नग | २४.०७.२०२४ |
| १६ | २०२४३३४९ | आर्मेचर शाफ्ट | ३६ नग | २४.०७.२०२४ |
| १७ | २०२४२६७४ए | टीएमटाइप एचएस १५२५०ए करिता मशीन्ड आयटेम्सचा संच | ४१ संच | २४.०७.२०२४ |

टीप : वरील सर्व ई-प्रापण निविदांचे संपूर्ण विवरण आयआरईपीएस वेबसाइट https://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. निविदेसंदर्भातील कोणतेही बदल/शुद्धिपत्रककरिता कृपया सदर वेबसाइटला नियमित स्वरूपात भेट देत राहावे. वर्तमानपत्रात वेगळे शुद्धिपत्रक/बदल प्रकाशित केले जाणार नाहीत.

1104/24 (A)

North central railways | www.ncr.indianrailways.gov.in | @northcentralrailway | @CPRONCR



उत्तर मध्य रेल्वे

ई-प्रापण निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ दिनांक : २६.०६.२०२४

ई-प्रापण निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने वरिष्ठ सामग्री व्यवस्थापक, वि.लो. शेड, झाशी यांच्याद्वारे खालील कामाकरिता ई-प्रापण निविदा आमंत्रित करीत आहेत.

निविदा क्र. : ५४२४५२३६, तपशील : पेंटोग्राफ अरोहित इन्सुलेटरच्या उंची समायोजनाकरिता एमएस स्पेसर, बाहेरील व्यास २१५ एमएम, उंची ८० एमएम, १६ एमएम व्यासाकरिता ४ छिद्रांसह १८४ एमएम पीसीडी मशिनिंग पृष्ठाला ४ नंबर उच्च तन्यता स्टड (मेक-टीव्हीएस, अनब्राको) सह विधिवत पेंट करणे आवश्यक आहे. एलपीएस) १५० मिमी लांबीसह दोन्ही टोक ५० मिमी थ्रेडेड, ०४ नग स्प्रिंग वॉशर १४ मिमी, ४ नट्स १४ मिमी डीआयएन ९८५ ग्रेड-८ अनुसार.

परिमाण : १२० नग, निविदा उघडण्याची तारीख :१८.०७.२०२४, टीप : वरील ई-प्रापण निविदेची संपूर्ण माहिती ireps संकेतस्थळ म्हणजे http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. 1113/24 (P)

North central railways www.ncr.indianrailways.gov.in @northcentralrailway @CPRONCR



उत्तर मध्य रेल्वे

ई-टेंडरिंग सूचना क्र. २०२४-जून-०५ दिनांक : २५.०६.२०२४

ई-निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्याकरिता विभागीय रेल्वे व्यवस्थापक (अभियांत्रिकी), उ.म. रेल्वे, आग्रा यांच्याद्वारे खालील कामाकरिता केवळ ऑनलाइन (ई-निविदा) ''खुली निविदा'' आमंत्रित करीत आहे.

निविदा क्र. : २०२४-जून-०५-०१ | अंदाजे रक्कम : ७४३४०००.००

कामाचे नाव : आग्रा विभागातील सर्व प्रकारच्या पट्ट्यांवर फेज अरे अल्ट्रासोनिक टेस्टिंग (पीएयूटी) चा वापर करून एफबी वेल्डिंग जॉइंट्सचे अल्ट्रासोनिक टेस्टिंग निष्पादित करणे.

संपूर्ण तपशील आणि बोली सादरीकरणासाठी कृपया संकेतस्थळ www.ireps.gov.in वर पाहू शकता. वेब पोर्टल www.ireps.gov.in द्वारे दि. १६.०७.२४ रोजी १५.०० वा. पर्यंत निविदा सादर करता येऊ शकेल.

1110/24 (AN)

North central railways www.ncr.indianrailways.gov.in @northcentralrailway @CPRONCR



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tender Notice

The Superintending Engineer, O&M Circle, Parbhani; on behalf of MSEDCL(the Employer) invites e-tenders from reputed e-registered Contractor/bidders for:

| Sr. No. | E-tender No. | Particular work | Amount |
|---|---|---|---|
| 1 | SE/PBNC/Transportation/ T-01/2024-25 | Work of transportation of failed DT, PSC poles, Power transformers & various material under Parbhani circle. | 100 lakhs |
| 2 | SE/PBNC/HR/DN-I/OS/ T-02/2024-25 | Work of providing manpower of Technicians and operators on outsourcing basis for Parbhani Division-I. | 364 lakhs |
| 3 | SE/PBNC/HR/DN-II/OS/ T-03/2024-25 | Work of providing manpower of Technicians and operators on outsourcing basis for Parbhani Division-II. | 401 lakhs |

The bid documents shall be available on website from date 28.06.2024 at 11:00 hrs up to 08.07.2024 till 15.00 hrs.The Pre-bid meeting shall be on 04.07.2024 at 11.00 Hrs. at office of the Superintending Engineer.O&M Circle,Parbhani. The Last date for submission of tender is 08.07.2024 up to 15.00 Hrs. For more details regarding registration process and tender, visit our e-tender website https://etender.mahadiscom.in/eatapp/

HO/PR.No 149/24 dt 27.06.2024 Superintending Engineer, O&M Circle, Parbhani.

प्रामाणिकपणा, नम्रता, सारासार विचार, मानवता या काही तत्त्वांनी काळाच्या कठीण परीक्षेला मात दिली आहे आणि आजही ही तत्त्वे टिकून आहेत आणि या सर्व विचारांची खरी व्याख्या शब्दांमधून नाही, तर छोट्या-छोट्या कृतींमधूनच कळते. माणसाची किंमत त्याच्या या तत्त्वांवरून ठरते. शॉर्ट कट वापरू नका. शॉर्ट कटमुळे मूळ रस्ताच हरवण्याची शक्यता असते आणि असे शॉर्ट कट वापरल्यावर पुढे तुमच्या ध्येयाकडे जाणारा रस्ता लागतो तो अधिक दूर अंतराचा असतो. स्वतःच्या विचारांवर, कल्पनांवर आणि आदर्शांवर विश्वास ठेवा. कोणी कितीही सांगितले तरी तो विश्वास ढळू देऊ नका. कारण स्वतःवर विश्वास असलेल्या व्यक्तीच जगात यशस्वी झालेल्या दिसतात. आपल्या आयुष्यात अशा अनेक घटना घडतात की, त्यावर आपल्याला प्रतिक्रिया देण्यापेक्षा उत्तर द्यायला शिकलो पाहिजे. जेव्हा आपण उत्तर देत असतो, तेव्हा पूर्ण विचार करून योग्य तो मार्ग निवडत असतो आणि त्या वेळेस आपल्यावर फक्त आपले नियंत्रण असते. मात्र जेव्हा आपण प्रतिक्रिया देतो, तेव्हा तेच करत असतो जे दुसऱ्या व्यक्तीला आपल्याकडून करवून घ्यायचे असते. त्यामुळे तुमच्यातील प्रामाणिकपणाला आव्हान देणाऱ्या प्रतिक्रियेच्या नादी लागू नका.



# यामुळे देवपूजेत वापरतात तांब्याची भांडी



**आयुर्वेदानुसार तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी त्रिदोषहारक (कफ, पित्त, वात) असते. त्यामुळे किमान ८ तास तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी नियमित प्यावे. तांब्याच्या नैसर्गिक जंतुनाशक गुणधर्मामुळे पाणी निर्जंतुक होते व आरोग्याच्या दृष्टीनेही अधिक उपयोगी गुणधर्म त्यात सामाविष्ट होतात. तसेच कफाची समस्या असलेल्यांनी या पाण्यामध्ये तुळशीचे पान टाकावेत.**

हिंदू धर्मात देवाची आराधना करण्यासाठी अनेक नियम दिलेले आहेत. यातील एक म्हणजे पूजेसाठी तांब्याची भांडी वापरणे. अनेक विद्वानांप्रमाणे तांबा पूर्णपणे शुद्ध धातू आहे. कारण तांबा निर्मित करण्यासाठी इतर धातू यात मिसळले जात नाही.

तांब्याची भांडी वापरण्यामागील कारण एक कथेत वर्णित आहे.

वराह पुराणप्रमाणे पूर्वी गुडाकेश नावाचा राक्षस होता. राक्षस असला तरी तो प्रभू विष्णू यांचा मोठा भक्त होता. प्रभू विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी तो कठोर तप करत असे. त्याचा तप बघून प्रसन्न होऊन एकदा विष्णू त्यासमोर प्रकट झाले आणि वर मागायला सांगितले.

त्या दरम्यान गुडाकेशाने विष्णूंकडे वर मागितले की, आपल्या चक्राने माझा मृत्यू व्हावा आणि माझे पूर्ण शरीर तांब्यात परिवर्तित व्हावे.

त्या तांब्याचा वापर पूजेसाठी वापरण्यात येणाऱ्या भांडीत व्हायला हवे आणि त्या धातूच्या भांड्याने आपली पूजा केल्यास आपण प्रसन्न व्हावे. यामुळे तांबा अत्यंत पवित्र धातू होईल.

प्रभू विष्णूंनी गुडाकेशाला वर दिले आणि वेळ आल्यावर चक्राने त्याच्या शरीराचे अनेक तुकडे केले. ज्यानंतर गुडाकेशाच्या मासाने तांबा, रक्ताने सोने आणि हाडांनी चांदी निर्मित झाली. या कारणामुळे प्रभूच्या पूजनात नेहमी तांब्याची भांडी वापरणे सुरू झाले.

## आयुर्वेदिक महत्त्व

### तांब्याचे भांडे वापरण्यामागील कारणे

**१) पाणी शुद्ध होणे :** आयुर्वेदानुसार तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी पिल्यास विविध प्रकारचे रोग दूर होतात. विशेषतः पोटाशी संबंधित समस्या मुळापासून नष्ट होतात.

**२) त्वचा उजळते :** तांब्याच्या भांड्यातील पाणी पिल्याने त्वचेतील लुळेपणा दूर होतो. डेड स्कीन(मृत त्वचा) निघून जाते आणि चेहरा नेहमी उजळ दिसतो.

**३) थायरॉइड आजार दूर होतो :** तांब्याचा स्पर्श असलेले पाणी शरीरातील थायरॉक्सीन हार्मोनला संतुलित ठेवते, तसेच तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्यास थायरॉइड आजार नियंत्रणात येतो.

**४) ॲसिडीटी, गॅस दूर होतो :** ॲसिडीटी, गॅस किंव्हा पोटाची इतर समस्या असेल तर तांब्याच्या भांड्यातील पाणी अमृतासमान काम करते. यामुळे पोटाचे सर्व आजार दूर होतात.

**५) वजन कमी होते :** वजन कमी करण्यासाठी व्यायामासोबत तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्यास लाभ होईल. थोड्याच दिवसात फरक दिसून येईल.

**६) घातक सूक्ष्मजीव नष्ट होतात :** तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्यास शरीरातील घातक सूक्ष्मजीव तसेच डायरिया, अतिसार, कावीळ यांसारख्या आजाराला कारणीभूत असलेले किटाणू नष्ट होतात.

**७) सांधेदुखीत आराम मिळतो :** आजकाल कमी वयातच अनेक लोकांना सांधेदुखीचा आजार होत आहे. तुम्हीही या आजारामुळे त्रस्त असाल तर दररोज तांब्याच्या भांड्यातील पाणी प्या. सांधेदुखीमध्ये तांब्याच्या भांड्यातील पाणी पिल्याने लाभ होतो. तांब्याच्या भांड्यातील गुणामुळे शरीरात यूरिक ॲसिडचे प्रमाण कमी होते आणि सांधेदुखीमध्ये होणाऱ्या त्रासापासून आराम मिळतो.

**८) ॲनिमियाशी सामना करतो :** शरीरातील अनेक कार्य सुरळीत करण्यासाठी तांब्याचा उपयोग होतो. अगदी पेशींची निर्मीती करण्यापासून ते पदार्थांतील आयर्न (लोह) व मिनरल्स शोषून घेण्यासाठी मदत होते. म्हणूनच ॲनिमियाशी सामना करणाऱ्यांनी तांब्याच्या भांड्यातून आवर्जून पाणी प्यावे. तांबे रक्तातील लोह वाढवतो व रक्तपुरवठा सुरळीत होण्यास मदत होते.

म्हणून रोगांना दूर ठेवण्यासाठी तांब्याच्या भांड्यांचा वापर करणे जरूरी आहे.

आणि म्हणूनच आपण पूर्वीपासूनच तांब्याच्या भांड्यांचा वापर करत आलो आहे, एवढेच नाही तर आपण पूजेतही तांब आणि पितळेच्या भांड्यांचाच वापर करतो.

### चला तर जाणून घेऊ आपल्याकडे पूजेत का वापरतात तांब्याच्या वस्तू

आपल्याकडे पूजेत वापरण्यात येणारी ताम्हण, पळी, भांड, देव्हाऱ्यातील देवदेवतांच्या मूर्तीदेखील तांब्या-पितळेच्या असतात.

■ कारण तांबे-पितळ या धातूंची सात्त्विकता ग्रहण करण्याची क्षमता अधिक असते.

■ तांब्या-पितळेच्या लालसर व सोनेरी रंगांमुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होते व मनाची प्रसन्नता वाढते.

■ आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता तांब्या-पितळेच्या भांड्यात तीन तास ठेवलेले पाणी निर्जंतुक होत असल्याने पाणी उकळण्याचा खर्चदेखील वाचतो.

■ तांबे आणि पितळ हवेतील बाष्पाच्या प्रक्रियेमुळे काळे पडते. त्यासाठी ते नियमित स्वच्छ करणे आवश्यक असते. ताक, लिंबू, राख वापरून ते नीट स्वच्छ होत नाहीत. पितांबरी पावडरचा वापर केल्याने भांडी स्वच्छ तर होतातच शिवाय भांड्यांची चमकही कायम राहते.

# अंकशास्त्रावरून व्यक्तीचा स्वभाव ओळख

### मूलांक तीन

कोणत्याही महिन्याच्या ३, १२, २१, ३० या तारखेला जन्म असलेल्या लोकांचा मूलांक ३ येतो ३ हा अंक गुरू या ग्रहाचा आहे मूलांक ३ चा स्वामी गुरू आहे यश, कीर्ती, भौतिक सुखे, आनंद, प्रेम व आकर्षण मूलांक तीनचे निदर्शक आहेत.

### या लोकांची स्वभाव वैशिष्ट्ये

१. तुम्हाला बहुतेक करून जीवनात यश मिळते. साधारणपणे मोठ्याने बोलण्याची सवय असते. जीवनात अधिकार व मान उशिरा मिळतो, स्वाभिमानाची तीव्र भावना असे, परंतु काही प्रमाणात संशयी स्वभाव दिसून येतो. शिक्षणाचे त्यांना विशेष महत्त्व वाटते. शिक्षण, व्यवस्थापन यात यश मिळते. यौवन व दारिद्र्यमधून लगेच बाहेर पडता. अनेक विषयामध्ये रस घेण्यापेक्षा एकाच विषयात लक्ष दिल्यास जीवनात यश मिळेल. ही माणसे प्रत्येक गोष्टीचा नैतिकदृष्ट्या विचार करतात. मूल्यांना त्यांच्या जीवनात विशेष महत्त्व असते.



२. हे लोक कूटनीतिज्ज्ञ असतात. त्यांना दुसऱ्यांचा हस्तक्षेप सहन होत नाही. सुरुवातीला आर्थिकदृष्ट्या ते तितकेसे सक्षम नसतात, पण पुढे श्रीमंत होतात आणि समाधानी आयुष्य जगतात. त्यांची काम करण्याची पद्धतही थोडी वेगळी असते. जे काम समोर दिसेल ते पूर्ण करण्यासाठी कोणाच्या तरी मदतीची वाट पाहण्यापेक्षा ते काम उरकण्याकडेच त्यांचा कल अधिक असतो.

३. मूलांक ३चे लोक सामान्यत विनोदी आणि प्रेमळ स्वभावाचे असतात, परंतु यांना आपली नाराजी लपवता येत नाही, त्यामुळे त्यांना अनेक गुप्त शत्रू असतात. हसतमुख स्वभाव त्यांना पुढे जाण्यास लाभदायक ठरतो.

४. या व्यक्ती चांगल्याच स्पष्टवक्त्या असतात, पण तितक्याच नम्रही असतात. ज्या गोष्टी त्यांना पटत नाहीत त्या इतरांसाठी करण्यापेक्षा न करणे त्यांना सोयीचे वाटते.

५. समाजसेवेची यांना आवड असते. दान करणे, दुसऱ्यांना मदत करणे हे गुण त्यांच्यात असतात. वृद्धावस्थेतही ते सामाजिक कार्यात सक्रिय राहतात. शक्यतो कोणाच्या वाटेला जाऊ नये आणि आपल्या वाट्याला आलेल्यांना सोडू नये, असा त्यांचा खाक्या असतो. वृत्तीने मोकळ्या असताना यांच्याविषयी बरेच गैरसमजही असतात. पण, त्याचे त्यांना फारसे काही वाटत नाही.

६. अतिमहत्त्वाकांक्षा, इतरांवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रवृत्तीमुळे, स्पष्टवक्ते असल्यामुळे त्यांच्या गुप्त शत्रूंची संख्या वाढतच जाते. संतापाच्या भरात अपशब्द उद्‌गारल्यामुळे यांचे नुकसान होण्याची शक्यता असते.

७. शुभ तारखा ३, ६, ९, १२, १५, १८, २१, २४ व २७ या तारखा यांच्यासाठी शुभ असतात. आपल्या महत्त्वाच्या कामांना त्यांनी याच तारखांना सुरुवात करायला हवी. ८, १७ व २६ या तारखा अशुभ ठरू शकतात. जीवनकाल २० ते २६ सामान्य, २७ सुखदायक घटना. ३० ते ३८ उत्कृष्ट. ४० ते ४९ साधारण. ५० ते ५९ प्रगतीचा. १६, ३५, ४४, ७१ आणिबाणी वर्षे.

८. भाग्य रंग - पिवळा, केसरी रंग यांच्यासाठी शुभ असतात. या शिवाय गुलाबी रंगापासून त्यांना विशेष लाभ होऊ शकतो. काळा, निळा व राखाडी रंग यांच्यासाठी शुभ नाहीत.

९. भाग्य दिवस - गुरुवार, सोमवार आणि मंगळवार मूलांक ३ च्या लोकांना फलदायी असतात.

१०. मधुमेह, वजन वाढणे, मांड्या व पिंढऱ्या दुखणे, पोटदुखी वगैरे त्रास होऊ शकतात.

११. तीन, सहा आणि नऊ मूलांक असलेल्या व्यक्तींशी यांचे उत्तम जमते. त्यांच्याशी झालेली दोस्ती दीर्घकाळ टिकते.

१२. करिअर - कम्युनिकेशन आणि मनोरंजनच्या क्षेत्रात यश मिळवू शकतात. अभिनय, गायन, लेखन आणि पत्रकारिता हे विषय करियरसाठी निवडता येतील. फॅशन डिझायनिंग किंवा मॉडलिंगमध्ये तुम्हाला नशीब आजमावून पाहायला काहीच हरकत नाही.

अध्यापन, राजकारण आणि व्यवस्थापन त्यांच्यासाठी लाभदायक क्षेत्रे आहेत. देवालयाचे ट्रस्टी, धर्मप्रचारक, वकील, जज्ज, प्रोफेसर, खेळाचा कर्णधार वगैरे यांना चांगले जमते.

१३. भाग्य मंत्र - ॐ ऐं ह्रीं ऐं बृं बृहस्पतये नम

या मंत्राचा त्यांनी दिवसातून किमान १०८ वेळा जप करायला हवा.

१४. भाग्य रत्न - ३ कॅरेट पुष्कराज रत्न पहिल्या बोटात घालावा.

# ...आणि म्हणून पंढरीची वारी पंढरीत

**वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली पंढरीची वारी कधीच चुकू नये, ही वारकऱ्यांची भावना असते. अगदी जीवाचा आटापिटा करून तिथेपर्यंत जाण्याची ओढ, तळमळ! कधी एकदा पंढरीला जातो आणि पांडुरंगाचे दर्शन घेतो ही भावना मनास साद घालत असते.**

वारकरी संप्रदायाच्या म्हणजे ओघानेच महाराष्ट्राच्या इतिहासात एक अभूतपूर्व घटना घडली आणि त्यामुळे वारी अर्धवट होण्याचा प्रसंग वारकऱ्यांवर ओढवला होता. घटना होती इसवी सन १५०८ ते १५११ दरम्यानची. विजयनगर साम्राज्याच्या राजाने पंढरपूरच्या पांडुरंगाची मूर्ती त्याच्या राज्यात अनागोंदी (सध्याचे नाव हम्पी) येथे नेली. आषाढी वारीसाठी वारकरी पंढरीत दाखल झाले, परंतु ज्याच्या दर्शनासाठी आपण इथवर आलो आहोत तोच पांडुरंग जागेवर नाही हे पाहून सारे जण आलाप करू लागले. परंतु राजाच्या शक्तीसमोर कोणाचे काय चालणार? सर्व भाविकांनी पांडुरंगाचे निस्सीम भक्त श्रीसंत भानुदास महाराजांना हे कार्य पूर्ण करण्याची विनंती केली. भानुदासांच्या घराण्यात पंढरीची वारी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली होती. पांडुरंगाच्या दर्शनाचा ध्यास त्यांनाही होताच. त्यांनी पुढाकार घेतला आणि दर कोस दर मुक्काम करीत ते हम्पीस पोचले. एके रात्री पांडुरंगाच्या मंदिराजवळ गेल्यावर सैनिकांच्या कड्या बंदोबस्तात कुलूपबंद गाभाऱ्यात पांडुरंगाची मनोहर मूर्ती विराजमान होती. दरवाजास स्पर्श करताच कुलुपे गळाली व सैनिकांना झोप लागली. भानुदास महाराज मूर्तीसमोर जाऊन उभे राहिले. म्हटले देवा, 'सगळे भक्त तुझी पंढरीत वाट पाहत आहेत आणि तू येथे आलास? तुला येथे सर्व राजोपचार प्राप्त होतील, परंतु पंढरीत प्राप्त होणाऱ्या भक्तांच्या भक्ती प्रेमास तू मुकशील. चल माझ्या समवेत! दोघांचा काही संवाद झाल्यानंतर भगवंताने आपल्या गळ्यातील तुळशीचा हार भानुदास महाराजांच्या गळ्यात घातला. बरोबरीने नवरत्नांचा एक हारही त्यांच्या गळ्यात घातला. महाराज बाहेर पडले. परिस्थिती पूर्ववत झाली. सकाळी राजा काकडआरतीस आल्यानंतर त्याच्या लक्षात आले की देवाच्या गळ्यातील नवरत्नांचा हार गायब झाला आहे. शोधाशोध सुरू झाली. राजाने फर्मान सोडले की, जो कोणी चोर असेल त्याला सुळावर चढवा. पहाटे तुंगभद्रा नदीच्या तीरावर भानुदास महाराज स्नान-संध्या करीत असताना त्यांच्या गळ्यात असलेला नवरत्नांचा हार चमकला. चोर सापडला या भावनेने राजाज्ञेप्रमाणे भानुदास महाराजांना सुळावर देण्याचे नियोजन झाले. परंतु चमत्कार झाला.





### कोरडीये काष्ठी अंकुर फुटले! येणे येथे झाले विठोबाचे!

सुळाला पालवी फुटली. बातमी राजापर्यंत गेली. पांडुरंगाच्या नियोजनानुसार त्याच्या भक्ताचा छळ झाल्यास तेथे क्षणभरही राहायचे नाही याप्रमाणे पांडुरंगाने अंगुष्ठ एवढे रूप धारण केले व संत भानुदास महाराजांच्या पडशीत बसले. दोघेही पंढरीच्या दिशेने निघाले. पंढरीच्या वेशीजवळ आल्यानंतर वारकऱ्यांना संत भानुदास महाराजांनी पांडुरंगास आणल्याची शुभवार्ता कळली. दोघांच्याही स्वागतासाठी रथ सज्ज झाला. वारकऱ्यांचा आनंद गगनात मावेना, 'पुंडलिक वरदा हरिविठ्ठल'च्या गजराने पंढरी दुमदुमली. वारकरी दिंडी घेऊन दोघांना घेण्यासाठी तिथेपर्यंत आले. पुष्पवृष्टी झाली. स्थानिकांनी सडासारवण केले. सुवासिनींनी पायघड्या घातल्या, ओवाळले. वेशीजवळ आल्यानंतर पांडुरंगाने आपले मूळ रूप धारण केले. पांडुरंग पंढरीत आले तो दिवस होता कार्तिकी एकादशीचा! पांडुरंगाने पुन्हा येथून बाहेर जाऊ नये, यासाठी भाविकांच्या विनंतीवरून संत भानुदास महाराजांच्या हस्ते प्रदक्षिणा मार्गावरील काळ्या मारुतीची स्थापना करण्यात आली. मंदिरात गेल्यानंतर सोबत भानुदास महाराजांच्या हस्तेच पांडुरंगाची पुनर्स्थापना करण्यात आली. पांडुरंगाने भानुदास महाराजांना आशीर्वादरूपी दोन वर दिले की, 'तुज्या वंशात मी जन्म घेईन व तू अखंड माझ्याजवळच असशील.' त्याप्रमाणे संत भानुदास महाराजांचे पुत्र चक्रपाणी त्यांचे पुत्र सूर्यनारायण व त्यांचे पुत्र म्हणजेच शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज होय. अर्थात संत एकनाथ महाराज हे संत भानुदास महाराजांचे पणतू होय. दुसऱ्या वराप्रमाणे आजही संत भानुदास महाराज हे पांडुरंगाच्या जवळच आहेत. गाभाऱ्यातून बाहेर पडले की चार खांबी मंडप लागतो. त्याच्या बाहेर पडले की, सोळा खांबांचा मंडप लागतो, त्यास सोळखांबी मंडप असे संबोधण्यात येते. त्याच्या डाव्या हातास पहिली ती संत भानुदास महाराजांची समाधी होय. संत भानुदास महाराजांनी आषाढ शुद्ध १४ या तिथीस समाधी घेतली. आजही त्या ठिकाणी परंपरेने त्यांच्या वंशजांच्या हस्ते पूजाअर्चा आदींद्वारे त्यांचा समाधी सोहळा साजरा करण्यात येतो. तसेच या तिथीचे स्मरण म्हणून कार्तिकी एकादशीस रथोत्सव साजरा करण्यात येतो.

संत भानुदास महाराजांच्या भक्ती आणि कर्तृत्त्वाचे फळ म्हणजे आज पांडुरंगाचे दर्शन आपणांस पंढरीत होत आहे. म्हणूनच आजही पंढरपूरला जाऊन आपण वारी करतो. नसता 'हम्पीची वारी' करावी लागली असती. संत ज्ञानेश्वरादिक संतांनी पंढरीचा जो महिमा लिहिला आहे तो गाता आला नसता. संत एकनाथ व संत तुकारामांना पंढरीवर अभंग लिहिता आले नसते. धन्य ते संत भानुदास आणि धन्य त्यांची भक्ती की ज्यांच्यामुळे आज आपण पंढरपुरात पांडुरंगाचे दर्शन घेत आहोत. आजही ज्याठिकाणी हम्पीच्या विठ्ठल मंदिरात पांडुरंगास स्थापित केले होते, त्या ठिकाणी गाभाऱ्यात पांडुरंग नाहीये. तेथे एक खाच दिसते की ज्यात पांडुरंगाची मूर्ती विराजमान करण्यात आली होती.

- डॉ. शेखर वझे
९८६९२०२१९६

# हिंग

बहुतेक घरामध्ये हिंग वापरले जाते. हिंग आपल्या पदार्थांचा स्वाद वाढविण्यासोबतच अनेक प्रकारचे फायदे देते, जे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. जर आपण हिंग सेवन करत असाल, तर बद्धकोष्ठता, अपचन, पोटाचे रोग इत्यादींमध्ये फायदेशीर ठरते. हिंगाचे अनेक घरगुती उपाय आहेत. हिंग भारतामध्ये फार पूर्वीपासून मसाल्याचा पदार्थ म्हणून वापरला जातो. हिंगाच्या झाडाच्या रसाला सुकवून हिंग बनवले जाते. याचे झाड २ ते ४ फूट उंचीचे असतात. हिंग आपल्या आरोग्याला चांगले असते, तर पदार्थाचा स्वाददेखील वाढवणारे असते. याचे अनेक अचूक चमत्कारिक तोडगेदेखील आहेत. आपण या तोडग्यांचा वापर केला, तर आपण आपल्या जीवनामध्ये चालणाऱ्या सगळ्या समस्यांपासून सुटका मिळवू शकतो आणि या चमत्कारी तोडग्याचा वापर केल्याने आपली सगळी संकटे दूर होतील.

### चला जाणून घेऊ हिंगाच्या या तोडग्या बद्दल

१) घरातील नकारात्मक ऊर्जा दूर करायची असेल, तर यासाठी आपण ५ ग्रॅम हिंग, ५ ग्रॅम कपूर आणि ५ ग्रॅम काळीमिरी घेऊन त्याची एकत्रित पावडर बनवावी आणि या पावडरीचे मोहरीच्या (राईच्या) आकारा एवढे गोळे बनवा. गोळ्यांना दोन समान भागात वाटून घ्या, एक भाग सकाळी आणि दुसरा भाग संध्याकाळी घरामध्ये जाळावा. जर आपण हा उपाय लागोपाठ तीन दिवस केला, तर यामुळे आपल्या घरातून नकारात्मक ऊर्जा दूर होईल आणि सगळी वाईट नजर उतरेल. आपल्या घरामध्ये कोणत्याही प्रकारची वाईट शक्ती राहणार नाही. सगळ्या वाईट शक्ती आपल्या घरापासून दूर होतील.

२) जर आपल्याला घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नसेल आणि आपल्या अनेक प्रयत्नानंतर देखील कर्जापासून सुटका होत नसेल तर यासाठी आपण हिंगाच्या पाण्याने स्नान करावे किंवा एक हिंगाचा खडा पाण्यात टाकून त्यास विरघळावा आणि त्यानंतर या पाण्याने स्नान करावे हा उपाय केला, तर आपल्याला आपल्या कर्जापासून सुटका मिळण्यास सुरुवात होईल. या सोबत आपण लाल रंगाच्या डाळींचे दानदेखील करू शकता, यामुळे आपल्याला कर्ज मुक्ती मिळेल.

३) बाहेरील बाधेपासून सुटका मिळवण्यासाठी आपण लसणाच्या अर्कमध्ये हिंग पावडर मिक्स करून एका कापूरची पावडर करून दोन्ही डोळ्यांना एकावेळी काजळ लावताना लावा.

**ॐ श्री हनुमते नमः**

मंत्र ११ वेळा जप करावा आणि यानंतर आपण डोळे उघडावीत, यामुळे आपल्या शरीराला झालेली बाहेरील बाधा दूर होईल.

**नोट :** हा उपाय आपण एखाद्या जाणकार व्यक्तीच्या सल्ल्यानेच करावा.

४) जर आपल्याला कार्यामध्ये यश प्राप्त करायचे आहे तर आपण यासाठी चुटकी भर हिंग आपल्यावरून उतरवून उत्तर दिशेला फेकावे. हा उपाय आपल्याला तेव्हा करायचा आहे, जेव्हा आपण एखाद्या आवश्यक कामाने बाहेर जात असाल. हा उपाय केल्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रात येणार अडथळे दूर होतील आणि आपल्या कार्यात यश प्राप्त होईल.

# सप्तशृंगीचे रूप पुण्याची चतुःशृंगी

भक्तांची अगाध श्रद्धा बघून देवादिकांनी स्वःस्थान सोडून भक्ताकडे धाव घेतली, यातीलच एक पौराणिक कथा म्हणजे पुणेनिवासिनी चतुःशृंगी ही देवी आहे.

इसवी सन ६१३ मध्ये पुणे येथे फक्त दहा-बारा घरे असल्याचा उल्लेख सापडतो. राष्ट्रकूट वंशातील कृष्ण राजा याने तयार केलेल्या दानपत्रामध्ये (इ. स.७५८) या शहराचे नाव 'पुण्य विषय' असे असल्याचे आढळते. पुढे त्याचे 'पुनक विषय' झाले आणि इ. स. ९९३ मध्ये ते 'पुनवडी' झाल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर ते पुणेश्वर मंदिरामुळे 'पुणे' असे झाले असावे. एकंदर पुणे नावविषयी अशा आख्यायिका आहेत.

नाशिक जवळच्या वणीचे म्हणजेच सप्तशृंगीदेवीचे पुण्यातील स्थान म्हणजे चतुःश्रृंगी. सप्तशृंगी निवासिनी ही साडेतीन शक्तीपीठांपैकी एक व अनेकांची कुलस्वामिनी.

पुण्यात विद्यापीठ परिसरात सेनापती बापट रस्त्यापासून सुमारे दीडशे फूट उंच चढून गेल्यावर चतुःश्रृंगी मातेचे विलोभनीय दर्शन होते. चतुःशृंगी माता स्वयंभू व जागृत असून, ती नवसाला पावते, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

### या मंदिरासंदर्भात एक आख्यायिका सांगितली जाते

पेशव्यांचे पुण्यातील एक सावकार दुर्लभशेठ पीतांबरदास महाजन हे देवीचे परमभक्त होते. दरवर्षी ते नाशिकजवळील श्रीसप्तशृंगी गडावरील देवीच्या यात्रेस जात असत. कालमानाने ते अतिशय वृद्ध झाले व वारी चुकणार असे त्यांना वाटू लागले व ते अतिशय दुःखी झाले. तेव्हा श्रीसप्तशृंगी देवी त्यांच्या स्वप्नात आली व पुण्याच्या वायव्येस असलेल्या डोंगरावर आपण वास्तव्यास असल्याचे त्यांना सांगितले. त्याप्रमाणे त्यांना या डोंगरावर देवीचे स्वयंभू स्थान आढळले. परंतु वेळेआधीच दुर्लभशेठ देवीने सांगितलेल्या ठिकाणी पोहोचले तेव्हा देवी पूर्ण प्रकट झालेली नसून तीन हात व चेहराच प्रकट झाल्याचे त्यांना आढळून आले. हे स्थान म्हणजेच चतुःशृंगी होय. अर्थातच या स्थानी दुर्लभशेठने मंदिर बांधले.

वणीची सप्तशृंगी येथे अवतरली. सप्तशृंगी देवीच्या मंदिरापाशी डोंगराची सात शिखरे होती असे म्हणतात. आता तेथे चारच शिखरे दिसतात, म्हणून या देवीला चतुःशृंगी हे नाव मिळाले.

पुणे शहरातील नरपगीर गोसावी यांना देवी प्रसन्न झाल्यामुळे त्यांनी तेथे सभामंडप, पायऱ्या व विहीर बांधली.

हनुमान जयंती चैत्री पौर्णिमा शनिवार, पूर्वा नक्षत्र शके १६८७ हा देवीचा प्रकटदिन आहे. चैत्र पौर्णिमेचा हा विशेष दिवस देवीचा प्रकट दिन म्हणून दरवर्षी मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. मंदिराचा सभामंडप, धर्मशाळा, पायऱ्या, विहीर, रस्ते, दागदागिने हे सर्व भक्तांनी श्रद्धेने अर्पण केले आहे.

चतुःशृंगी मंदिराच्या परिसरात गेल्या कित्येक वर्षापासून नवरात्रीत मोठी जत्रा भरत असे, ती कोजागिरी पौर्णिमेपर्यंत चालत असे.



पुण्यात उत्तर पेशवाईत दुर्लभशेठने नाणी पाडण्याचा म्हणजेच टाकसाळीचा मक्ता घेतला होता, तसेच नाशिकजवळही दुर्लभशेठची एक टाकसाळ होती. दुर्लभशेठने पुण्यात एक धर्मशाळा बांधली व तेथे कालियामर्दनाची मूर्ती स्थापन केली. लक्ष्मीरस्त्यावर सतरंजीवाला चौकानजीक ही मूर्ती आजही पाहायला मिळते. चतुःशृंगी हे पूर्वीपासून पुणेकरांचे श्रद्धास्थान राहिले आहे. नवरात्रात गावातून तालीमबाज नारळाचे तोरण घेऊन चतुःशृंगी येथे पहाटे पळत जात असत. आता तालीमबाज व पळत जाणे बाजूला पडले असले, तरी आजही पुण्याच्या पेठांमधून चतुःशृंगीला तोरण वाहण्याची प्रथा सुरू आहे.

चतुःशृंगीचे दुसरे एक मंदिर रविवार पेठेत आहे, हे मात्र थोडक्याच जणांना माहीत असेल. सुमारे २०० वर्षांपूर्वी किसनदास राजाराम यांनी येथे देवीची स्थापना केली व बढाई समाजाने मंदिर बांधले. येथे देवी तांदळा स्वरूप आहे. सुभानशा दर्ग्याच्या चौकातून गोविंद हलवाई चौकाकडे जाऊ लागले की, उजव्या बाजूस हे मंदिर आहे. अशी चतुःशृंगी देवीची पौराणिक कथा आहे.

दहावीच्या निकालानंतर मोठ्या संख्येने मुले-मुली पहिल्यांदा कॉलेजला गेले असतील. कॉलेजमध्ये सगळ्याच नव्या गोष्टींविषयीचे आकर्षण असते. अशात अनेकदा ज्या मुली आपल्याकडे दुर्लक्ष करतात, त्याच मुलींच्या ग्रुपमध्ये त्यांनी आपल्याला सहभागी करून घ्यावे, अशी इच्छा असते. इतर अनेक मैत्रिणी सहज उपलब्ध असतानाही आपल्याला त्यांच्याशी बोलणे नकोस वाटते. त्यातून क्वचित स्वतःला चुकीच्या सवयीही लावून घेतल्या जातात. एखाद्या मुलींच्या ग्रुपने केलेल्या दुर्लक्षामुळे एखाद्या मुलीला इतका त्रास होतो की, तिचे नुसतेच खच्चीकरण होत नाही, तर ती आत्महत्येलाही प्रवृत्त होते. इतक्या पातळीपर्यंत काही घडत नाही ना, याची वेळीच खात्री करा. बैद्धिक हुशारी, पैसा, सौंदर्य यांसारख्या काही विशिष्ट निकषांवर ग्रुपमधून एखाद्या मुलीला वेगळे काढले जाते. हे दुर्लक्ष होणेही अपमानकारक असले, तरी स्वतःचे लक्ष्य पक्के करून त्या दिशेने वाटचाल करायला हवी; कारण कॉलेज कॅम्पसच्या बाहेर पडल्यानंतर या गोष्टी फार मागे राहतात.

मुंबई चौफेर
मुंबई
शनिवार, २९ जून २०२४

# तवा पनीर

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर, १ कांदा, २ टोमॅटो, ४-५ ढोबळी मिरची, १/४ चमचा हळद, १ चमचा तिखट, १/४ चमचा जिरे पूड, १/४ चमचा धने पूड, १/४ चमचा आमचूर पूड, मीठ, तेल.

**कृती :** पनीर, टोमॅटो, कांदा, ढोबळी मिरची यांचे मध्यम आकाराचे तुकडे करणे. तवा गरम करून त्यात तेल घालून पनीरचे तुकडे भाजून घेणे. त्याच तेलात कांदा गुलाबी रंगासारखा भाजून घेणे, त्याच तेलात ढोबळी मिरची भाजून बाजूला ठेवणे. आता त्याच तेलात टोमॅटो घालून पूर्णपणे शिजवणे. त्यात तिखट, हळद, जिरे पूड, धने पूड आणि आमचूर पूड घालून २-३ मिनिट परत शिजवणे. त्यात पनीर, कांदा, ढोबळी मिरची आणि मीठ घालून चांगले एकत्र करणे व ४-५ मिनिट शिजवून गरम गरम सर्व्ह करावे.



# शिकेकाईत असणारे महत्त्वाचे अनेक गुण

शिकेकाई- फ्रुट फॉर हेअर, म्हणजे केसांचे फळ. शिकेकाई, या औषधी वनस्पतीची मोठ्या प्रमाणात लागवड भारतभरात आणि पूर्व आशियात सापडते. शिकेकाईची फळे वाळवून दळून, त्याची पावडर वापरली जाते किंवा शिकेकाईचा ओला पाला पट्यावर वाटून तो केसांसाठी वापरला जातो.



शिकेकाईची केस दणकट व्हायला, तजेलदार व्हायला खूपच मदत होते. ही वनस्पती उष्ण आणि कोरड्या कटिबंधात वाढणारी आहे. केसामध्ये कोंडा न होण्यासाठी शिकेकाईचा खूपच उपयोग होतो. आजच्या युगात आपण इतके साबण, शॅम्पू विकत घेत असतो, पण शिकेकाई हे एक नैसर्गिक बॉडी केअर आणि हेअर केअर प्रॉडक्टच आहे. त्याची सर कोणत्याही शॅम्पू कंडिशनरला नाही. शिकेकाईमध्ये नैसर्गिक तेल, नैसर्गिक शॅम्पू आणि नैसर्गिक कंडिशनर असते.

शिकेकाईमध्ये खूप प्रमाणात सॅपोनिअन हे रसायन आढळते. सॅपोनियन हे नैसर्गिक द्रव्य आहे. या द्रव्यामुळे फेस निर्माण होतो. त्यामध्ये स्वच्छतेला हातभार लावतील असे अंश असतात. हे रसायन नंतर साबण उत्पादनासाठी वापरले जाते.

शिकेकाईचा वापर उन्हाळ्यात खूपच प्रभावी ठरतो. त्यामुळे डोक्याला एक थंडाई येते. शिकेकाईच्या बरोबरीनी नागरमुथा, वाळलेली संत्राची साले, वाळवलेली मेंदीची पाने, या गोष्टीही वाटल्या जातात. शिकेकाई वापरायची असल्यास दळून आणलेली शिकेकाई आदल्या दिवशी रात्रीच लोखंडाच्या भांड्यात भिजवून ठेवतात. सकाळी आंघोळीपूर्वी ती भांड्यातील शिकेकाई उकळून घेतात. म्हणजे त्याचे सर्व सत्त्व एकजीव होते आणि त्याचा केसांवर खूप छान परिणाम होतो.



# शुभ-अशुभ म्हणून नव्हे तर 'या' कारणांमुळे फडफडते पापणी

डोळा फडफडला म्हणजे एखादा शुभ किंवा अशुभ शकुन मानला जातो. मात्र प्रत्यक्षात हा केवळ अंधश्रद्धेचा भाग आहेत. डोळा फडफडणे हे शरीरातील काही दोषांमुळे घडणारी घटना आहे. त्यामुळे शुभ की अशुभ संकेत याकडे लक्ष देण्यापेक्षा तुमच्या आरोग्यामध्ये हे काही दोष तर नाहीत ना? याच्याकडे वेळीच लक्ष द्या.

## का फडफडतो डोळा?

वैज्ञानिक आधारानुसार कॅफीन किंवा अल्कोहलचे शरीरातील प्रमाण वाढल्यास तुमचा डोळा फडफडण्याची लक्षण दिसतात.

सतत कॉम्प्युटरसमोर बसल्यानेदेखील डोळ्यांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. डोळ्यामध्ये शुष्कता वाढल्यास, कॅफीनचे प्रमाण वाढल्यास डोळा फडफडू शकतो. कम्प्युटरसमोर सतत काम केल्याने रेटिना संकुचित होतो. ताणतणावामुळे, खूप थकवा आल्यासही आरोग्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. यामुळेही डोळा फडफडू शकतो मात्र वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. डोळ्यामध्ये खाज, सुज, ॲलर्जीचा त्रास असल्यास डोळा फडफडू शकतो.

काही संशोधनाच्या अहवालानुसार, शरीरात मॅग्नेशियमचे प्रमाण कमी झाल्यास डोळा फडफडू शकतो.



# गूळ आणि चणे खा आणि ताकद मिळवा



भाजक्या चण्यासह गोड फुटाणे खातात परंतु चण्यासह गूळ खाणे जास्त फायदेशीर आहे. भाजक्या चण्यामध्ये कार्बोहायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, व्हिटॅमिन आणि मुबलक प्रमाणात आयर्न आढळते. यामध्ये फायबरचे प्रमाण देखील चांगले आहे. शरीर आणि स्नायू बळकट करण्यासाठी भाजके चणे आणि गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो. गुळात व्हिटॅमिन 'ए' आणि 'बी' असते. त्यात सुक्रोज, पोटॅशियम, झिंक आणि आयर्न मुबलक प्रमाणात आढळते. फारच कमी लोकांना याच्या फायद्या बद्दल माहित नाही. तर चला मग आज याच्या फायद्यांविषयी जाणून घेऊ या.

- शरीराची पचन क्रिया बिघडल्यास चणे आणि गुळाचे सेवन करावे. यामध्ये फायबरचे प्रमाण असल्यामुळे पचन शक्ती चांगली होते.
- गूळ आणि चणे सेवन केल्याने दात मजबूत होतात आणि लवकर पडत नाही.
- स्त्री आणि पुरुष दोघांनी गूळ आणि चणे खावे. हे खाल्ल्याने चेहऱ्याची चमक वाढते आणि अशक्तपणा जाणवत नाही.
- गूळ आणि चणे खाल्ल्याने वजन कमी करण्यात मदत मिळते. याचे सेवन केल्याने मेटॅबॉलिझम वाढते. आणि वजन झपाट्याने कमी होत.
- दिवसातून एकदा ५० ग्रॅम चण्यासह गुळाचे सेवन करावे. यामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढते. तसेच संसर्गाचा धोका कमी होतो.
- जर आपल्याला वारंवार युरिनचा त्रास होतो. तर गुळ आणि चणे खावे. यामुळे लवकर या त्रासातून आराम मिळतो.
- मधुमेहाच्या रुग्णांना गोड खाण्यापूर्वी विचार करावा लागतो. परंतु ते गुळाचे सेवन मर्यादित प्रमाणात करू शकतात. या बरोबर ते चणे खाऊ शकतात. गुळ आणि चणे सेवन केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते.
- गुळ आणि चणा एकत्र खाल्ल्याने त्वचेत चमक येतो. सुरकुत्या कमी होतात. तसेच उन्हापासून होणारे त्रास देखील दूर होतात.

# मशरूमने काळेभोर घनदाट केस होतात

केसांना घनदाट आणि काळे भोर बनविण्यासाठी मशरूम फायदेशीर आहे. आपल्या आहारात याचा समावेश करावा. यामध्ये व्हिटॅमिन डी, अँटीऑक्सीडेंट, खनिजे, जसे की सेलेनियम आणि कॉपर आढळतात. हे केसांना निरोगी बनवत कसे काय चला तर मग जाणून घेऊ या.

**केस गळण्यापासून आराम मिळतो-**

ज्या स्त्रियांना केसांच्या गळतीचा त्रास आहे त्यांनी मशरूम वापरावे. यामध्ये अँटि मायक्रोबियल, अँटी बेक्टेरियल आणि इतर पोषक घटक आढळतात जे स्कॅल्पला स्वच्छ करून केसांची वाढ करतात.

**केसांना निरोगी ठेवतो-**

यामध्ये कॉपर आढळतो जे अन्नातून आयर्न शोषून घेत, यामुळे केसांचा रंग काळा राहतो. कॉपर आणि आयर्न दोन्ही मिळून केसांना निरोगी आणि बळकट करतात.

**केसांची वाढ करतो-**

मशरूममध्ये मुबलक प्रमाणात सेलेनियम आढळते, जे केसांना निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक आहे. हे सेलेनियम स्कॅल्प वरील फंगस नाहीसे करतो. केसांना पांढरे होण्यापासून वाचवतात.

हेल्दी आणि फिट राहण्यासाठी व्यायाम करणे किंवा जिमला जाणे तरुणाईमध्ये सर्रास आढळते. पण त्याचबरोबर शरीराच्या विकास आणि मजबुतीसाठी पोषकतत्त्वांची आवश्यकता असते. त्यासाठी प्रोटीन, फायबर्स आणि व्हिटॅमिन युक्त पदार्थांचे सेवन करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून जे नियमित व्यायाम किंवा जिम करतात. त्यांनी वर्कआऊटनंतर शरीराला झटपट ऊर्जा प्रदान करणाऱ्या पदार्थांचे सेवन करणे गरजेचे आहे. यासाठी हे हेल्दी पदार्थ खाणे फायदेशीर ठरेल.



# वर्कआऊटनंतर झटपट ऊर्जा मिळण्यासाठी खा 'हे' ५ पदार्थ!

## सुकामेवा

वर्कआऊट केल्यानंतर शरीराला ऊर्जेची गरज असते. पण कमी प्रमाणात खावूनही अधिक ऊर्जा देणारे पदार्थ खाणे, आवश्यक आहे. त्यासाठी सुकामेवा हा उत्तम पर्याय आहे. काजू, बदाम, पिस्ता, मनुके इत्यादी यात मोनोसॅच्युरेटेड फॅट्स असतात, त्यातून शरीराला ताकद मिळते. त्याशिवाय इतर आजारांपासून संरक्षण होते.

## रताळे

ऊर्जेचा उत्तम स्त्रोत म्हणजे रताळे. यात कार्बोहाइड्रेट आणि अँटिऑक्सीडेंट असतात, जे शरीराला ऊर्जा प्रदान करतात. त्यामुळे वर्कआऊटनंतर रताळे खाणे फायदेशीर ठरते.

## ओट्स

ओट्समध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन 'बी' असते. त्यामुळे शरीरातील तणाव कमी होण्यास मदत होते. वर्कआऊटनंतर ओट्स खाल्ल्याने शरीराची क्षमता आणि ताकद वाढते. ओट्स तुम्ही दुधासोबत घेऊ शकता. ते पचनास हलके असून त्यातील कार्बोहायड्रेट रक्तात मिसळून शरीराला ऊर्जा प्रदान करतात.

## अंडे

अंड्यात प्रोटीन्स आणि मिनरल्स असतात. त्यामुळे स्टॅमिना आणि ताकद वाढण्यास मदत होते. कच्चे किंवा उकडलेले अंडे वर्कआऊटनंतर खाऊ शकता. यामुळे रक्तात गुड कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते.

## केळे

केळ्यात भरपूर प्रमाणात आयर्न, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अँटिऑक्सीडेंट्स आणि पोटॅशिअम असते. त्यामुळे नर्व्हस सिस्टम ठीक होते आणि पेशी मजबूत होतात. केळे सहज उपलब्ध होते आणि त्यातून शरीराला झटपट ऊर्जा मिळते.

# दैनिक राशीभविष्य



**मेष** - महत्त्वपूर्ण स्वरूपाच्या परीक्षेबाबतचा अंतिम निकाल समाधानकारकरित्या हाती येईल. विविध मार्गांवरून धनलाभाचे योग जुळून येतील व आर्थिक आवक समाधानकारक स्थितीत राहील व भावी काळासाठी आर्थिक समस्यांचा प्रश्न मिटण्याच्या दृष्टिक्षेपात राहील.

**वृषभ** - पारिवारिक आनंद वाढविणारे विविध प्रकारची समाचार पत्रे हाती येतील व कौटुंबिक वातावरण उत्साहवर्धक स्थितीत राहून मानसिक शांतता प्रस्थापित राहू शकेल. दूर अगर परदेशी निवासी प्रिय व्यक्तीचे मनोनुकूल व चांगले दूरध्वनी वार्ता येतील.

**मिथुन** - कार्य सभोवतालीन परिस्थिती अनुकूल व चांगली राहील. स्थगित व अपूर्ण स्थितीत असणारी व्यवहार कामे गतिवान रितीने पूर्ण होतील. क्रीडा अगर पराक्रम क्षेत्रातील कामगिरी नेत्रदीपक यशाची राहून विविध प्रकारच्या बक्षिसांचा वर्षाव होईल.

**कर्क** - विविध प्रकारच्या अचानक खर्चाच्या प्रसंगास सामोरे जावे लागेल. विशेष करून पातळ द्रव व इंधनसारख्या बाबीवर पूर्व नियोजित खर्चापेक्षा अधिक प्रमाणात खर्च निर्माण करणारी ग्रहस्थिती आहे. आर्थिक गुंतवणूक काळजीपूर्वकच करणे चांगले.

**सिंह** - महत्त्वपूर्ण कामासाठी करावा लागणारा प्रवास कार्यसाधक स्वरूपाचा ठरेल. मनातील कल्पना व विचार प्रत्यक्ष कृतीत येतील व विचाराधीन असणाऱ्या योजना मनोनुकूलरित्या पूर्ण होण्याच्या दृष्टिक्षेपात राहतील व मनावरील काळजीचे सावट मिटेल.

**कन्या** - अनावश्यक खर्चाच्या प्रसंगास सामोरे जावे लागेल. कर्ज व्यवहार प्रकरणे या ना त्या कारणपरत्वे विलंबाखाली व अडचणींच्या मार्गावर राहतील व भावी काळाच्या दृष्टीने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागण्याची दाट शक्यता आहे.

**तुळ** - सर्व क्षेत्रात मनोनुकूल व चांगल्या घडामोडी घडून येतील व सर्वत्र मनोनुकूल यश दृष्टिक्षेपात राहील. आर्थिक स्थिती मजबुतीच्या शिखरावर राहील. इतरांनी दिलेले आर्थिक मदतीचे आश्वासन ते पूर्ण करण्यास समर्थ स्थितीतच राहतील व वेळेवर सहकार्य मिळू शकेल.

**वृश्चिक** - उद्योग, व्यवसाय क्षेत्र समस्यामुक्त स्थितीत राहील व व्यावसायिक समस्यांचा सामना सहसा करावा लागणार नाही व यश समोर दिसू लागेल. बेरोजगार व्यक्तीस विविध प्रकारच्या रोजगाराच्या संधी चालून येतील व भावी काळातील रोजगाराची समस्या मिटेल.

**धनु** - सहकुटुंब यात्रायोग घडून येईल व यात्रा सफलतेचीच राहील. सर्वत्र पुढचे पाऊल पुढेच राहून नेत्रदीपक यशाचा मार्ग खुलाच राहू शकेल. कार्य क्षेत्रात जे कार्य इतरांना शक्य झाले नाही ते कार्य आपल्या हातून यशस्वीरित्या पूर्ण होण्याच्या दृष्टिक्षेपातच राहू शकेल.


**मकर** - विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागेल. जवळ आलेले यश दूर जाण्याची दाट शक्यता आहे व काळजीचे सावट वाढेल. वाहन पिडायोग संभवतो, त्यामुळे वाहन चालविताना सर्व रस्ता आपलाच आहे, असे समजून वाहन चालविणे धोकादायक ठरू शकेल.

**कुंभ** - विविध क्षेत्रांतील अपूर्ण व स्थगित व्यवहार कामे गतिवान होतील. विशेषकरून भागीदारीत असणारी व्यवहार कामे सुरळीतपणाच्या मार्गावर येतील व पूर्ण होतील. इतरांबरोबर असणारे मतभेद मिटतील व परिस्थिती पूर्व पदावर येऊन उत्साह वाढेल.

**मीन** - आरोग्य व्यवस्थितरित्या कार्यरत राहून आरोग्याच्या विविध प्रकारच्या समस्या व तक्रारी मिटतील व आरोग्य सुधारेल, परंतु विरोधक मंडळींच्या कारवाया अधिक प्रमाणात वाढतील. त्यामुळे त्यांना बोट ठेवण्यास जागा रिक्त राहणार नाही. याकडे लक्ष देणे चांगले.

**लक्ष्मण जोशी, एन-१२, ईएफ ५६/२, शिवछत्रपतीनगर, हडको, छत्रपती संभाजीनगर. मो. ९४२३० ४८०७४**

अपेक्षा पूर्ण होत नसतील, तर मूल चिडचिड करते, रडके बनते, आक्रमक किंवा भावनिक होते, कुठेतरी स्वतःला कुटुंब, शाळा आणि मित्र यांच्याकडून आपल्याला दुर्लक्षित केले जात असल्याचे वाटते. मग त्याच्यामध्ये एकटेपणाची आणि असुरक्षिततेची भावना तयार होते. साहजिकच अशा मानसिकतेचा परिणाम त्याच्या मेंदूवर होतो. मेंदूच्या कार्यपद्धतीत हळूहळू अडथळा निर्माण होतो, मेंदूतून स्त्रवणाऱ्या जैव रसायनांचा समतोल बिघडवतो. येथूनच त्याच्या व्यक्तिमत्त्वाला चुकीच्या सवयी लागण्याची सुरुवात होते. आपल्यावर इतरांनी रागावणे, चिडचिड करणे, टोमणे मारणे, अपमानित करणे, जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, भीती दाखविणे, शिक्षा करणे, असेच होत असेल, तर याचा परिणामसुद्धा मुलांच्या मेंदूवर होतो. मुलांच्या मेंदूच्या खालच्या भागात असलेला भावनिक भाग सतत कार्यान्वित होतो. याउलट मेंदूच्या वरच्या भागात कॉर्टेक्स एरियामध्ये असलेल्या उच्च बौद्धिक भागात पुरेशा प्रमाणात ग्लुकोज आणि ऑक्सिजन पोहोचू शकत नाही, त्याचा परिणाम मुलांच्या मेंदूतील न्यूरॉन्स पेशीच्या जोडण्यावर होतो.



**जुळवाजुळवी - दोन अक्षरी -** मोद, पाड, कैरी, सन, वरी, बारी, चहा, वर, रत, खिंड, धरा, धन, नशा, वड, नक्षी, दोहा, मद, भाऊ, दावा, पाल, मद **तीन अक्षरी -** पाऊस, आकांत, सबंध, भारत, मशेरी, रावण, नवस, लवाद, चलन, नमन **चार अक्षरी -** यमराज, दीनबंधू, नवनीत, सतराशे, दशानन, नीरक्षीर, यमसभा, पासवान **पाच अक्षरी -** मदनबाण, नजरबंदी, नजरकैद, वडवानल, आरसपानी, पावनखिंड, मनधरणी, रजीनकांत

## कालच्या सुडोकूचे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 6 | 2 | 3 | 7 | 4 | 5 | 8 |
| 8 | 2 | 3 | 4 | 5 | 9 | 1 | 7 | 6 |
| 4 | 5 | 7 | 1 | 6 | 8 | 3 | 9 | 2 |
| 5 | 6 | 8 | 7 | 1 | 2 | 9 | 3 | 4 |
| 1 | 7 | 4 | 9 | 8 | 3 | 2 | 6 | 5 |
| 2 | 3 | 9 | 5 | 4 | 6 | 8 | 1 | 7 |
| 7 | 4 | 1 | 8 | 9 | 5 | 6 | 2 | 3 |
| 3 | 8 | 5 | 6 | 2 | 1 | 7 | 4 | 9 |
| 6 | 9 | 2 | 3 | 7 | 4 | 5 | 8 | 1 |

## कालच्या काकुरो कोड्याचे उत्तर




## कालच्या टी ब्रेक शब्दकोडेचे उत्तर



मंगल शेणाय बेनाडा

# मुंबई चौफेर - शब्दकोडे



**आडवी विधाने**

१. उद्धव ठाकरे यांच्या आजोबांचे पूर्ण नाव
९. उन्हाळ्यातील एक महिना
१०. जपणूक, संवर्धन - *** करणे
११. कमी (हिंदी)
१२. विचार विनिमय - सल्ला ****
१४. पाण्याचे बाष्परूप
१५. जसा ** तशी प्रजा (म्हण)
१६. ग्राम, खेडे
१८. सुताराचे लाकूड तासण्याचे साधन
२०. डोकेदुखीवर कपाळावर लावतात तो
२१. जमीनदार, वतनाचा मालक
२३. रोगप्रतिबंधात्मक टोचतात ती
२४. दुधावरील मलई
२५. पातळ कालवण, पृथ्वी
२६. स्वार्थ, हेतू, तात्पर्य
२८. युद्धापूर्वीची समेटाची बोलणी
२९. शरीर (हिंदी)
३२. नशीब (इं.)
३४. पर्वा, काळजी
३६. संसदेचे वरिष्ठ सभागृह
३८. शरीरावरील मोठा तीळ
३९. त्वरेने, पटकन
४१. गाणे बनविणारा
४३. एक मराठी न्यूज चॅनल
४४. स्पर्श (इं.)
४५. देव
४७. अंमल गाजविण्याचा अधिकार
४८. लोकसभा सदस्य
५०. पाठीचा कणा हाडाच्या गाठीपासून बनतो तो - ***
५१. न बोलण्याचे व्रत
५२. बंदी (हिंदी), डरना ** हैं
५३. क्रिकेटमधील धाव, धावणे (इं.)


**उभी विधाने**

१. दिल्लीचे मुख्यमंत्री - अरविंद *****
२. शंभर
३. श्रीरामाने चौदा वर्षे भोगला 'तो'
४. दह्यापासून बनवलेले पेय
५. पूर्वी लोक एकमेकांना भेटल्यावर म्हणत, नमस्कार
६. पक्का निश्चय, अढळ
७. व्यायाम, मेहनत
८. रेल्वे (हिंदी)
१३. सततची केलेली मागणी, मागणीचा पाठपुरावा
१७. देवतांनी दिलेला आशीर्वाद
१९. शपथ (हिंदी)
२०. ख्रिश्चनांचा धर्मग्रंथ
२१. कॉलनी (म.)
२२. दैव, लक (म.)
२४. वर्ष (हिंदी)
२५. मग्न
२७. तमाशातील कलावंत
३०. मजबूत, कणखर
३१. छत्रपती राजाराम यांचा धाडसी पत्नी
३३. कंबर (हिंदी)
३५. पैसा अडका, संपत्ती
३७. शिजवलेला तांदूळ
४०. रचना करणारा
४२. फॅक्टरी (म.)
४३. माहेरच्या विरुद्धार्थी शब्द
४६. श्वास घेण्याची क्रिया
४९. गुलाम, सेवक
५०. ** करा रे प्रसन्न - सर्व सिद्धीचे कारण

**सुडोकू :** १ ते ९ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत ३ बाय ३च्या प्रत्येक लहान चौकोनात सर्व १ ते ९ आकडे आलेच पाहिजे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | | | 1 | | |
| | | | | 2 | 5 | 7 | 3 | |
| | 9 | 4 | | 6 | 7 | | | 2 |
| | 5 | | 4 | | 3 | | | 9 |
| | 8 | | | 9 | | | 7 | |
| 1 | | | 6 | | 8 | | 2 | |
| 6 | | | 7 | 4 | | 9 | 5 | |
| | 4 | 5 | 8 | 3 | | | | |
| | | 8 | | | | 6 | | |

**काकुरो :** खाणाखुणा खालील चौकोनात १ ते ९ अंक लिहून वरून खाली व डावीकडून उजवीकडे अर्धवट रंगवलेल्या चौकोनातील संख्येशी एकरूप झाले पाहिजे. एकदा वापरलेला अंक पुन्हा वापरता कामा नयेत.



## छोट्यांसाठी सुडोकू

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | | |
| | | | 3 |
| | | 4 | |
| 1 | | | |

४ बाय ४च्या या चौकटीत संख्या दिलेली आहेत. यातील रिकाम्या चौकटी भरा आणि हे छोटे सुडोकू पूर्ण करा. कोणत्याही १ ओळीत एक आकडा एकदाच आला पाहिजे. या प्रमाणे सर्व चौकटी भरा आणि कोणताही आकडा पुन्हा येणार नाही.

## राणा दग्गुबातीने केली ३५ची घोषणा

भारतीय सिनेमातील प्रख्यात अभिनेता राणा दग्गुबातीने अलीकडेच आपल्या नव्या प्रोजेक्ट ३५ची घोषणा केली आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे पहिले पोस्टर हिंदीमध्ये रिलीज करण्यात आले आहे. चित्रपटाची कथा व अन्य तपशीलाविषयी अद्याप फार काही माहिती समोर आलेली नाही. परंतु हा एक रोमांचक व लक्षवेधी सिनेमा ठरणार इतके मात्र नक्की. राणाचे चाहते या घोषणेमुळे चांगलेच खूश आहेत व आता त्यांना या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

बाहुबली फ्रेंचाईजीमध्ये भल्लालदेवच्या व्यक्तिरेखेसाठी ओळखला जाणाऱ्या राणा दग्गुबातीने सोशल मीडियावर ही खबर शेअर केली आहे.



# सलीम खान यांनी केला सलमानच्या लग्न न करण्याचा खुलासा

बॉलीवूडचा आवडता भाईजान अखेर बोहोल्यावर कधी चढणार, हा प्रश्न त्याच्या चाहत्यांना नेहमीच सतावत आला आहे. प्रत्येक वर्षी सलमानचे चाहते विचार करतात की, यंदा तरी सलमान नक्कीच लग्न करेल, परंतु सरतेशेवटी त्यांच्या पदरी निराशाच पडते. याच संदर्भातील सलमान खानचे पिता सलीम खान यांचा जुना व्हिडीओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे, ज्यात ते सलमान खानच्या विवाहावर बोलताना दिसून येताहेत.

सलीम खान आपला मुलगा सलमान खान याच्याबद्दल बोलताना म्हणतात की, सलमान हा अत्यंत सरळ स्वभावाचा व्यक्ती आहे. तो अगदी सहजपणे नात्यात बांधला जातो. परंतु विवाह करण्याची हिंमत करू शकत नाही. तो मनाने एकदम साधा आहे. त्यामुळे तो लागलीच कुणाकडेही आकर्षित होतो. परंतु विवाहाची हिंमत करू शकत नाही, कारण त्याला वाटते की, ती मुलगी त्याचे घर सांभाळू शकणार नाही. सलमानला एका अशा स्त्रीला जोडीदार बनवायचे आहे, जी कुटुंबासाठी समर्पित असेल. तो विचार करतो की, जशी त्याची आई आहे तशी मुलगी मिळावी, जी आपल्या पती व कुटुंबाप्रति प्रतिबद्ध असेल. आताच्या जमान्यात अशी मुलगी कुठून मिळणार जी घर सांभाळेल, मुले सांभाळेल, त्यांचा होमवर्क करून घेईल. सलमानला एक अशी मुलगी हवीय जी कुटुंबाला एकत्र बांधून ठेवू शकेल.

# हिंदुस्तानी-२ चा ट्रेलर रिलीज

कमल हसन जसजसे आपल्या करिअरमध्ये पुढे जात आहेत, ते आपल्या व्यक्तिरेखांसोबत प्रयोग करण्यास जराही घाबरत नाहीत. म्हणूनच त्यांच्या दोन आगामी चित्रपटांची प्रेक्षकांना कधीपासून प्रतिक्षा लागून राहिली आहे. एकीकडे त्यांचा चित्रपट कल्की २८९८ एडी चित्रपटगृहांत लवकरच दाखल होणार आहे, तर तेच त्यांचा तमिळ चित्रपट इंडियन-२ देखील प्रदर्शनासाठी सज्ज आहे. इंडियन-२ हा हिंदी भाषिक प्रेक्षकांकरिता हिंदुस्तानी-२ टायटलद्वारे रिलीज केला जाणार आहे. मेकर्सनी हिंदुस्तानी-२ चा ट्रेलर नुकताच रिलीज केला आहे, जो पाहिल्यावर प्रेक्षक कमल हसन यांच्या अभिनयाची प्रचंड प्रशंसा करताना दिसून येत आहेत.

एस. शंकर यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हिंदुस्तानी-२ पुढील महिन्यात थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. आता नुकतेच मेकर्सनी चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. या ट्रेलरची सुरुवात होते ती देशात सुरू असलेल्या भ्रष्टाचारांच्या तक्रारींनी, जेथे लोकांना ही तक्रार असते की, सिस्टम ठीक करणारे कुणी नाहीये, पण ती ठिक करण्यासाठी कुणी एक पाऊलही उचलत नाहीये. त्याचवेळी एंट्री होते ती सेनापतीची जे सिस्टममधील लोकांना कधी प्रेमाने तर कधी आपल्या माराने सुधारण्याची जबाबदारी घेतात. ट्रेलरमध्ये कमल हसन यांचा ढांसू अवतार पाहायला मिळत आहे. २ मिनिटे ३७ सेकंदांचा हा ट्रेलर लोकांना चित्रपटगृहांत खेचून आणण्याइतपत प्रभावशाली आहे. या चित्रपटात कमल हसन यांच्या व्यतिरिक्त रकुल प्रीत सिंग व रंग दे बसंती फेम सिद्धार्थही दिसून येणार आहे. हा चित्रपट येत्या १२ जुलै रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.




# शरद पोंक्षे – स्नेह पोंक्षे लवकरच घेऊन येणार 'बंजारा'

काही दिवसांपूर्वीच शरद पोंक्षे आणि त्यांचा सुपुत्र स्नेह पोंक्षे यांनी आपल्या आगामी चित्रपटाची घोषणा केली होती. वडील मुलाची ही जोडी प्रेक्षकांसाठी काय जबरदस्त घेऊन येणार, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक होतेच. मात्र यावरील पडदा आता उठला असून 'बंजारा' असे या चित्रपटाचे नाव आहे. आयुष्याच्या प्रवासावर भाष्य करणारा हा चित्रपट असल्याची प्रथम झलक पाहून कळतेय. चित्रपटाचे नाव जरी जाहीर झाले असले तरी या चित्रपटात कोण कोण कलाकार झळकणार, हे जाणून घेण्यासाठी आणखी थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दरम्यान, मोरया प्रॉडक्शन्स आणि वि. एस. प्रॉडक्शन्स सादर करीत असलेल्या या चित्रपटाचे शरद पोंक्षे आणि रोहिणी विजयसिंह राजे पटवर्धन निर्माते आहेत. या चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण हे सिक्कीममध्ये झाले आहे.

मराठी कलाक्षेत्रातील एक नामवंत नाव म्हणजे शरद पोंक्षे. नाटक, मालिका, चित्रपट या कलेच्या विविध माध्यमांमधून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवल्यानंतर शरद पोंक्षे 'बंजारा' चित्रपटातून निर्मिती क्षेत्रात पदार्पण करत आहेत. वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन त्यांचा सुपुत्र स्नेह पोंक्षे करणार आहे. दिग्दर्शक म्हणून स्नेहचा हा पहिलाच चित्रपट आहे. त्यामुळे प्रेक्षकांना काहीतरी भन्नाट आणि मनोरंजनात्मक पाहायला मिळणार, हे नक्की!




# 'लाईफ लाईन' येणार २ ऑगस्टला

विधात्याने तळहातावर रेखाटलेली आयुष्यरेखा आपण वाढवू शकतो का? या प्रश्नाचे उत्तर देणारा 'लाईफ लाईन' चित्रपट येत्या २ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आधुनिक विज्ञान आणि जुन्या रितीरिवाजांमधील संघर्ष यावर आधारित या चित्रपटाचे नवीन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे. पोस्टरमध्ये महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्राप्त महानायक अशोक सराफ आणि आपल्या सर्वोत्कृष्ट अभिनयाने घराघरांत पोहोचलेले लोकप्रिय अभिनेते माधव अभ्यंकर दिसत असून, अशोक सराफ यांच्या गळ्यातील स्टेथोस्कोप आणि माधव अभ्यंकर यांच्या गळ्यातील तुळशीमाळ यावरून या दोघांमधील मतभेदाचा अंदाज प्रेक्षकांना येऊ शकतो. मात्र हा मतभेद कोणत्या कारणावरून आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे.

क्रिसेंडो एंटरटेन्मेंट प्रस्तुत, या चित्रपटात हेमांगी कवी, भरत दाभोळकर, जयवंत वाडकर, शर्मिला शिंदे, संध्या कुटे आणि समीरा गुजर यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. साहिल शिरवईकर दिग्दर्शित या चित्रपटाचे निर्माते आहेत. लालजी जोशी, कविता शिरवईकर, अमी भुता, मिलिंद प्रभुदेसाई, उदय पंडित, संचिता शिरवईकर, संध्या कुलकर्णी, शिल्पा मुडबिद्री आणि क्रिसेंडो एंटरटेन्मेंट.




राजेश शिरवईकर यांची कथा, पटकथा, संवाद आणि गीत लाभलेल्या या चित्रपटातील गाणी अशोक पत्की यांनी संगीतबद्ध केली असून, या भावपूर्ण गाण्यांना अवधूत गुप्ते आणि माधुरी करमरकर यांचा आवाज लाभला आहे. 'लाईफ लाईन' हा चित्रपट ११ आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा मानकरी आहे.

# सरफिरातील 'खुदाया' हे दुसरे गाणे रिलीज

अक्षय कुमारचा 'सरफिरा' हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय आहे, अशा परिस्थितीत जंगली म्युझिक आणि निर्माते-केप ऑफ गुड फिल्म्स, अबंडंटिया एंटरटेन्मेंट आणि २डी एंटरटेन्मेंट यांनी लोकांचा उत्साह कायम ठेवत 'खुदाया' हे गाणे रिलीज केले आहे. त्यांच्या प्रेमाचे आणि स्ट्रगलर्सचे उत्तम प्रकारे चित्रण करणारी ही कव्वाली आहे, अक्षय कुमार आणि राधिका मदन यांचा हा भावपूर्ण ट्रॅक नक्कीच तुमच्या हृदयाला स्पर्श करेल. 'खुदाया' आता सर्व स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. सुहित अभ्यंकर, सागर भाटिया आणि नीती मोहन या तेजस्वी त्रिकुटाने गायलेले आणि सुहित अभ्यंकर यांनी संगीत दिलेला, 'खुदाया' हा चित्रपटांमध्ये कव्वालीचे एक अप्रतिम पुनरागमन आहे. हे गाणे प्रेमाची ताकद अधोरेखित करते. श्रोत्यांना आठवण करून देणे की खरे प्रेम सर्व परीक्षा आणि संकटांना तोंड देते. त्यांचे कर्णमधुर मिश्रण एक संगीतमय अनुभव तयार करते जो सामान्यापेक्षा जास्त आहे. यामुळे तो अल्बमचा उत्कृष्ट ट्रॅक बनतो. 'खुदाया' ही भावनात्मक खोली आणि कथनात्मक समृद्धीची एक झलक आहे जी 'सरफिरा' मध्ये समाविष्ट आहे. अक्षय कुमार आणि राधिका मदन यांनी हे गाणे आणखीनच आकर्षक केले आहे.




# हिना खान ब्रेस्ट कॅन्सरशी देतेय झुंज



लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री हिना खानने सोशल मीडियावर अशी माहिती शेअर केली आहे, ज्यामुळे तिच्या चाहत्यांना खूप मोठा धक्का बसला आहे. हिना सध्या ब्रेस्ट कॅन्सरशी झुंज देतेय. ती या कर्करोगाच्या तिसऱ्या टप्प्यावर आहे. हिनाने पोस्ट शेअर करत म्हटले की, ती यातून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. सध्या तिच्यावर उपचार सुरू आहेत.

हिना खानने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात तिने लिहिले आहे की, हॅलो एव्हरीवन. नुकत्याच पसरलेल्या अफवा लक्षात घेता, मी हिनाहॉलीक्स व त्या सर्व लोकांसोबत काही महत्त्वाची माहिती शेअर करू इच्छिते. जे माझ्यावर प्रचंड प्रेम करतात व माझी पर्वा करतात. तपासणीत मला कॅन्सर झाल्याचे निदान झालेय, जो तिसऱ्या स्टेजवर आहे. या आव्हानात्मक वेळी मी सर्वांना आश्वस्त करते की, मी ठीक आहे. मी मजबूत आहे व दृढ आहे. मी या आजारातून ठीक होण्यासाठी मजबुतीने उभी आहे. माझे उपचार आधीच सुरू झालेत. मी यातून बाहेर पडण्यासाठी अधिक मजबूत होऊन याचा सामना करत आहे व ठीक होण्यासाठी हर एक तऱ्हेने प्रयत्न करण्यासाठी तयार आहे. मी आपल्या सर्वांना या कठीण प्रसंगात प्रायव्हसीचा आदर करण्याचा आग्रह करते. मी आपले व्यक्तिगत अनुभव, किस्से व सल्ले माझ्याकरिता या प्रवासात खरेच खूप महत्त्वाचे ठरतील. आपले प्रेम, आशीर्वाद कायम ठेवा व प्रार्थना करा.


# बेबी जॉनमधील वरुणचा इंटेंस लूक व्हायरल

अभिनेता वरुण धवनने आपला आगामी चित्रपट बेबी जॉनकरिता साऊथ चित्रपटांचे दिग्दर्शक कालीस व जवानचे दिग्दर्शक एटली यांच्याबरोबर हात मिळवला आहे. नुकतीच खबर होती की, या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे व आता हा चित्रपट २५ डिसेंबर रोजी रिलीज होणार आहे. तेच मेकर्स आता या चित्रपटाला चर्चेत आणण्याची एकही संधी वाया जाऊ देत नाहीयेत. चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले आहे. मेकर्सनी या ॲक्शन पॅक्ड चित्रपटातील वरुण धवनचा आणखी एक लूक शेअर केला आहे, जो चित्रपटातील त्याचा परफॉर्मन्स किती किलर होणार आहे हे दाखवून देतोय. वरुण धवनचा हा लूक शाहरुख खानच्या जवानसोबत खूप मॅच करतोय.



नव्या पोस्टरमध्ये बेबी जॉन ॲक्टर वरुण लांब ओले केस, वाढलेली दाढी व खूप इंटेंस लूकमध्ये पाहायला मिळत आहे. त्याला पाहून असे वाटतेय की, तो लढ्यासाठी सज्ज आहे व आपल्या मार्गात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तो संपवू शकतो. पोस्टरमध्ये एकीकडे चित्रपटाची प्रदर्शन तारीख व अन्य माहिती देण्यात आली आहे. या चित्रपटाद्वारे वरुण पहिल्यांदाच ॲक्शन मोडमध्ये दिसून येणार आहे. या चित्रपटाद्वारे साऊथ अभिनेत्री कीर्ती सुरेश ही बॉलीवूड डेब्यू करणार आहे. याशिवाय वामिका गब्बीही या चित्रपटाद्वारे रुपेरी पडद्यावर आपली सुरुवात करणार आहे. याशिवाय या चित्रपटात जॅकी श्रॉफ व राजपाल यादवही पाहायला मिळणार आहेत.

## मुंबई चौफेर - शब्दकोडे



**आडवी विधाने**

१. सरस्वती, विद्यादेवता
३. आनंद, हर्ष
४. रावणाच्या पत्नीचे नाव
७. हनुमानाची आई
९. अमिताभ बच्चन, किमी काटकर यांचा चित्रपट
११. मोठ्या मनाचा, दानशूर
१२. तृप्ती, संतोष
१४. वाळूचे विस्तृत मैदान
१७. चुलता, वडिलांचा भाऊ
१९. जखमेवरील पापुद्रा
२२. शिखर, घुमट
२४. नवीन, नवा
२५. चानी; लोणच्यातील पदार्थ
२६. 'प्रतिघात', 'प्रहार' या चित्रपटांचा नायक
२८. तोंड, मुख, चेहरा
२९. लोणी
३०. टोच, बोचणी
३१. एक दिवंगत नाटककार– *** कानेटकर
३२. एक हजार ग्राम वजन
३३. अर्धांगवायू
३४. दोन समान संख्यांचा गुणाकार
३५. नमुना, दाखला
३८. उद्यान, बगीचा
३९. पाट, लहान कालवा
४१. एक मैदानी पारंपरिक लाकडी वाद्य वाजवत केलेले नृत्य
४२. समुद्राच्या लाटांचा आवाज
४३. कडे, कंकण
४५. स्त्रियांचा कमरपट्टा
४७. कानाने ऐकू येत नाही असा
४८. नशीब, प्राक्तन
४९. कोलकात्याच्या जुन्या विमानतळाचे नाव
५२. मुंगूस; सहदेवाचा जुळा भाऊ
५४. साहाय्य, हातभार
५६. नाकाने हुंगावयाची तंबाखूची पूड
५८. कागदी चलन
६०. एक हिंदी चित्रपट अभिनेत्री– *** माळी
६१. उपस्थित
६२. एक होऊन गेलेले मराठी संतकवी
६५. छंद, शौक
६६. जळगाव जिल्ह्यातील ऐतिहासिक तालुका
६७. एक विख्यात मराठी पार्श्वगायक– सुरेश ****
६८. रानरेडा
७०. अकरावा मराठी महिना
७१. महिरप, अर्धवर्तुळ
७२. पांडवांचा बलदंड भाऊ
७३. अरबी वर्षाचा नववा महिना
७४. भविष्य
७५. गाणे; राजेंद्रकुमारचा हिट चित्रपट
७६. साद, आरोळी

**उभी विधाने**

१. 'बाजीगर', 'जवान' या चित्रपटांचा नायक
२. एक विदेशी मद्य
४. पांढऱ्या रुईचे झाड
५. जाडजूड दोरी
६. अस्वल
७. अमिताभ बच्चन, हेमा मालिनी, रजनीकांत यांचा चित्रपट
८. लोक, प्रजा
१०. शक्ती, ताकद
१३. एक औषधी वनस्पती
१४. त्राता, रक्षणकर्ता
१५. फसवणूक
१६. खोटा आरोप, संशय
१८. राजेश खन्ना, आशा पारेख, विनोद खन्ना यांचा चित्रपट
२०. दैना, दुर्दशा
२१. भारताचा एक विद्यमान अष्टपैलू क्रिकेटपटू– अक्षर ***
२२. लाकूड कापण्याचे धारदार हत्यार
२३. मोहन जोशी, वर्षा उसगावकर, प्रशांत दामले, नीना कुलकर्णी यांचा चित्रपट
२६. सगेसोयरे, नातेवाईक
२७. एक दिवंगत माजी केंद्रीय मंत्री– रामविलास ****
३४. आकाशात भरारी घेणारा पक्षी
३६. सारखा, समान
३७. अवहेलना, अवज्ञा
३८. ख्रिस्ती बांधवांचा पवित्र ग्रंथ
४०. सत्यघटना, धर्मेंद्रचा चित्रपट
४१. लिहिलेला कागद, दस्तऐवज
४४. चमत्कार, अद्भुत गोष्ट
४६. हत्तीचे लांब नाक
५०. कृश, अशक्त
५१. आतून पोकळ उंच असा स्तंभ
५३. श्वान
५५. वचक, धाक, जरब
५६. दालचिनीचे झाड
५७. अनुमती, आज्ञा
५९. एक प्रकारची घोडागाडी
६०. 'निकोबार'च्या बाजूचे बेट
६१. आक्षेप, मज्जाव, प्रतिबंध
६३. आलिशान गाडी
६४. धाडस, धैर्य, अजय देवगण याचा चित्रपट
६९. डावा
७२. भिक्षा

## चांगले विचार

जीवन असे असावे जे नात्यांची किंमत करेल आणि संबंध असे असावेत जे आठवण करायला भाग पाडतील. या जगात कुणास ठाऊक कोण किती दिवस राहणार आहे.

## मध्यम सुडोकू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | | | 6 | | 5 |
| | 4 | 5 | 2 | | 3 |
| | | | | | 4 |
| 4 | | | | | |
| 5 | | 2 | 1 | | 6 |
| 1 | | 3 | | 5 | |

मध्यम सुडोकू – बॉक्समध्ये १ ते ६ क्रमांक अशाप्रकारे भरा की २ बाय ३ च्या चौकटीत कोणताही एक आकडा पुन्हा येणार नाही.

## कालच्या छोटे सुडोकूचे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 2 | 3 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 3 | 2 |

## कालच्या मध्यम सुडोकूचे उत्तर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 3 | 6 | 1 | 5 |
| 6 | 5 | 1 | 3 | 4 | 2 |
| 1 | 6 | 2 | 4 | 5 | 3 |
| 4 | 3 | 5 | 2 | 6 | 1 |
| 3 | 1 | 4 | 5 | 2 | 6 |
| 5 | 2 | 6 | 1 | 3 | 4 |

## कालचे क्रॉसवर्ड शब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | से | मा | री | | चि | दं | ब | र | म | | च | प | ख | ल |
| त | | न | | वा | त | ड | | ज | ग | दी | प | | र | ग |
| ब | ना | व | ट | | चो | | हा | नी | | | रा | स | व | ट |
| र | त | | क | स | र | त | | च | क | म | क | | स | |
| | ल | ता | | ल | | पा | चा | र | ण | | | ग | | माँ |
| भा | ग | व | त | | का | स | व | | व | ज | न | दा | र | |
| व | | दा | र | वा | न | | डी | र | | मा | र | | म | त |
| ज | वा | न | | क | स | र | | जा | दू | | म | त | ल | ब |
| य | म | | बा | ब | | द | ल | | त | मा | | र्क | | क |
| | न | स | | गा | य | ब | | स | | ड | फ | | का | डी |
| स | | म | ख | र | | द | वा | खा | ना | | की | ट | क | |
| म | हि | र | प | | का | ली | या | | क | ता | र | | डी | र |
| शे | र | | ली | ल | या | | | ऱ्ह | | म्र | | ख | | सि |
| र | व | का | | गा | | सा | र | स्व | त | | वा | डा | | क |
| | ळ | | अ | म | रा | व | ती | | प | हि | ल | वा | न | |


## एनआयएची गुजरात, महाराष्ट्रात छापेमारी

नवी दिल्ली - भारतीय संरक्षण आस्थापनाच्या हेरगिरीसाठी पाकिस्तानकडून पैसे घेतल्याच्या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएने गुजरात आणि महाराष्ट्रातील विविध ठिकाणांवर शुक्रवारी छापेमारी केली. काही संशयित लोकांचा शोध घेण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. गतवर्षी जूनमध्ये या प्रकरणात एनआयएने गुन्हा नोंदवला होता. गोपनीय संरक्षण माहिती लीक झाल्याच्या प्रकरणात एनआयएकडून गत काही वर्षांपासून कारवाई केली जात आहे. २०२१ साली विशाखापट्टणममध्ये पाकिस्तानी गुप्तचर संघटना आयएसआयच्या हेरगिरी रॅकेटचा भंडाफोड झाला होता. या प्रकरणातील संशयितावर सुरू असलेल्या कारवाई अंतर्गत एनआयएकडून गुजरात व महाराष्ट्रातील तीन ठिकाणांवर व्यापक छापेमारी करण्यात आली. भारतीय संरक्षण आस्थापनाची हेरगिरी करण्यासाठी संशयितांना पाकिस्तानकडून पैसे मिळाल्याचे सांगितले जाते. छापेमारीदरम्यान मोबाइल फोन व इतर आक्षेपार्ह दस्तावेज जप्त करण्यात आले. सीबीआयने जुलै २०२३ मध्ये या प्रकरणात दोन आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. यात एका फरार पाकिस्तानी नागरिकाचा समावेश आहे.

मुंबई चौफेर
मुंबई
शनिवार, २९ जून २०२४

# आयसीसी टी-२० : आज भारत-आफ्रिका अंतिम सामना







बार्बाडोस - भारतीय संघ टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. भारताने उपांत्य फेरीत इंग्लंडचा ६८ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. आता शनिवारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना होणार आहे. बार्बाडोसमध्ये दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ११ वर्षांचा दुष्काळ संपवण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. वास्तविक, टीम इंडियाला जवळपास ११ वर्षांपासून कोणतीही आयसीसी स्पर्धा जिंकण्यात अपयश आले आहे. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या संघाला प्रथमच आयसीसी ट्रॉफी जिंकण्याची संधी आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० सामन्यांमध्ये भारतीय संघाचा वरचष्मा राहिला असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. भारत आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ २६ वेळा टी-२० फॉर्मॅटमध्ये आमनेसामने आले आहेत. त्यामध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेला १४ वेळा पराभूत केले आहे, तर ११ सामन्यांत भारताला पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ तटस्थ ठिकाणी दोनदा आमनेसामने आले आहेत. दोन्ही वेळा दक्षिण आफ्रिकेच्या संघाला पराभवाचा सामना करावा लागला. या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, टी-२० फॉर्मॅटमध्ये भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वर्चस्व गाजवत आहे, परंतु अंतिम फेरीत काय होते हे पाहणे मनोरंजक असेल.

भारतीय संघाने इंग्लंडला पराभूत करून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. त्याचवेळी दक्षिण आफ्रिकेच्या संघाने उपांत्य फेरीत अफगाणिस्तानचा पराभव केला. आता अंतिम फेरीत दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. आतापर्यंत भारतीय संघ या स्पर्धेत एकही सामना हरलेला नाही. आयर्लंडशिवाय रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पाकिस्तान, अमेरिका, अफगाणिस्तान, बांगलादेश, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडला पराभूत केले आहे.

दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच या स्पर्धेची फायनल गाठली आहे. तर भारतीय संघाने तिसऱ्यांदा फायनलमध्ये प्रवेश केला आहे. यापूर्वी भारतीय संघाने २००७ मध्ये फायनलमध्ये प्रवेश केला आणि जेतेपदावर नाव कोरले. त्यानंतर २०१४ मध्ये पुन्हा एकदा फायनल गाठली, मात्र फायनलमध्ये भारताला श्रीलंकेकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. पावसाचे सावट टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील जेतेपदाचा निकाल आता काही तासांवर येऊन ठेपला आहे. शनिवारी (२९ जून) भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम लढतीला सुरुवात होणार आहे. पण या सामन्यावरही पावसाचे सावट असल्याने भारतीय क्रीडाप्रेमींची धाकधूक वाढली आहे. बातम्यांनुसार या सामन्यात पाऊस पडेल असा अंदाज आहे. इतकेच काय तर राखीव दिवशीही पाऊस पडेल असा अंदाज आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्यासाठी एक दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना झाला नाही तर ३० जूनला हा सामना होईल. पावसाच्या व्यत्ययात निकाल देण्यासाठी दोन्ही संघांनी कमीत कमी १० षटके खेळणे गरजेचे आहे. जर दहा षटकांचा सामना झाला नाही तर हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल. अंतिम सामन्यासाठी अतिरिक्त वेळ दिला गेला आहे. एकूण ३ तास १० मिनिटांचा अतिरिक्त अवधी असेल. जर या अतिरिक्त वेळेत सामना पूर्ण झाला नाही तर मात्र तो राखीव दिवशी खेळवला जाईल. पावसामुळे षटके कमी केली गेली आणि पुन्हा पावसाच्या व्यत्ययामुळे सामना झाला नाही तर मग राखीव दिवशी जिथे सामना थांबला तेथून सुरुवात होईल.

# शेफाली वर्माने इतिहास रचला

चेन्नई - दक्षिण आफ्रिकेच्या पुरुष संघाने आयसीसी टी-२० वर्ल्डकपच्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ भारत दौऱ्यावर आहे. भारतीय महिला संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला संघात चेन्नईतील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर एकमात्र कसोटी सामन्याचा थरार सुरू आहे. या सामन्यात भारताची युवा स्टार फलंदाज शेफाली वर्माने महिला कसोटी क्रिकेटमधील सर्वात वेगवान द्विशतक झळकावले आहे.

या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकली आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी संघाला दमदार सुरुवात करून दिली. दोघींनी मिळून शतके झळकावली आणि २९२ धावांची विक्रमी भागीदारी केली. दरम्यान, १५० धावांच्या जवळ असताना स्मृती मंधाना बाद होऊन माघारी परतली. मात्र शेफालीने काही गिअर कमी केला नाही. तिने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांची धुलाई सुरूच ठेवली.

डावाच्या सुरुवातीला स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांनी २९२ धावा जोडल्या. त्यानंतर शेफाली वर्माने जेमिमा रॉड्रिग्जसोबत मिळून संघाचा गाडा पुढे नेला. सुरुवातीला तिने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिलेच शतक झळकावले. शतक

### भारतासाठी द्विशतक झळकावणारी ठरली दुसरी फलंदाज



झळकावल्यानंतर तिने धावांची गती आणखी वाढवली. ज्यावेळी ती दुहेरी शतक झळकावण्याच्या अगदी जवळ पोहोचली होती. त्यावेळी तिने सलग २ षटकार ठोकले आणि १ धाव घेत दुहेरी शतक साजरे केले.

शेफाली वर्मा ही महिला कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद दुहेरी शतक झळकावणारी दुसरी भारतीय फलंदाज ठरली आहे. तिने या डावात १९७ चेंडूंचा सामना करीत २३ चौकार आणि ८ षटकारांच्या साहाय्याने २०५ धावांची खेळी केली. ती भारतीय संघासाठी दुहेरी शतक झळकावणारी मिताली राजनंतर दुसरीच भारतीय फलंदाज ठरली आहे. मिताली राजने भारताकडून कसोटी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावले होते. मिताली राजने २००२ मध्ये इंग्लंडविरुद्ध २१४ धावांची खेळी केली होती. याआधी आणि त्यानंतर कोणत्याही महिला फलंदाजाला अशी कामगिरी करता आली नव्हती, मात्र आता शेफालीने नवा विक्रम केला आहे.

# नीट घोटाळ्यावरून संसदेत विरोधक आक्रमक

नवी दिल्ली - देशात नवे सरकार स्थापन होऊन १८व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले आहे. शुक्रवारी संसदीय अधिवेशनाचा पाचवा दिवस होता. भाजप नेते आणि माजी मंत्री अनुराग ठाकूर यांनी लोकसभेतील चर्चेला सुरुवात केली. देशभरात नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणाने खळबळ उडाली आहे. विद्यार्थी, पालकांसह विरोधकांनीही हा मुद्दा उचलून धरत केंद्र सरकारला धारेवर धरले आहे. लोकसभेच्या संसदीय अधिवेशनातही या प्रकरणाचे पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट परीक्षा घोटाळ्यासंदर्भात उत्तर द्यावे, अशी मागणी करीत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर संसदेचे कामकाज सोमवार (१ जुलै) पर्यंत स्थगित करण्यात आले.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत म्हणाले, नीट पेपर

### लोकसभेचे कामकाज सोमवारपर्यंत स्थगित

लीक प्रकरणावर सभागृहात चर्चा व्हायला हवी. सरकारने जनतेच्या, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला हवीत आणि त्यावरील उपाययोजना सांगायला हव्यात. सभागृहातील चर्चेतून देशभरातील विद्यार्थ्यांना संयुक्त संदेश जायला हवा की, विरोधक आणि सरकार या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहत आहेत. राहुल गांधींनी मांडलेल्या मुद्द्यांवर प्रतिक्रिया देताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, प्रत्येक मुद्द्यावर सर्वांना बोलण्याची संधी मिळेल. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर सर्व जण चर्चा करू शकतात. त्याचबरोबर मी सरकारला सांगेन की, त्यांनी तुमच्या मुद्द्यावर उत्तर द्यावे.

लोकसभेच्या संसदीय अधिवेशनात नीट पेपरफुटी प्रकरणावरून सत्ताधारी विरोधक पुन्हा एकदा आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. विरोधकांकडून नीट पेपर लीकवर चर्चेसाठी वेळ देण्याची मागणी करण्यात आली. मात्र, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी वेळ देण्यास नकार देत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या उत्तरावेळी तुम्हाला चर्चेसाठी आणखी वेळ मिळेल, असे सांगितले. तुम्हा सर्वांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देण्यासाठी वेळ दिला जाईल, असे आधीच कळवले आहे. तुम्ही उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांना सरकारने प्रतिसाद द्यावा, अशी माझी अपेक्षा आहे. तुम्हाला पुरेसा वेळ मिळेल. तुम्ही तपशीलवार चर्चा करा, असे ओम बिर्ला म्हणाले. मात्र विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी करीत सभागृहात गोंधळ घातला. आम्हाला विरोधी पक्ष आणि सरकारकडून भारतातील विद्यार्थ्यांना एक संयुक्त संदेश द्यायचा आहे की, हा आमच्यासाठी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून, आम्ही विचार केला की, विद्यार्थ्यांचा आदर करण्यासाठी आम्ही नीट घोटाळ्यावर चर्चा करू, असे राहुल गांधी म्हणाले. दरम्यान, विरोधकांच्या गोंधळानंतर संसदेचे कामकाज सोमवारपर्यंत स्थगित करण्यात आले.

## राज्यसभा खासदार फुलोदेवी नेताम यांची प्रकृती बिघडली

नवी दिल्ली - संसदेच्या अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी शुक्रवारी राज्यसभेत काँग्रेस खासदार फुलोदेवी नेताम यांची प्रकृती खालावल्याची बातमी समोर आली आहे. फुलोदेवी यांना तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले. नीट परीक्षेतील गैरप्रकारांबाबत विरोधी पक्ष सभागृहात निदर्शने करीत असताना ही घटना घडली. या गदारोळात फुलोदेवी यांची तब्येत बिघडली आणि त्या बेशुद्ध झाल्या. सहकारी खासदारांनी फुलोदेवी यांना उचलले आणि तातडीने रुग्णालयात दाखल केले. फुलोदेवी यांना संसदेच्या



संकुलातून रुग्णालयात नेण्यात आल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. राज्यसभा खासदार फुलोदेवी नेताम यांना आरएमएल रुग्णालयात नेण्यात आले आहे. फुलोदेवी बेशुद्ध पडल्यावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजूही तेथे पोहोचले. रजनी पाटील, स्वाती मालीवाल, इम्रान प्रतापगढी आणि इतर काँग्रेस खासदारांनीही फुलोदेवींना मदत केली.

# पुणे पोलिसांच्या कारवाईला वेग
## तीन ड्रग्ज पेडलर्सना अटक

पुणे : पुण्यात फर्ग्युसन कॉलेज (एफसी) रोडवर असणाऱ्या एका पबमध्ये काही तरुण अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने रविवारी मोठी खळबळ उडाली. या प्रकरणानंतर आता पुणे पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत. याप्रकरणी पुणे पोलिसांनी तीन ड्रग्स पेडलर्सना अटक केली आहे. एल ३ बारवर झालेल्या कारवाईमध्ये आतापर्यंत १३ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.


पुण्यातील ड्रग्ज प्रकरणात आधी अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीत पुण्यात ड्रग्ज रिटेलची साखळी समोर आली आहे. तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यातील एक आरोपी नायजेरियन आहे, तर दोन आरोपी पुण्यातील आहेत. तिन्ही आरोपींकडून ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. आरोपींकडून एमडी आणि कोकेन देखील जप्त करण्यात आले. अटक केलेल्या एका ड्रग्ज पेडलरने एल ३ बारच्या पार्टीला ड्रग पुरवले होते.

पुण्यातील गजबजलेल्या एफ सी रोडवरील एल थ्री लाउंजमधील पार्टीत ड्रग्ज पार्टीने मोठी खळबळ उडाली होती. हडपसरमधील कल्ट नावाच्या पबमध्ये त्यांनी रात्री साडेबारापर्यंत पार्टी केली आणि पुढे पहाटेपर्यंत पार्टी करण्यासाठी ते एफ सी रोडवरील एल थ्री लाउंजमध्ये पोहोचले आणि पार्टी केली. हा प्रकार समोर आल्यानंतर पुण्यात कायद्याचे राज्य राहिलेय का? विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याला आता ड्रग्जमाफियांनी ताब्यात घेतलेय का? पुण्याला ड्रग्जच्या नशेबाजांचा विळखा पडलाय का? आणि पुण्यात कायदा-सुव्यवस्था नावाची गोष्ट औषधाला तरी उरलीय का? असे संतप्त सवाल पुणेकर विचारू लागले आहेत.

ललित पाटील प्रकरणामुळे पुण्यातील तरुणाईला पडलेला ड्रग्जचा विळखा समोर आला होता. तर कल्याणी नगरमधील पोर्शे कार अपघातानंतर पब आणि बारचे दुष्परिणाम समोर आले होते. दोन्ही वेळी कारवाई केल्याचे दिसून आले. मात्र एफ सी रोडवरील या प्रकरणामुळे या कारवाई किती तकलादू होत्या? हे सिद्ध झाले आहे. ड्रग्जचा विळखा सोडवणे, पब संस्कृतीतून तरुणाईला वाचवणे हे पोलिसांचे काम तर आहेच, पण त्याहीपेक्षा मोठी जबाबदारी या मुलांच्या पालकांची आणि शिक्षकांची आहे. त्यामुळे हा फक्त कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न न मानता सामाजिक प्रश्न आहे, असे मानून पावले उचलली गेली पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'कुमार महाराष्ट्र केसरी' सूरज निकमची आत्महत्या

सांगली - जिल्ह्यातील युवा पैलवान सूरज निकम याने त्याच्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (२८ जून) दुपारच्या सुमारास घडली. सूरज निकम हा 'कुमार महाराष्ट्र केसरी' पैलवान होता. त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत. कुस्तीच्या आखाड्यात अनेकांना चितपट करणाऱ्या सूरज निकमच्या आत्महत्येमुळे सांगलीतील कुस्ती क्षेत्रामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.



पैलवान सूरज निकम हा जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील नागेवाडी या गावचा रहिवासी होता. दुपारी १ च्या सुमारास सूरजने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. सूरज निकम हा नामवंत मल्ल होता. त्याने यापूर्वी कुस्ती क्षेत्रातील अनेक किताब पटकावले आहेत. विरोधी पैलवानाला कोणत्या डावावर चितपट करायचे यात त्याचा हातखंडा होता. त्याने अल्पावधीतच कुस्ती क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करीत 'कुमार केसरी' होण्याचा बहुमान मिळवला होता. सूरजने कुस्तीच्या आखाड्यात अनेक मल्लांना अस्मान दाखवले होते.

कुस्तीच्या आखाड्यात अनेकांना चितपट करणाऱ्या सूरज निकमने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. याआधी सूरजच्या वडिलांचे निधन झाले होते आणि त्यामुळे तो व्यथित झाला होता. सूरजच्या निधनाचे वृत्त समजताच कुस्ती क्षेत्रासह सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. निधनानंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी विटा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. शनिवारी दुपारी त्याचे बंधू आल्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे समजते. सूरजच्या आत्महत्येमुळे कुस्ती क्षेत्रासह खानापूर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

# पुणे-बंगळुरू महामार्गावर अपघात ; १३ मृत्युमुखी

बंगळुरू - कर्नाटकमध्ये शुक्रवारी (२८ जून) एक भीषण अपघात झाला. देवदर्शनासाठी गेलेल्या भाविकांवर काळाने घाला घातला. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर ट्रक आणि मिनी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.. हावेरी जिल्ह्यात पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर बागडी तालुक्यातील गुंडेनहल्ली क्रॉसजवळ हा भीषण अपघात झाला. अपघातात प्राण गमावलेल्या १३ जणांमध्ये एका मुलाचाही समावेश आहे. राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

हे सर्व जण देवदर्शनावरून आपल्या गावाकडे जात होते. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरून टेम्पो ट्रॅव्हलर जात असताना हा अपघात झाला. महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला मिनी बसने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, ट्रॅव्हलरच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. अपघातामध्ये बसमधील भाविकांचा जागीच मृत्यू झाला. मृतदेह बाहेर काढणे देखील कठीण झाले होते. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले. अग्निशमन दलाने बसच्या आतील प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढले. अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र मिनी बसचा वेग खूपच जास्त होता, त्यामुळे ट्रकला धडक बसल्याचे बोलले जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातामध्ये मृत्यू झालेले आणि जखमी झालेले सर्व जण शिवमोग्गा येथील रहिवासी आहेत. हे सर्व जण बेळगावी जिल्ह्यातील सावदट्टी येथून यल्लम्माच्या दर्शनासाठी गेले होते. देवीचे दर्शन घेऊन परत येत असताना त्यांच्यावर काळाने झडप घातली.

## नगर : दूध दरासाठी शेतकरी आक्रमक

संगमनेर (अहमदनगर) - दूध दरासाठी दूध उत्पादक शेतकरी आक्रमक झाले असून शुक्रवारी (२८ जून) अहमदनगर जिल्ह्यातील कोल्हार-घोटी राज्यमार्गावर शेतकऱ्यांकडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. तालुक्यातील चिखली या गावात झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत दुधाला किमान ४० रुपये दर करावा, अशी मागणी केली. एकीकडे दूध दरावरून शेतकरी आक्रमक झाले असताना दुसरीकडे केंद्र सरकारने १० हजार टन दूध पावडर आयात करण्यासाठी परवानगी दिली आहे. हा दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याचे म्हणत शेतकऱ्यांनी या निर्णयाचा निषेध केला. सरकारने अगोदर राज्यातील दूधभेसळ रोखावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात शनिवारी (२९ जून) दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बैठक बोलावली आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या तयारीला वेग

### राज्यात २५ जुलैपासून विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम

मुंबई - लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर, केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी राज्यातील मतदार याद्या अद्ययावत करण्याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात मतदारयाद्यांचा 'विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम (दुसरा)' राबवण्याचे सूचित केले आहे. त्यानुसार हा कार्यक्रम राज्यभरात २५ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत राबवण्यात येत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सांगितले आहे.

पुनर्रीक्षणपूर्व उपक्रमामध्ये २५ जून ते २४ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याद्वारा प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी, मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व प्रमाणीकरण केले जाणार आहे. यादरम्यान मतदार यादी/मतदार ओळखपत्रातील त्रुटी दूर केल्या जाणार आहेत. आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे तसेच, अस्पष्ट/अंधुक छायाचित्र बदलून त्याऐवजी संबंधित मतदाराकडून योग्य दर्जाची छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे. विभाग/भाग यांची आवश्यकतेनुसार नव्याने मांडणी करून मतदान केंद्राच्या सीमांची पुनर्रचना करून मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे आणि तुलनात्मक फरक शोधून तो दूर करण्यासाठी कालबद्ध योजना आखणे, नमुना १-८ तयार करणे, १ जुलै या अर्हता दिनांकावर आधारित पुरवणी व एकत्रित प्रारूप यादी तयार करणे हे कामकाज यादरम्यान करण्यात येणार आहे.

या अंतर्गत २५ जुलै रोजी एकत्रिकृत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ९ ऑगस्टपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी राहील.

डाटाबेस अद्ययावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाईसाठीची मुदत १९ ऑगस्टपर्यंत असून, २० ऑगस्टला मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्यात येईल.

विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम, २०२४ अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये घरोघरी भेट देऊन नागरिकांची माहिती गोळा केलेली आहे. तथापि, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये काही नागरिकांना त्यांची नावे मतदार यादीत आढळून आलेली नाहीत. यामुळे आता विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम (दुसरा) अंतर्गत २५ जून ते ८ ऑगस्ट या कालावधीमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे त्यांच्या क्षेत्रामध्ये विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमादरम्यान शिल्लक राहिलेल्या घरांना भेटी देणार आहेत. त्याचबरोबर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदार यादीत नावे आढळून न आल्याबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे गृहभेटी देतील.

मतदानाच्या दिवशी आपले मतदार यादीत नाव नाही, असे होऊ नये, यासाठी पात्र नागरिकांनी या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमा (दुसरा) अंतर्गत २५ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीमध्ये त्यांची नावे मतदार यादीत नोंद करावीत. तसेच ज्या मतदारांचे नाव मतदार यादीमध्ये आहे, त्यांनी त्यांचे नोंदणी केलेले नाव, पत्ता, वय व इतर तपशील बरोबर आहे का? ते तपासून घेऊन, त्यात दुरुस्तीची आवश्यकता असल्यास या कालावधीत तो तपशील दुरुस्त करून घ्यावा. यातून मतदार यादी अधिकाधिक बिनचूक होण्यास मदत होईल. १ जुलै २०२४ रोजी किंवा त्या आधी १८ वर्ष पूर्ण केलेले नागरिक या कालावधीत मतदार म्हणून मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करू शकतात. विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान करण्याची ही महत्त्वाची संधी असल्याने पात्र नागरिकांनी नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## कल्याण-तळोजा मेट्रो रेल्वेच्या जमीन सर्वेक्षणास शेतकऱ्यांचा विरोध

नवी मुंबई - कल्याण-तळोजा मेट्रो रेल्वेच्या कामासाठी जागेचे सर्वेक्षण नंतर करा, पहिल्यांदा मोबदला द्या, अशी भूमिका स्थानिक शेतकऱ्यांनी घेत जागेच्या सर्वेक्षणास विरोध केला आहे. हा प्रकार डोंबिवली, गावडे, सोनारपाडा, उंबर्ली रोड येथील मानगाव परिसरात घडला. दरम्यान, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तात कामास प्रारंभ केला.

डोंबिवलीजवळील उंबर्ली रोड मानगाव परिसरातील जागा राज्य सरकारने महसूल खात्यामार्फत कल्याण-तळोजा मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाकरिता वर्ग केली आहे. प्रकल्पासाठी वर्ग करण्यात आलेली जागा ही गायरान आहे. या गायरान जागेवर अतिक्रमणे आणि बेकायदा बांधकामे आहेत. शुक्रवारी (२८ जून) सकाळी एमएमआरडीएचे पथक, तहसीलदारांचे पथक मोठ्या पोलीस बंदोबस्तात या जागेवर दाखल झाले. त्यांनी सर्वेक्षण तसेच बेकायदा बांधकामांवर कारवाई सुरू केली. या कारवाईला स्थानिक शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला. स्थानिक शेतकरी दशरथ म्हात्रे यांनी आमची शेतजमीन वडिलोपार्जित आहे. ही जागा प्रकल्पाच्या बाधित गायरान जमिनीमध्ये आहे. त्या ठिकाणी एमएमआरडीएकडून जबरदस्तीने सर्वेक्षण केले जात असल्याचे म्हटले. आमच्या शेतजागेचा मोबदला आम्हाला द्यावा. मगच सर्वेक्षणाचे काम करावे. या बाधित शेतकऱ्यांच्या बाजूने शेतकऱ्यांचे नेते राजाराम पाटील यांनी देखील या सर्वेक्षणास विरोध केला. या ठिकाणी असलेल्या पाच बेकायदा बांधकामांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या सह्यांचे एक निवेदन यावेळी तहसीलदारांना देण्यात आले. शेतकऱ्यांनी सर्वेक्षणाला विरोध केला असला तरी सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तात सर्वेक्षण सुरूच ठेवले.

